CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अ: 2/136

माझें गुरुचरित्र

पं. विष्णु दिगम्बर पलुस्कर

आम्नाय–ग्रन्थालय,
[illegible], [illegible]
[illegible]

ग्रन्थालय
दी, वाराणसी-५
अ: 2/136

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitization by eGangotri

॥ श्री [illegible] ॥

पद्मश्री संगीत मार्तंड पंडित श्री
गायनाचार्य ओंकारनाथ जी ठाकुर
यांस सप्रेम भेट:
ग. रा. तथा बाबुराव गोखले
दि. २४-१२-१९६२

अ: २/136
आम्नाय-ग्रन्थालय,
भारतनिधि, [illegible]
वाराणसी-5

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'विष्णु दिगंबर स्मारक समिती 'चें प्रकाशन

प्रथम पुष्प

माझें गुरुचरित्र

आम्नाय–ग्रन्थालय,
भदैनी, करौंदी
वाराणसी-5

लेखक
पं. विनायक नारायण पटवर्धन

[ह्या पुस्तकाचे पुनर्मुद्रणाचे, भाषांतराचे वगैरे सर्व हक्क विष्णु दिगंबर स्मारक समितीचे अध्यक्ष पं. विनायकबुवा ना. पटवर्धन यांचेकडे आहेत.]

सन १९५६] प्रथमावृत्ति [मूल्य २ रुपये

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लेखकाचें निवेदन

यस्यं सर्वे समारंभाः संगीतोद्धारहेतवे ।
तस्मै दिगंबरांशाय विष्णवे गुरवे नमः ॥

श्रीरामकृपेनें कै. गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांचें संक्षिप्त जीवन चरित्र 'माझें गुरुचरित्र' या नांवानें आज प्रकाशित होत आहे याबद्दल मला परमावधीचा आनंद होत आहे. वास्तविक पहातां पंडितजींच्या सर्व शिष्यांनीं स्थापन केलेल्या गांधर्व महाविद्यालय मंडळानेंच हें चरित्र-प्रकाशनाचें काम करावयास पाहिजे होतें. पंडितजींना स्वर्गवासी होऊन आज बरोबर २५ वर्षें होत आहेत, तेव्हां याच सुमारास हें चरित्र प्रसिद्ध व्हावें याच इच्छेनें माझ्या अल्पमतीप्रमाणें मी हें चरित्र आज प्रकाशित करीत आहें. पंडितजींचें हें चरित्र वाचून होतकरू गायकांना आणि संगीताच्या विद्यार्थ्यांना निश्चित कांहींना कांहीं तरी मार्गदर्शन होईल अशी मला आशा वाटते. अशीं चरित्रें वाचून संगीताचा अभ्यास करण्यास पूर्वीं किती अडचणी होत्या व आज त्यामानानें किती साधनें उपलब्ध आहेत आणि तरीसुद्धां पूर्वींसारखे गायक कां निर्माण होऊं शकत नाहींत ही गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे. नुकतीच स्थापन केलेली 'विष्णु दिगंबर स्मारक समिती' पुणें, हें पुस्तक प्रसिद्ध करून आपल्या कार्यास प्रारंभ करीत आहे. तेव्हां जनतेनें या समितीवर कृपादृष्टी ठेवावी अशी विनंती आहे. या चरित्रलिखाणाच्या कामांत चि. ना. वि. पटवर्धन, एम्.ए., संगीतप्रवीण यांचा वांटा बराच मोठा आहे. त्याचप्रमाणें या कामांत श्री.रा.शं. घोरपडे यांनीं सुद्धां फारच मदत केली आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत. हें प्रकाशन इतक्या थोड्या अवधींत करण्याचें सारें श्रेय समर्थ भारत छापखान्याचे चालक श्री.स.रा. सरदेसाई यांना आहे. म्हणून मी त्यांचा-देखील आभारी आहें. याखेरीज श्री. गं. वा. पिंपळखरे व चि. म. वि. पटवर्धन यांनीं चरित्रलेखनांत मला फार सहाय्य केलें, त्यांना आशिर्वाद देऊन माझें हें निवेदन मी पूर्ण करितों.

दि. १३।८।१९५६. विनायकबुवा ना. पटवर्धन.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आम्नाय-ग्रन्थालय,
भरतनिधि, करौंदी
वाराणसी-5

अर्पणपत्रिका

कै. श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन मिरज संस्थानाधिपति यांनीं
कै. गायनाचार्य बाळकृष्णबुवांना पदरीं ठेवून घेऊन,
संगीत विद्येचा झेंडा सर्व हिंदुस्थानभर फडकविणारे
कै. गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांच्यासारखे शिष्य
तयार करविले तीच परंपरा माझ्यापर्यंतहि कायम
ठेवली, त्यांच्या चरणीं व माझ्या
गुरुदेवांच्या स्मृतीस
हें ' माझें गुरुचरित्र ' पुस्तक
(कै. गु. पं. विष्णु दिगंबरांचें संक्षिप्त जीवन-चरित्र)
नम्र भावानें अर्पण करीत आहें.

सर्वांचा नम्र सेवक
विनायक नारायण पटवर्धन

आम्नाय-ग्रन्थालय,
भरतनिधि, करौंदी
वाराणसी-5

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझें गुरुचरित्र

अर्थात्

कै. गायनाचार्य गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांचें संक्षिप्त जीवन-चरित्र

प्रास्ताविक

संगीताच्या क्षेत्रांत युगप्रवर्तक म्हणून ज्या विभूतीचा उल्लेख करावा लागेल अशा एका असामान्य पुरुषाच्या चरित्राविषयीं व त्यांच्या कार्याविषयीं लिहिण्याचें ठरविलें आहे. समाजाचा संगीताबद्दलचा व गवयांबद्दलचा दृष्टिकोन बदलून टाकण्याचें महनीय कार्य करून टाकणारी ही थोर व्यक्ति म्हणजे कै. गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर होत. त्यांचा स्वर्गवास होऊन आज २२ वर्षें झालीं; पण त्यांचें कार्य त्यांच्या निधनानंतरहि अविरतपणें सुरू आहे. त्यांच्या चरित्राविषयीं व कार्याविषयीं अनेकांनीं यापूर्वीं लेखन केलें आहे, पण तें बहुधा प्रासंगिक स्वरूपाचें असें आहे. त्यांचें जीवनचरित्र असें अद्यापि प्रकाशित झालें नाहीं. तें माझ्या अल्पमतीनुसार लिहिण्याचा मी प्रयत्न करणार आहें.

एकादी थोर व्यक्ति दिवंगत झाल्यानंतर फार कालावधि लोटण्याचें आंतच त्या व्यक्तीचें चरित्र प्रसिद्ध झालें तर तें योग्य होय. कारण त्यामुळें त्यांच्या सहवासाचा लाभ घेतलेल्या व्यक्तींकडून खरी माहिती मिळूं शकते; व त्यामुळें त्या व्यक्तीच्या जीवनाविषयीं एकांगी किंवा विकृत असें लेखन होण्याची शक्यता नाहींशी होते. पण असें जर न झालें तर त्या व्यक्तीच्या कार्यानें भारावून गेलेल्या भक्तजनांच्याकडून त्यांच्या कार्याचें अतिशयोक्तिपूर्वक केलेलें वर्णन तरी वाचावयास मिळावयाचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

किंवा त्या व्यक्तीचें कार्य व त्यामुळें त्याला प्राप्त झालेला मोठेपणा सहन न होऊन त्या व्यक्तीचे टीकाकार बनलेल्या लोकांचे विकृत स्वरूपाचें लेखन वाचावयास मिळावयाचें अशी स्थिति निर्माण होते, आणि त्यामुळें समाजाला एका थोर व्यक्तीचें चरित्राचें खरेखुरें ज्ञान मिळूं शकत नाहीं. सुदैवानें कै. गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांचे बाबतींत असें होण्याची शक्यता नाहीं. कारण त्यांचें कार्य प्रत्यक्ष पाहिलेली अनेक मंडळी आज असून त्यांचें चरित्र साधारणपणें जनतेसमोर मांडतां येईल. त्यांची शिष्यशाखाहि संख्येनें, गुणवत्तेनें व कर्तृत्वानें खूप संपन्न आहे. त्यामुळें त्यांचें जीवनचरित्र लोकांचेसमोर मांडून त्यांचें चरित्रानें लोकांचे मनांत संगीताविषयीं आदर निर्माण करण्याचें कार्य यापूर्वींच व्हावयास पाहिजे होतें. पण कांहीं कारणास्तव तें आतांपर्यंत झालेलें नाहीं. तेव्हां ही उणीव भरून काढण्यासाठीं हें ‘ माझें गुरुचरित्र ’ प्रसिद्ध करावें असें ठरविलें आहे. कै. गायनाचार्य गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर हे माझे पूजनीय गुरुवर्य असल्यानें त्यांचा माझा दोन तपेपर्यंत सहवास झाला हें माझें मी भाग्य समजतो. या मला लाभलेल्या त्यांच्या सहवासामुळें त्यांचें चारित्राचा अभ्यास करण्याची मला संधि मिळाली व म्हणूनच त्यांचें चरित्र लोकांसमोर मांडण्याचें मी ठरविलें आहे. माझ्या गुरुवर्यांचे चरित्र मी लिहीत आहे या पवित्र भावनेनें जरी मी प्रेरित झालों असलों तरी त्यांच्या कार्याविषयीं अतिशयोक्ति न करतां शक्य तेवढी खरी व साधार माहितीच लोकांचेसमोर ठेवावयाची, असा प्रयत्न मी करणार आहें.

कै. गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांचा स्वर्गवास होऊन २० पेक्षां अधिक वर्षांचा काळ झालेला असला तरी ते आजपर्यंत त्यांच्या कार्यामुळें अमर आहेत व पुढेंही राहतील अशी वस्तुस्थिति आहे. मी त्यांच्या चरित्राविषयीं लिहिणें म्हणजे दिवटीनें सूर्याविषयीं सांगण्यासारखें आहे हें खरें. पण ज्या नव्या पिढीला कै. गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांच्या प्रत्यक्ष सहवासाचा लाभ झालेला नाहीं, त्यांना त्यांचे चरित्राचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मला दिसलेले जेवढे पैलू आहेत, तेवढ्यांचें तरी ज्ञान व्हावें व त्यापासून स्फूर्ति प्राप्त होऊन नव्या पिढींतील संगीताचें सेवक व रसिक संगीताच्या उद्धारासाठीं प्रयत्न करूं लागतील तर पहावें अशा उद्देशानें हा चरित्र-लेखनाचा उद्योग सुरू केला आहे.

यापेक्षां अधिक कांहीं प्रास्ताविक विवेचन न करतां आतां कै. गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांचें जीवन-चरित्रालाच सुरुवात केलेली बरी.

जन्म व बालपण

इ. स. १८७२ मध्यें श्रावण शुद्ध पौर्णिमेला (नारळी पौर्णिमा) रात्रीं ८ वाजतां कुरुंदवाड या गांवीं कै. गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांचा जन्म झाला. कुरुंदवाड हें एक छोटेसें संस्थान होतें. तें महाराष्ट्राच्या दक्षिणेकडे असून त्यावेळीं संगीताचें आगर म्हणून त्याची प्रसिद्धी होती. चरित्र-नायकाचे वडील कै. ह. भ. प. दिगंबर गोपाळ गाडगीळ हे पलुस गांवचे राहणारे असल्यानें व त्यांच्या पूर्वजांपैकीं कुणाला तरी नरसोबावाडी या क्षेत्राचे ठिकाणीं नारायणस्वामी नांवाच्या सत्पुरुषाचा दृष्टांत झालेला असल्यानें त्यांच्या घराण्यांतील लोकांना पलुसकर या नांवानेंच लोक ओळखत असत. अशा रीतीनें ईश्वरी कृपाप्रसाद लाभलेल्या घराण्यांत जन्म झालेल्या चरित्रनायकाला कुरुंदवाड संस्थानचे त्यावेळचे अधिपति कै. श्रीमंत दाजीसाहेब पटवर्धन यांच्याहि कृपेचा लाभ झाला. कै. श्रीमंत दाजीसाहेब यांचे सुपुत्र कै. श्री. नानासाहेब यांचेबरोबरच चरित्रनायकाचें इंग्रजी ५ वी ६ वी पर्यंत शिक्षण झालें. एवढेंच नव्हे तर त्यांनींच त्याचें लग्न देखील करून दिलें.

कै. विष्णु दिगंबर पलुसकर यांचे वडील कीर्तनकार होते व त्यांच्या साथीला ते व त्यांचे बंधु कै. गोपाळबुवा असे दोघेजण उभे रहात असत. कीर्तनकारांना ‘ बुवा ’ म्हणण्याची पद्धति आहे व कीर्तनकाराचा मुलगा पुढें कीर्तनकारच होणार अशा समजुतीनें लोकांनीं छोट्या ‘विष्णु’चा ‘विष्णुबुवा’

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केला. पुढें हाच गृहस्थ श्रेष्ठ कलावंत होणार याची कल्पनादेखील नसतांना लोकांनीं हें जें नामाभिधान दिलें तें निराळ्या अर्थानें पुढें यथार्थ ठरलें हा योगायोग मोठा विचित्र आहे एवढें खरें. असो. पहिल्यापासून विष्णुबुवांचा आवाज पहाडी असल्यानें लोकांचे मनावर त्यांच्या साध्या गायनाची देखील छाप पडत असे.

यावेळीं चारित्रनायकाचा आयुष्यक्रम ज्या तऱ्हेनें चाललेला होता यावरून चरित्रनायकानें आपल्या आयुष्यांत जें अलौकिक कार्य करून दाखविलें आहे तसें करून दाखवण्याची शक्यता नव्हती असेंच दिसतें पण जणूं संगीताचा उद्धार करण्यासाठींच परमेश्वरानें त्यांना जन्माला घातलें कीं काय कुणास ठाऊक ? नाहींतर या संगीतोद्धारक कै. पं. विष्णु दिगंबरजींचें ऐवजीं विष्णुबुवा एकादे कीर्तनकार व्हावयाचे किंवा इंग्रजी शिकून कारकून तरी व्हावयाचें पण ईश्वरानेंच आपल्या मनांत कांहीं निराळी योजना आखलेली असल्यानें एका विलक्षण घटनेमुळें चरित्रनायकाचा आयुष्याला वेगळें वळण लागलें.

ती विलक्षण घटना दत्तजन्माचे उत्सवाचे वेळीं घडली. दत्तजन्माचा उत्सव महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं होतो, पण नरसोबावाडी हें दत्तात्रयाचें स्थान अगदीं शेजारींच असल्यानें कुरुंदवाड या गांवीं तर तो उत्सव फार मोठ्या प्रमाणांत साजरा केला जात असे. अशा एका दत्तजन्माचे उत्सवाचे वेळीं शोभेची दारू उडवीत असतांना अपघात होऊन कै. विष्णुबुवांचे तोंड भाजलें व डोळ्यांवरही परिणाम झाला. यावर इलाज करण्याचे खूप प्रयत्न झाले. कुरुंदवाड येथें इलाज करतां येत नाहींत असें पाहून कै. श्रीमंत दाजीसाहेब पटवर्धनांनीं विष्णुबुवांना मिरजेस पाठवून दिलें व त्यांचेबरोबर त्यावेळचें मिरज संस्थानाधिपति कै. श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांना पत्र देऊन इलाज करविण्याची खटपट केली. पण याही खटपटीला यश आलें नाहीं. येणार कसें ? परमेश्वरी सूत्रें कशीं चालतात हें आपल्याला कसें कळणार ? असो. मिरजेच्या डॉ. भडभडे यांनीं झालेल्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शारीरिक दुखापतीमुळें डोळ्यांवर जो परिणाम झाला होता त्यामुळें डोळ्याचा उपयोग करून जें शालेय शिक्षण घ्यावयाचें तें यापुढें सोडून द्यावें असा सल्ला दिला. कीर्तनकाराचा मुलगा असल्यानें व यापुढें शालेय शिक्षण घेणें डोळ्याच्या अधूपणामुळें शक्य नसल्यानें त्यानें गाण्याचा अभ्यास करावा असेंही त्या डॉक्टरांनीं सुचविलें. परमेश्वरानेंच त्यांचे मनांत ही सूचना करण्याची प्रेरणा दिली असें म्हणण्यावांचून गत्यंतर नाहीं. कारण असें सुचविलें गेलें नसतें तर आज जें त्यांचें कार्य आपल्या-समोर आहे तें त्यांचे हातून कसें घडलें असतें ? पण परमेश्वराला त्यांचें हातून तें कार्य करवून घ्यावयाचें असल्यामुळेंच ही विलक्षण घटना घडली व त्यामुळें कै. विष्णुबुवा गायनाकडे वळले. सामान्य माणसाच्या दृष्टीनें इतक्या लहान वयांत डोळे अधू होणें ही दुःखद वाटणारी घटना घडली असती तर त्या विधिघटनेचें कौतुक झालें नसतें. पण पुढील आयुष्यांत कै. विष्णुबुवांनीं जें असामान्य कर्तृत्व दाखविलें त्यामुळें या विचित्र घटनेंचेही आनंदपर्यवासी परिणामामुळें कौतुकच वाटतें. असो.

अशा प्रकारें गाण्याचें शिक्षण द्यावें असा डॉक्टरांचा सल्ला मिळतांच त्यासंबंधीं घरीं विचार सुरू झाला व गाण्याचें शिक्षण कसें द्यावें, कुणा-जवळ द्यावें याविषयीं विचार सुरू झाला. घरची परिस्थिति तितकीशी अनुकूल नसल्यानें हा प्रश्न कशा रीतीनें सोडवावा अशी विवंचना घरच्या मंडळींना लागली. पण कै. श्री. दाजीसाहेब हे यावेळीं पुन्हां मदतीला उभे राहिले व त्यांनीं कै. विष्णुबुवांचे शिक्षणासंबंधीं व्यवस्था करण्याचें ठरविलें. कै. श्री. दाजीसाहेब व कै. श्री. बाळासाहेब पटवर्धन (त्यावेळचे मिरज संस्थानाधिपती) हे दोघे नातेवाईक होते, व त्याच सुमारास कै. गायनाचार्य पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे मिरजेला श्रीमंत राजेसाहेब यांचेकडेच होते. तेव्हां कै. विष्णुबुवांनीं श्रीमंत बाळा-साहेब पटवर्धन यांचेकडे राहून कै. गायनाचार्य बाळकृष्णबुवांचे जवळ शिकावें अशी योजना कै. श्री. दाजीसाहेबांनीं घरच्या मंडळींना सांगून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याप्रमाणें वयाच्या १५ व्या वर्षी केवळ दैवयोगानें कै. विष्णुबुवा हे गाणें शिकण्यासाठीं मिरजेला येऊन राहिले.

कै. गायनाचार्य पं. बाळकृष्ण बुवांचेसारखा विद्वान् पण प्रेमळ असा गुरु लाभणें व कै. श्री. बाळासाहेब पटवर्धन यांचेसारखा अत्यंत उदार, प्रेमळ व कडक शिस्तीचा भोक्ता असा आश्रयदाता मिळणें या दुहेरी लाभामुळें चरित्रनायकाचें आयुष्यास वेगळेंच वळण लागलें. त्यांच्या कार्याचा खराखुरा पाया या दोघांच्या सहवासामुळें व शिक्षणामुळेंच घातला गेला असें म्हटल्यास मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं.

संगीताच्या शिक्षणास सुरुवात

१८८७ ते १८९६ सालापर्यंतचा काळ मिरजेच्या दृष्टीनें फार लौकिकाचा होता. विशेषत: संगीताच्या बाबतींत तर तो अधिकच मोलाचा होता असें म्हणावयास हरकत नाहीं. श्रीमंत मिरजकरांना अनेक कलांची व विद्यांची आवड होती व त्यामुळें पुष्कळ कलावंत या काळांत मिरजेस येत असत. गायन व मल्लविद्या या दोन गोष्टींना तर श्रीमंत मिरजकरांचा विशेष स्वरूपाचा आश्रय मिळत असल्यानें त्या दोन विद्येंत पारंगत अशा श्रेष्ठ व्यक्ती मिरजेस नेहमीं येत. शिवाय गायनाचार्य कै. पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचेसारखे अत्यंत विद्वान गायक त्यावेळीं मिरजकरांचे पदरीं असल्यानें मिरजेच्या लौकिकांत अधिकच भर पडली. अनेक गायक-वादकांच्या बैठकी तर त्यावेळीं मिरजेस होत असतच पण त्याचबरोबर कै. पं. बाळकृष्णबुवांच्या विद्यादानामुळें मिरज हें त्यावेळचें संगीताच्या शिक्षणाचें एक प्रमुख केंद्र म्हणून मान्यता पावलें होतें. मिरजेंत त्यावेळीं घरोघरीं गाण्याचा अभ्यास चाललेला दिसत असे व कांहीं लोक मिरजेला त्यावेळीं ' गंधर्व नगरी 'ची उपमा देत असत. या वर्णनांतील अतिशयोक्तीचा भाग वगळला तरी देखील संगीताच्या अभ्यासकाला अत्यंत पोषक असें वातावरण त्यावेळीं मिरजेला होतें व अशा अनुकूल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वातावरणांत कै. पं. विष्णु दिगंबरजींना शिक्षण घेण्याची संधी मिळाल्यानें त्यांची प्रगति खूप झपाट्यानें झाली.

शिवाय श्रीमंत मिरजकर हेही वारंवार विचारपूस करून व कै. बाळकृष्णबुवांना शिकविण्याबद्दल एक प्रकारचा प्रेमाचा तगादा लावून कै. विष्णुबुवांच्या शिक्षणाबद्दल विशेष काळजी घेत असत. रोज काय शिक्षण झालें याची चौकशी श्रीमंत मिरजकर करीत असत व कै. विष्णुबुवा अभ्यास करतात कीं नाहीं व त्यांना योग्य तऱ्हेनें शिक्षण दिलें जातें कीं नाहीं या दोन्ही गोष्टींबद्दल त्यांचे फार बारकाईनें लक्ष असे. असा दक्ष व हितचिंतक आश्रयदाता मिळणें हें फार थोड्यांच्या वांट्याला येणारें भाग्य आहे पण कै. विष्णुबुवांचें भाग्य खरोखरीच थोर म्हणूनच त्यांना प्रेमळ पण दक्ष असा आश्रयदाता व विद्यासंपन्न गुरु असा दुहेरी लाभ एकाच वेळीं झाला.

कै. विष्णुबुवांचेबरोबर त्यावेळीं कै. गायनाचार्य गुंडूबुवा औंधकर, गायनाचार्य पं. अनंत मनोहर जोशी ही पुढें प्रसिद्ध झालेली मंडळी व इतरही अनेक लोक कै. बाळकृष्णबुवांचेकडे शिकत असत. कित्येक नायकाही (नायकिणींच्या मुली) कै. बाळकृष्णबुवांचेकडे शिकत असत.

याचवेळीं विष्णुपंत छत्रे (सर्कसवाले) हे कै. रहिमतखांसाहेबांना घेऊन आले होते व ते मिरजेपासून अगदीं जवळच अशा कुरुंदवाडला राहात असत. कै. विष्णुपंत छत्रे यांनीं ग्वाल्हेरच्या कै. हद्दूखांसाहेबांचेजवळ थोडें शिक्षण घेतलेलें होतें. कै. रहिमतखांसाहेब हे हद्दूखांसाहेब यांचे चिरंजीव असल्यामुळें कै. विष्णुपंतांना साहजिकच त्यांचेबद्दल विशेष आपुलकी वाटत असे व म्हणूनच त्यांना घेऊन ते कुरुंदवाडला घेऊन राहिले होते. कुरुंदवाडला कै. रहिमतखांसाहेबांचे जवळ त्यावेळीं कै. आबा दीक्षित, पं. बाळंभटजी, पं. नानाबुवा लेले इ. मंडळी शिक्षण घेत असत. या सर्वांना प्रत्यक्ष शिक्षण हें कै. रहिमतखांसाहेबांचें मागें तंबोऱ्याच्या साथीला बसून मिळत असें तेवढेंच. पण या गोष्टीचा श्रीमंत मिरजकरांनीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

फायदा करून घेतला. “ कुरुंदवाडची मंडळी तयार होत आहेत. तेव्हां तुम्हींही आपल्या शिष्यांना चांगले तयार केलें पाहिजे ” असें कै. बाळकृष्णबुवांना कै. मिरजकर चिडवीत व त्या चिडविण्याचा फायदा चरित्रनायकाला व त्यावेळच्या त्याच्या सहाध्यायांना खूपच मिळाला. दोन पहिलवानांत जशी आपआपले ‘ पट्ठे ’ तयार करण्याची अहमहमिका लागलेली असते तशीच दोन गवयांमध्यें लागल्याकारणानें आपआपले शिष्य अधिक तयार व्हावेत अशी चुरशीची भावना निर्माण होऊन शिष्यांचा त्यांना लाभणाऱ्या विद्येच्या दृष्टीनें अधिक लाभ होईल ही गोष्ट लक्षांत घेऊन कै. मिरजकरांनीं कै. बाळकृष्णबुवांचेकडून विद्यादानाचें कार्य अधिक जोमानें आणि उत्साहानें करवून घेतलें. याचा फायदा चरित्रनायकाला तर विशेषच मिळाला. कारण इतक्या काळजीपूर्वक व उत्साहानें मिळणाऱ्या शिक्षणाला स्वतःच्या मेहनतीची जोड दिली पाहिजे हें लक्षांत घेऊन त्यानें स्वतंत्रपणें गाण्याची मेहनत सुरू केली.

गाण्याचा अभ्यास

कै. विष्णुबुवांच्या गाण्याच्या अभ्यासाचे वर्णन जें मी पुढें देणार आहे तें त्यांनीं अभ्यासाचें जें वर्णन आम्हां शिष्यांना अभ्यास कसा करावा हें सांगतांना सांगितलेलें आहे त्यावर आधारलेलें आहे. अर्थातच त्या वर्णनाची सत्यता त्याकाळीं मिरजेंत राहणाऱ्या अनेक लोकांचेकडून पडताळून पाहण्याची संधीही लेखकाला मिळाली आहे. कै. रा. रा. गणपतराव काळे मास्तर, (कै. श्रीमंत मिरजकरांच्या मुलांचे त्यावेळचे शिक्षक) कै. दत्तोपंत आंब्रेडेकर, बडोद्याचे कै. रा. रा. महाबळ व इतर अनेक लोकांचेकडून जी माहिती लेखकाला मिळाली आहे तिच्या आधारानेंच कै. पंडितजींच्या अभ्यासाचें वर्णन करण्याचें ठरविलें आहे. कै. पंडितजी हे स्वतः जेव्हां गाण्याच्या अभ्यासाबद्दल हकीगत सांगत असत तेव्हां आम्हां शिष्यमंडळींत गाण्याची मेहनत करण्याविषयीं ईर्षा उत्पन्न

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होत असे. तशाच प्रकारची स्फूर्ति नवीन होतकरू गायकांना गाण्याच्या अभ्यासाचें वर्णन वाचून मिळेल अशी खात्री वाटते.

आजकालच्या विद्यार्थ्यांच्या मानानें त्यावेळीं संगीताचे शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नव्हत्या. गुरुमुखांतून प्राप्त होणाऱ्या विद्येखेरीज दुसरें कोणतेंही सहाय्य विद्यार्थ्यांना मिळत नसे. हल्लीं उपलब्ध आहेत तशीं स्वरलेखन केलेल्या चिजांचीं पुस्तकें त्यावेळीं नव्हतीं. शास्त्रीय चिकित्सा किंवा रागांची वर्ज्यावर्ज्य, वादीसंवादी, आरोहावरोह इत्यादि माहिती सांगणारीं पुस्तकेंही नव्हतीं. त्यामुळें गुरुजी जसें गातात, तसें आपण गावयाचें एवढाच गाण्याच्या अभ्यासाचा अर्थ होता. यामुळें विद्यार्थ्यांचेसमोर एकच आदर्श राहून अत्यंत निष्ठापूर्वक असा व्यासंग विद्यार्थ्यांचेकडून होत असे. इतर साधनें उपलब्ध नसल्यानें गाण्याचा अभ्यास करणें हें हल्लींपेक्षां अधिक कष्टसाध्य होतें हें खरें, पण अशा बिकट परिस्थितींतही त्यावेळच्या लोकांनीं व चरित्रनायकानें जो अत्यंत निष्ठेनें, तळमळीनें व परिश्रमपूर्वक अभ्यास केला त्यापासून आजच्या काळांतील विद्यार्थ्यांना खूपच शिकण्याजोगें असून त्याचा योग्य तो फायदा ते घेतील अशी खात्री वाटते.

कै. विष्णुबुवांचा आवाज जात्याच मोठा असल्यामुळें आवाजाला नैसर्गिकरीत्या फिरत मुळींच नव्हती. पण ती त्यांनीं अत्यंत कष्टानें साध्य केली. लहान लहान तानांचा त्यांनीं प्रथम अभ्यास सुरुवात केली. प्रथमतः अगदीं सावकाश गतींत ताना घेत त्यांचा स्पष्टपणा कायम राहील अशी खबरदारी बाळगून त्याच तानांची गति हळूहळूं वाढविण्यास सुरुवात केली. एकेक तान अनेकदां घोटून आत्मसात करण्यासाठीं अविश्रांत खटपट करून स्वतःच्या आवाजाचा नैसर्गिक जाडपणा तानक्रियेच्या आड न येईल एवढी तान सफाईनें व दाणेदारपणानें फिरूं लागली तेव्हां त्यांनीं आपला अभ्यास योग्य रीतीनें चालूं आहे असें ठरवून रोज २–३ तास मेहनत केवळ आवाज फिरण्यासाठीं चालूं ठेविली. केवळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

फिरत यावी म्हणून एवढा अभ्यास करून कांहीं गाण्याच्या अभ्यासाची परिपूर्ति होत नाहीं. याखेरीज गुरुजींच्याकडून मिळालेल्या चिजा पाठ करण्याचा अभ्यास दररोज सुमारें २–३ तास करावा लागतच असे. गुरुजींनीं चीज जशी सांगितली असेल तशीच्या तशी कंठगत करण्यासाठीं त्या चिजांचे योग्य तऱ्हेनें आकलन व अनुकरण, मग त्यांचे मनन व शेवटीं पाठांतर या सर्व गोष्टी होणें आवश्यक आहे. गुरुमुखांतून विद्या ग्रहण केल्यामुळें चीजेंतील सर्व बारीकसारिक खाचाखोंचा व स्वरांचे गमक, मींड इत्यादि सर्व अलंकारिक योजना यांचा प्रत्यक्ष परिचय होत असे व त्या सर्व गोष्टी तशाच स्वरूपांत कायम राहाव्यात यासाठीं खूपच परिश्रम करणें जरूर होतें व यासाठीं दररोज २–३ तास एवढा वेळ कै. विष्णुबुवा घालवीत असत. चीजा शुद्ध स्वरूपांत व गायकीचा गोडवा कायम राहील अशा पद्धतीनें कंठगत करण्यासाठीं दररोज एवढा वेळ चरित्रनायक खर्चीत असत याचें हल्लींच्या विद्यार्थ्यांनीं जरूर लक्षांत घ्यावयास हवें. कोणतीही चीज शुद्ध स्वरूपांत आज ऐकावयास मिळणें दुरापास्त होत चाललें आहे. चीजांचे पाठांतर ही गोष्ट आज विद्यार्थ्यांना नकोशी वाटूं लागली आहे. पण चीजांच्या संग्रहानेंच रागाचें स्वरूप वेगवेगळ्या प्रकारांनीं आत्मसात् होऊं शकतें हें विद्यार्थ्यांनीं विसरूं नये व म्हणूनच शिकलेल्या चीजा पूर्णपणें आत्मसात् करण्यासाठीं चरित्रनायकानें व त्या वेळच्या इतर गवयांनीं जे परिश्रम घेतले आहेत त्यांचा आदर्श जरूर ठेवावा असें सुचवावेंसें वाटतें.

अशा रीतीनें आवाजाची मेहनत व चिजांचे पाठांतर याशिवाय स्वरसाधन व शिकविलेल्या रागांचीं स्वरूपें प्रत्यक्ष गाण्यांत उतरविण्या-इतकी आत्मसात् होण्यासाठीं वेगळा अभ्यास करावा लागत असे. स्वरांचा सच्चेपणा व आवाजांत वजनदारपणा आणि तेज प्राप्त करून घेण्यासाठीं नियमितपणें स्वरसाधन करावें लागतें. चारित्रनायकानें या गोष्टीसाठीं किती श्रम घेतले असतील याचीं कल्पना त्यांचा आवाज ज्यांनीं प्रत्यक्ष

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ऐकला असेल त्यांना खास येईल. अत्यंत मोठा पण तितकाच भावनाकुल व मधुर असा त्यांचा आवाज हें त्यांच्या नैसर्गिक गुणांबरोबरच स्वर-साधनेचेंही फळ होय हें विसरतां कामा नये. त्यांच्याइतका जोरदार आवाज तर क्वचितच ऐकावयास मिळेल. आवाजांतील हें असामान्य तेज व आवाजावरील त्यांनीं मिळवलेली हुकमत ही त्यांच्या अभ्यासाचीच साक्ष देतील. गुरुंनीं सांगितलेल्या रागांचा विस्तार हाही कंठगत करण्या-साठीं निराळा अभ्यास करावा लागत असे. रागविस्ताराची जी कल्पना गुरुजी देत असत ती तेव्हांचे तेव्हां आत्मसात् होणें शक्यच नसे. कारण गुरुजींच्या अनुकरणाशिवाय दुसरीं कोणतींही साधनें उपलब्ध नव्हतीं. त्यामुळें रागांचीं स्वरूपें समजावून घेऊन त्यांचे मनन करणें, प्रत्यक्ष गाऊन ती कंठगत करणें या गोष्टीसाठींही दररोज २-३ तास द्यावे लागत. अशा रीतीनें रोजच्या शिक्षणाखेरीज स्वतःच्या अभ्यासासाठीं रोज ८-९ तास घालवावयाचे व तेंही सतत ४-५ वर्षें ! यावरून गाण्याच्या अभ्यासाचें व चरित्रनायकाच्या परिश्रमाचें खरें स्वरूप कळून येईल. इतक्या परिश्रमानें मिळविलेली विद्या तेजस्वी व दिव्य अशी राहिली तर त्यांत नवल तें काय आहे !

शेवटीं शेवटीं तर कै. बाळकृष्णबुवांचे शिकवण्याचें तास वाढूं लागले व कै. विष्णुबुवांना स्वतःच्या अभ्यासासाठीं वेळ कमी पडूं लागला. तेव्हां रात्रीं झोपण्याचें बंद करून संध्याकाळीं ७ वाजल्यापासून पहाटेपर्यंतच नव्हे तर अगदीं सकाळीं ७ वाजेपर्यंत अशी १२-१२ तास मेहनत त्यांनीं केली. ज्या घरांत कै. पंडितजी गाण्याचा अभ्यास करीत असत त्या घराच्या जवळपास राहणाऱ्या लोकांना हा त्रास नकोसा वाटूं लागला व त्यांनीं पंडितजींना तेथून घालविण्याची खटपट सुरू केली. घरमालकाकडून तें घर दुसऱ्याला भाड्यानें देवविण्याचाही प्रयत्न केला. आतां हें घर आपल्या हातून जाणार व त्यामुळें आपल्या अभ्यासांत व्यत्यय येणार असें दिसतांच पंडितजींनीं त्या घरांत भुताटकी असल्याचा खोटाच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गवगवा सर्वत्र पसरवला. अर्थातच या गोष्टीचा परिणाम होऊन कोणीही भाडेकरू त्या घरांत राहावयास येईना. कै. पंडितजींचा अभ्यास मात्र अशा रीतीनें अखंडपणें चालू राहिला. लोकांच्या मनांत त्यांनीं पसरविलेला भुताटकीचा गैरसमज इतका दृढ झाला होता कीं पुढें अनेक वर्षे तें घर तसेंच रिकामें पडून होते हें प्रत्यक्ष लेखकानें पाहिलेलें आहे.

रात्रीं झोंपतेवेळीं पंडितजींचें गाणें चालू आहे, पहाटे उठावें तरी गाणें चालूच आहे व त्यानंतर २-३ मैलावरील कृष्णा नदीचें स्नान करून परत यावें तेव्हांही त्यांचा गाण्याचा अभ्यास सुरु आहे असा ज्यांनीं प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे अशा लोकांच्याकडून लेखकाला माहिती मिळालेली आहे.

त्यावरून पंडितजींची रात्रभर मेहनत चालत असे या गोष्टीस बळकटी प्राप्त होते.

अशा रात्रभर चालणाऱ्या अभ्यासानें व त्याच वेळीं अत्यंत काळजी-पूर्वक असें शिक्षण प्राप्त होत असल्यामुळें कै. पंडितजींच्या गाण्याला कांहीं निराळेंच तेज चढलें. इतर गुरुबंधूंपेक्षांही त्यांच्या गाण्यावर श्रोते खूष होत असत. आपल्या गुरुजींच्या गाण्याची हुबेहूब नक्कल त्यांच्या गाण्यांत दिसूं लागली. कै. पंडितजींनीं आपल्या गुरुजींचें गाणें किती आत्मसात् केलें होतें हें प्रत्यक्ष ऐकण्यास मिळण्याचें भाग्य लेखकाला निदान ८–१० वेळीं तरी लाभलेलें आहे. कै. पंडितजी जेव्हां आपल्या गुरुजींच्या पाठीमागें तंबोरा घेऊन साथीला बसत त्यावेळीं अशी संधि मिळत असे.

कै. गायनाचार्य पं. बाळकृष्णबुवांचा आवाज खूप पल्लेदार व जोरदार खरा पण कै. पंडितजींच्या आवाजाइतका दांडगा नव्हता. कै. पंडितजींच्या आवाजाची रुंदी (Volume) कांहीं विलक्षण होती. इतकी कीं त्यांचा आवाज म्हणजे जणूं तोफेचा गोळा किंवा मेघगर्जनाच आहे असा भास निर्माण होई. कै. श्रीमंत मिरजकरांचेजवळ कै. बाळकृष्णबुवांनीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कै. पंडितजींच्या आवाजाची अनेक वेळीं तारीफ केली व त्यांचा आवाज वडे महंमदखांचे आवाजासारखा वाटतो असेंही त्यांनीं उद्‌गार काढल्याचें लेखकास माहीत आहे. अशाच तऱ्हेचे उद्‌गार कै. पंडितजी ग्वाल्हेरला गेले असतां तेथील लोकांनीं काढले. "हमारे ग्वालियर का गाना और यह दखनी पंडित सुना रहा है यह कितना आश्चर्य है!" अशा प्रकारच्या उद्‌गारांवरून कै. पंडितजींनीं शिक्षण व स्वतःचा अभ्यास यांचे जोरावर कशा प्रकारची विद्या मिळविली होती याची वाचकांना कल्पना येऊं शकेल.

या कै. पंडितजींच्या व्यासंगाचे श्रेय जरी त्यांच्या स्वतःच्या अभ्यासाला असलें तरीदेखील त्या यशाचे आधार म्हणून कै. गा. पं. बाळकृष्णबुवा यांचें सुयोग्य मार्गदर्शन व कै. श्रीमंत मिरजकरांचा आश्रय या दोन गोष्टींचा उल्लेख केल्याशिवाय भागणार नाहीं. खुद्द कै. पंडितजींनाही ही गोष्ट मान्य होती एवढेंच नव्हे तर त्या दोघांच्या उपकाराचें ऋण त्यांनीं अत्यंत कृतज्ञपणें व्यक्त केल्याचें लेखकानें स्वतः ऐकलेलें आहे. गुरुकडून प्राप्त होणारी शुद्ध विद्या व त्यांचेकडून मिळणाऱ्या सूचना या दोन्हींशिवाय शिष्याची प्रगति होणें कठीण आहे पण कै. पं. बाळकृष्णबुवांचेसारखे अत्यत विद्वान् व विद्यादानांत अत्यंत निष्कपट वृत्तीचे असे गुरुवर्य लाभल्यामुळें कै. पंडितजींना अपार असें विद्याधन सांठवितां आलें.

गुरुजींचें मार्गदर्शन मिळत असतां व त्याचवेळीं स्वतःचा अभ्यास खूप जोरानें सुरू असतां खाण्यापिण्याची विवंचना कै. श्रीमंत मिरजकरांचेमुळें कै. पंडितजींना कधींच करावी लागली नाहीं. केवळ खायलाप्यायला देऊनच कै. श्री. मिरजकर थांबले नाहींत तर गवई वर्तनानें शुद्ध, निर्व्यसनी व व्यवहारी व्हावा अशी दृष्टि कै. पंडितजींना त्यांनीं दिली. कै. पंडितजींच्या गाण्याच्या अभ्यासाबरोबरच त्यांच्या वर्तनाबद्दलही अगदीं पितृतुल्य अशी काळजी कै. श्रीमंत मिरजकरांनीं घेतली व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यामुळेंच कै. पंडितजी स्वतः व त्यांची शिष्यपरंपरा गायकांबद्दलचा सामाजिक दृष्टिकोन बदलविण्याचें कार्य होऊं शकलें हें मान्य करावें लागेल. कै. श्रीमंत मिरजकरांनीं या बाबतींत एवढी तत्परता दाखविली नसती तर आज जो कै. पंडितजींच्या कार्याचा इतिहास दिसतो आहे तो एकादेवेळीं वेगळ्याच स्वरूपाचा झाला असता.

पंडितजींवर गुरुजींचा प्रेमाचा राग

अशा तऱ्हेनें पंडितजींचा अभ्यास चालू असतां ते कै. बाळकृष्णबुवांच्या मागें साथीसाठीं तंबोरा घेऊन बसत असत. कुरुंदवाड, सांगली, इचलकरंजी, कोल्हापूर, निपाणी, बावडा, सातारा इत्यादि ठिकाणीं बुवासाहेबांच्याबरोबर पंडितजी हिंडले. पुष्कळ ठिकाणच्या मंडळींनीं शिष्यवर्ग चांगला तयार केल्याबद्दल कै. बाळकृष्णबुवांना धन्यवाद दिले. कांहीं लोक मात्र याच कारणासाठीं त्यांचा द्वेषही करूं लागले. कै. श्रीमंत मिरजकरांनीं ज्या कारणासाठीं कै. बाळकृष्णबुवांना इर्षेला घातलें होतें त्या खांसाहेब रहिमतखांसाहेबांचेजवळ शिकून तयार झालेल्या मंडळींबरोबर कुरुंदवाड येथें सामना झाला. परंतु कै. बाळकृष्णबुवांचे शिष्यमंडळींसमोर खांसाहेबांच्या शिष्यवर्गाचें मुळींच तेज पडेना. कारण एक तर असे कीं प्रत्यक्ष शिक्षण देण्याइतकी मनःस्थिति खांसाहेबांची नव्हती त्यामुळें त्यांचें मागें तंबोरा घेऊन बसून त्याचें अनुकरण करणें एवढेंच काय तें त्यांच्या शिष्याचें शिक्षण ! त्यामुळें त्यांच्या शिष्यमंडळींचा प्रभाव कुरुंदवाडचे बाहेर कुठेंच पडूं शकला नाहीं. त्यांच्या शिष्यमंडळींपैकीं पं. बाळंभटजी, कै. अबा दीक्षित व पं. नाना बुवा लेले हे तीन लोकच विशेष उल्लेखनीय होत.

मिरजेला कै. बाळकृष्णबुवांचेजवळ शिकणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांला आपआपली छाप पाडण्याची आकांक्षा असे. तशीच महत्त्वाकांक्षा पंडितजींच्या मनांतही त्यावेळीं निर्माण झालेली होतीच. एक तर तरुण वय. त्यांत विद्याव्यासंग व जबरदस्त अभ्यास यामुळें स्वतःच्या गुणाविषयीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

निर्माण झालेला आत्मविश्वास यामुळें त्या महत्त्वाकांक्षेला तीव्र स्वरूप प्राप्त झालें होतें. याचें प्रकट स्वरूप पंडितजी कै. बाळकृष्णबुवांचे साथीला बसत त्यावेळीं न कळत व गुरुजींचा अपमान करण्याचा मनांत मुळींच हेतू नसतांही कित्येक वेळीं व्यक्त होत असे. गुरुजींचा तेजोभंग व्हावा अशी इच्छा नसतांना देखील कित्येक वेळीं गाण्याचे भरांत गुरुजी ज्या स्वरापर्यंत जातील त्याचे वरच्या स्वरापर्यंत पंडितजींनीं तान घ्यावी. गुरुजींनीं त्याचे वरचे स्वर गांठावा तर त्याचे पलीकडे जाऊन पंडितजींनीं आपला आवाज भिडवावा असा प्रकार सुरू होत असे. श्रोत्यांना त्यामुळें आनंद कशा प्रकारचा होत असेल याची नुसती कल्पनाच केलेली बरी ! आजकालच्या श्रोत्यांना तर अशा प्रकाराची केवळ कल्पनाच करणें भाग आहे. आपल्या शिष्यमंडळींना साथीला घेऊन बसण्याची प्रथाच आजकाल कमी होत चालली आहे. कोणीतरी तंबोरा वाजविण्यासाठीं दोघेजण मागे असले कीं झालें ! त्यांनीं गावें अशी अगोदर अपेक्षाच नसते. त्यांतून त्यांनीं गाण्याचा प्रयत्न केलाच तर त्यांचा मानभंग करून स्वतःचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याकडेच गवयांची प्रवृत्ति दिसते. स्वतः तयार केलेल्या शिष्यांना स्वतःबरोबर मैफलींत गावयास लावावयाचें म्हणजे परिश्रमपूर्वक तयार केलेला शिष्यवर्गही हवा व शिष्यांचे कौतुक करण्या-इतका मनाचा मोठेपणाही हवा. गुरुशिष्यांचा एक प्रकारचा असा प्रेमाचा सामना पाहण्याचें भाग्य पूर्वींच्या पिढीतील ज्या श्रोत्यांना लाभलें असेल त्यांना माझ्या या विचारांतील मर्म नीटपणें कळूं शकेल अशी खात्री वाटते. असो. एवढें विषयांतर पुरें करून मूळ विषयाकडे वळूं या.

कै. बाळकृष्णबुवांचेबरोबर गातेवेळीं अशी वरचढ करण्याचा प्रसंग अगदीं सहजगत्या पंडितजींच्या हातून ४-५ वेळीं घडल्यावर व त्याबद्दल इतर मंडळींनीं कै. बाळकृष्णबुवांचे मनांत विष कालविल्यामुळें त्यांनाही पंडितजींचा राग येऊं लागला—अर्थात् तो रागही शिष्याबद्दलच्या प्रेमांतून व तळमळींतूनच निर्माण झालेला असे हें मात्र खरें. "आतांशा विष्णु

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अगदीं बेफामपणें गायला लागला आहे. माझ्यासुद्धां वरचढ गाऊं लागला आहे" असें उद्‌गार कै. बाळकृष्णबुवांनीं रागावून काढतांच पंडितजींना फार वाईट वाटलें. आपल्या मनांत गुरुजींचा अपमान करण्याची मुळींच इच्छा नसतांना देखील आपल्या हातून घडलेल्या चुकीबद्दल पंडितजींना वाईट वाटणें अगदीं स्वाभाविक होतें.

अशा प्रकारांनीं कै. बाळकृष्णबुवांच्या मनांत मात्र पंडितजींच्याबद्दल एक प्रकारचें किल्मिष निर्माण झालें व इतरांच्या सांगण्यामुळें तर त्यांत अधिकच भर पडत जाऊन कै. बाळकृष्णबुवांनीं पंडितजींना साथीसाठीं परगांवीं नेण्याचें बंद केलें. तरी पण कै. श्री. मिरजकरांचे पदरीं असल्या-मुळें त्यांच्या आग्रहास्तव पंडितजींना साथीला घेऊन कै. बाळकृष्णबुवांना गावें लागत असे. अगोदरच पंडितजींच्याबद्दल मनांत गैरसमज निर्माण झालेला व त्यांतून एकादें वेळीं कै. श्री. मिरजकरांनीं खूण करतांच गाण्याच्या तंद्रींत इतर गोष्टींचें भान न राहून पंडितजींनीं गुरुजींचेपेक्षां वरचा स्वर लावावा असा प्रकार घडत असे. कै. श्री. मिरजकरांचा पंडितजींना खुणावण्यांत वाईट हेतू मुळींच नसे. शिवाय त्यांना पंडितजींचे-बद्दल कै बाळकृष्णबुवांचा कांहीं गैरसमज झाल्याचेंही माहित नव्हतें. त्यामुळें केवळ दोघांत चुरस निर्माण होऊन अधिक रंगतदार गाणें ऐकावयास मिळावें अशी एक इच्छा त्यांचे मनांत असे व ज्या मुलाला शिक्षण देण्यासाठीं आपण आपल्याकडे ठेवून घेतलें त्यानें किती तयारी केली आहे तें प्रत्यक्ष पहावयास मिळावें असें त्यांना वाटत असे. कै. बाळकृष्णबुवांचा अपमान करावा असें त्यांचे मनांत देखील येणें शक्य नाहीं इतका त्यांचेबद्दल त्यांना मनापासून आदर वाटत असें हें लेखकाला माहीत आहे.

पण असे प्रकार वारंवार घडूं लागल्यामुळें कै. बाळकृष्णबुवांचे मनांत आपल्याबद्दल गैरसमज निर्माण होत आहे हें पाहून आतां मिरजेंत राहणें बरें नव्हे असा विचार करून त्यांनीं मिरजेबाहेर पडण्याचा निश्चय केला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कैं. गायनाचार्य पं. विष्णु दिगंबर पलुसकर

संस्थापक : गांधर्व महाविद्यालय.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मिरजबाहेर प्रयाण

मिरज सोडण्याचा निश्चय केला खरा पण तो प्रत्यक्षांत कसा आणावा ही विवंचना होतीच! श्रीमंत मिरजकरांना सांगून व त्यांची परवानगी घेऊन जावें, तर त्यांची मान्यता या गोष्टीस मिळणें कठीण व त्यांचे साहाय्याखेरीज बाहेर पडावयाचें म्हणजे त्यांचा रोष पत्करावा लागला असता व पैशाचीही व्यवस्था करावी लागली असती, अशा तऱ्हेच्या पेंचांत ते सांपडले होते!! पण त्यांचे एक गुरुबंधु व प्रस्तुत लेखकाचे चुलते कै. केशवरावजी पटवर्धन यांच्या मदतीमुळें पैशाची व्यवस्था होऊं शकली. अर्थात् त्यांचेकडून पैसे घेतांनाही हे पैसे कशासाठीं हवे आहेत, यासंबंधीं बरीच गुप्तता राखण्यासंबंधीं काळजी घ्यावी लागलीच. नाहींतर सगळी तयारी वायां जाऊन मिरजेबाहेर पडण्याचा बेत सफल झाला नसता. कै. केशवरावजींनीं आपल्या वडिलांचेकडून पैसे मिळविले खरे, पण ते कशासाठीं पाहिजेत याचा सुगावा त्यांनीं लागूं दिला नाहीं. पैशाची व्यवस्था कशीबशी झाली व मिरजेबाहेर पडण्याचा मनाचा निर्धार तर झालेलाच. तशांत दोन शिष्यांनींहि त्यांचेबरोबर येण्याचा निश्चय केला. (हे दोन शिष्य म्हणजे कै. श्री. बलवंतराव काणे व पं. श्रीकृष्णजी हिर्लेकर हे होत.) इतकी सर्व तयारी होतांच इ. स. १८९६ मधील श्रावण पौर्णिमेच्या शुभ दिनीं हा वीर संगीताच्या दिग्विजयासाठीं बाहेर पडला!!!

दौऱ्याचा प्रारंभ व बडोद्याचा मुक्काम

आपल्या दोन शिष्यांसमवेत मिरजेहून निघून सातारा, औंध या दोन ठिकाणीं कांहीं दिवस मुक्काम करून मजल मारीत मारीत बडोदा मुक्कामीं हे लोक येऊन पोंचले. एका राममंदिरांत त्यांनीं मुक्काम ठोकला. गांवांत कोणाची ओळखपाळख नव्हती; पण मंदिरांत राहण्याची परवानगी मिळतांच तिघांनीं तेथेंच राहण्याचें ठरविलें. पहाटे ४ पासून ८ वाजेपर्यंत देवासमोर बसून गाण्याची मेहनतही सुरू झाली. प्रथमतः या निवांत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वेळीं देवळांत कोणी विशेष मंडळी येत नसत; पण यांच्या गाण्यावर मुग्ध होऊन हळूहळू श्रोतेमंडळी जमूं लागली. त्या काळीं बडोदा हें गाण्याचें प्रमुख केंद्र होतें. गाण्याचा व्यासंग करणारी व मार्मिक रसिक मंडळी यांनीं त्या वेळीं बडोदा अगदीं गजबजून गेलेलें असे. मंदिरांत कोणी तरी परस्थ गायक येऊन राहिलेला समजतांच समजदार श्रोतेही मंदिरांत गाण्यासाठीं येऊं लागले. हळूहळू या श्रोत्यांत भर पडत गेली व गाण्यावर खूष होऊन अनेक मंडळींचा त्यांचेशीं परिचय झाला. निष्णात गुरुजींचें भरपूर शिक्षण, स्वतःच्या अविश्रांत परिश्रमानें मिळवलेलें असामान्य प्रभुत्व व तरुण रक्त या सर्वांचा मोठा सुरेख संगम त्या वेळीं कै. पंडित-जींचे ठिकाणीं झालेला होता! शिवाय परक्या ठिकाणीं जाऊन नांव कमावण्याची मनोमन ईर्षा, त्यामुळें गायनाला कसा रंग भरत असेल याची कल्पनाच केलेली बरी!! असे सुमारें १५-२० दिवस जातांच गांवभर गाण्याची तारीफ सुरू झाली व सर्वत्र त्यांची मुक्तकंठानें प्रशंसाही होऊं लागली. त्या वेळच्या बडोद्याच्या अधिराज्ञी कै. श्रीमंत जमनाबाई गायकवाड यांचेपर्यंतही ही बातमी जाऊन पोंचली! कै. श्री. जमना-बाईंना गाणें ऐकण्याचा फार षोक असून सर्व कलावंतांचा योग्य रीतीनें परामर्ष घेण्याबद्दल त्यांची फार ख्याति होती. त्यांनीं पंडितजींचेबद्दल होणाऱ्या प्रशंसेमुळें आकर्षित होऊन त्यांना गाण्यासाठीं सन्मानपूर्वक निमंत्रण दिलें. गाण्यासाठीं पंडितजी दरबारांत पोचले तेव्हां बडोदा दरबाराची गायकमंडळीहि तेथें होती. आपल्या लोकांनीं प्रथम पंडितजींना ऐकवावें अशी राणीसाहेबांनीं इच्छा व्यक्त केली. परंतु तेथील खांसाहेबांनीं "पहिले इस पंडतके बच्चेको गानेदो, फिर हम सुनाएंगे" अशा तऱ्हेचे उद्गार अशा कांहीं विचित्र तऱ्हेनें काढले कीं, पंडितजींच्या विषयीं एक प्रकारची तुच्छता त्यांमधून व्यक्त झाली. भरसभेंत काढलेल्या उद्गारानें पंडितजींचा स्वाभिमान दुखावला गेला व त्यामुळें ईर्षेनें सामना जिंकण्याच्या उमेदीनें पंडितजी गावयास बसले. पंचम स्वरांत तंबोरे मिळवून पंडितजींनीं नुसता स्वर लावतांच एक गंभीर वातावरण निर्माण झालें. नुसती अस्थाई अंतरा म्हणतांच रंगदेवता जणूं प्रसन्न

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होऊन समोर उभी राहिली! सुमारें २-३ तास असें जोरदार गाणें झाल्यानंतर श्रोते मंडळी अत्यंत मुग्ध होऊन गेली. भरदार आवाजांतील व उंच स्वरांतील तें असामान्य तयारीचें पण अत्यंत शुद्ध व बाळबोध वळणाचें गाणें ऐकून रसिकांचीं मनें भारावून गेलीं. त्यानंतर जे कोणी गावयास बसले त्यांचा आवाज लोकांच्या कानांत जाईचना मुळीं!! कसा जाणार? पंडितजींच्या अत्यंत भरदार व श्रवणमधुर आवाजानें त्यांचे कान तृप्त झाले होते. लखलखीत दिव्याचेपुढें मिणमिणत्या पणतीचें तेज काय पडणार? अशी श्रोत्यांची अवस्था होऊन गेली. अखेरीस त्या काळचे एक सुप्रसिद्ध व विद्वान गायक मरहूम खांसाहेब फैज महमदखां हे गावयास बसले. गाणाऱ्या लोकांत पूर्वी एक नियम असे कीं अगोदरचा गवई ज्या स्वरांत गायला असेल त्याच स्वरांत तरी निदान (किंवा त्याहून उंच स्वरांत) गायलें पाहिजे. त्या नियमानुसार पंडितजींच्या स्वरांत खासाहेबांना गाणें भाग पडलें. उंच स्वर पडेल म्हणून दरबारी कानड्यासारखा मंद्रस्थानांत विशेष विस्तार होणाऱ्या रागाची त्यांनीं निवड केली. 'दुलहन तेरिया' व 'बंधनवा बांधोरे' अशा खास ठेवणींतील चिजा कीं, ज्या म्हणतांना उंच स्वराचा त्रास होऊं नये त्या ते गायिले. पण पंडितजींच्या गाण्यापुढें त्यांचा रंग जमूं शकला नाहीं. इतक्या उंच स्वरांत गाण्याचा नेहमीं सराव नसल्यानें व पंडितजींप्रमाणें तारुण्याचा जोम नसल्यानें त्यांचें गायन श्रोत्यांना प्रभावित करूं शकलें नसावें. अशा प्रकारें सभा जिंकतांच पंडितजींना केवढें समाधान लाभलें असेल याची कल्पना सहज करतां येईल. झालेला अपमान भरून काढण्याची हीच योग्य संधि आहे असा विचार करून 'इतने उंचे स्वरमें गाना यह पंडितोंकाही काम है' असें प्रत्युत्तर देण्यासही पंडितजींनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं! अगदीं नवख्या व इतक्या तरुण गवयानें सभा आपलीशी करून घेण्याचा पराक्रम केलेला पाहून राणीसाहेबही अर्थात् खूपच खूष झाल्या व त्यांनीं पंडितजींचा चांगलाच सन्मान केला. जरीच्या शाली व कपडे, तसेंच रोख ७०० रु. देऊन त्यांनीं त्यांना निरोप दिला. निरोप देतेवेळीं मात्र त्यांनीं एक गोष्ट बजावून सांगितली कीं, "बुवासाहेब, आतां येथें फार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दिवस राहूं नका. महंमदखांसाहेबांना (म. रहिमतखांसाहेबांचे वडील बंधु) सुद्धां येथील मंडळींनीं त्रास दिला, मग तुम्हांला तर ते लोक सरळ राहूं देणारच नाहींत !" पंडितजींनींहि त्यांचा सल्ला मान्य करून आपला मुक्काम हलविला ! !

सहज ओघानें आलेल्या एका गोष्टीचा उल्लेख येथें करणें अवश्य वाटतें. म. फैजमहंमदखां हे कै. गा. भास्करबुवांचे गुरु होत, व वर वर्णन केलेल्या प्रसंगाचे वेळीं आपल्या गुरुजींचा पंडितजींनीं अपमान केला, या समजुतीनें कै. भास्करबुवांचा पंडितजींवर राग झाला व त्या दोघांचा कांहीं दिवस अबोला होता. अर्थात् पुढें हा अबोला नाहींसा झाला. तो कसा व केव्हां नाहींसा झाला इत्यादि हकीगत पुढें येईलच. असो.

दैवी संदेश !

बडोद्याहून ही मंडळी काठेवाडांतील राजकोट, जुनागड, मांगरोळ इ. ठिकाणीं गेली. अर्थात् या सर्वांचेसाठीं बडोद्याहून परिचयाचीं पत्रें बरोबर घेतलीं असल्यानें पंडितजींचें काम पुष्कळच सोपें झालें. सर्वच ठिकाणीं गाण्याच्या प्रभावानें लोक खूष होत होते, चांगला सन्मान प्राप्त होत होता व आर्थिक लाभही चांगलाच होत होता. पण पंडितजींचें एवढ्यानेंही खरेंखुरें समाधान होईना. आपल्याला विद्या मिळविण्यासाठीं जेवढा त्रास पडला तेवढा पुढच्या पिढीला होऊं नये या दृष्टीनें संगीताच्या शिक्षणाचें कार्य आपल्याला करावयाचें आहे ही महत्त्वाकांक्षा त्यांना स्वस्थ बसूं देईना. यासाठीं एकाद्या शहरीं कायमचें वास्तव्य करणें फार जरूर होतें व त्या दृष्टीनें कोणतें ठिकाण निवडावें यासंबंधीं त्यांना निर्णय करावयाचा होता. व्यावहारिक इष्टानिष्टतेबद्दल मनांत विचार चालू असत. यासंबंधीं योगायोगानें त्यांना एक दैवी संदेश प्राप्त होण्याची सुसंधि लाभली, हें पुढील हकीगतीवरून लक्षांत येईल. एकाद्या व्यक्तीचा जीवनक्रम ठरविण्यास नियतीचा कसा हातभार लागतो हेंच यावरून स्पष्ट होतें ! !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गिरनार पर्वतावरील आशीर्वाद

जुनागडजवळ गिरनार पर्वतावर श्री दत्तात्रेयाचें एक स्थान आहे. पंडितजींच्या मूळ गांवाजवळच नरसोबावाडी हें प्रसिद्ध दत्तक्षेत्र असल्यानें व घराण्यांतही दत्तभक्तीचें विशेष महत्त्व असल्यानें पंडितजींनाही दत्तभक्तीचें विशेष माहात्म्य वाटत असे. त्यांना गिरनार पर्वतावरील त्या स्थानाचा पत्ता लागतांच दर्शन घेण्यासाठीं ते आतुर न झाले तरच नवल! गिरनार पर्वतावरील तें स्थान फारच कडक असल्याचें सांगतात. संध्याकाळीं संसारी माणसेंच काय पण देवाचे पुजारी देखील खालीं येतात. केवळ तपस्वी व सिद्ध अशा प्रकारची मंडळीच वर मुक्कामास असतात. पंडितजींनीं श्रीदत्तात्रेयाचें दर्शन घेतलें व त्यांनीं आपली मनःकामना व्यक्त केली कीं काय न कळे; कारण तेथेंच त्यांची एका सिद्धपुरुषाची गांठ पडली व त्यानें पंडितजींना एकदम सांगितलें कीं, "तुम्ही पंजाबांत जाऊन राहा. तुमचें कार्य तुम्ही तिकडेच सुरू करा. तुमचे संगीताचे प्रचाराचे कार्यांत तुम्हांला जरूर यश मिळेल असा माझा आशीर्वाद आहे." पंडितजींनीं आपली शंका व्यक्त केलीच. त्यांनीं त्यांना विचारलें कीं, "आम्ही तर महाराष्ट्रांतील माणसें आहोंत, आपण एकदम पंजाबांत काय जायला सांगतां?" त्यावर त्यांनीं त्यासंबंधीं कारण न सांगतां हंसून एवढेंच सांगितलें कीं "बेटा, परमेश्वर तुझ्या पाठीशीं आहे. त्याची कृपा पाठीशीं असल्यावर तूं कां उगीच काळजी करतोस? तुला कोणतीहि अडचण पडणार नाहीं." एवढें सांगितल्यावर पंडितजींनीं स्वतःचें समाधान मानून अशा प्रकारची पंजाबांत कायम होण्याची संधि मिळेल तर पहावें असें ठरविलें. अर्थात् पुढें अशा प्रकारचा योग जुळून आला व त्यांनीं आपलें 'गांधर्व महा विद्यालय' लाहोर येथें स्थापन केलें हें सर्वांना विदित आहेच.

अशा प्रकारच्या चमत्कारावर विश्वास ठेवण्यास हल्लींची बुद्धिवादी विचारांची मंडळी तयार होणार नाहींत हें मला माहीत आहे. पण पंडितजींची आध्यात्मिक मनोरचना लक्षांत घेता, व त्यांनीं पंजाबांत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कायम होण्यास दुसरें कोणतेंही संभाव्य कारण दिसत नाहीं हें पाहतां, या गोष्टीवर व पंडितजींनीं आपलें कार्य पंजाबांत सुरु करतांना वरील आशीर्वादावर विश्वास ठेवला असला पाहिजे या दोन्ही गोष्टी मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं. प्रत्यक्ष अशी घटना असल्याबद्दलचा पुरावा मिळेल कीं नाहीं, हीच योग्य कारणपरंपरा कां मानावी ? इतरही कारणें असूं शकतील अशा शंका उपस्थित करतां येतील. पण वरील हकीगतीची फार खोलवर चिकित्सा न करतां एवढेंच समाधान मानून घेणें भाग आहे कीं, आपलें कायमचें वास्तव्य कोठें असावें या प्रश्नाचा निर्णय वरील घटनेमुळें पंडितजींना घेतां आला असावा. अशा प्रकारच्या गोष्टींवर विश्वास ठेवावा अशाच वातावरणांत पंडितजी वाढलेले असल्यानें व त्यांची स्वभावरचनाही तशा प्रकारें बनलेली असल्यानें त्यांचे बाबतींत तर हें मुळींच अशक्य वाटत नाहीं. पंडितजींच्या अध्यात्मपर प्रवृत्तीचा प्रस्तुत लेखकाला अनेक वेळां अनुभव आलेला असल्यानें व त्यांच्या जीवनाच्या शेवटीं त्याच प्रवृत्तीचें प्राबल्य झाल्याचें सर्वांनाच परिचित असल्यानें माझ्या वरील मतास अधिकच बळकटी येते.

ग्वाल्हेरमधील जयजयकार

जेथून आपले गुरुजी कै. पं. बाळकृष्णबुवा विद्या संपादन करून आले त्याच ग्वाल्हेर शहरीं जावें असें पंडितजींच्या मनांत फार दिवसांपासून होतें. काठेवाडमधील आपला दौरा संपवून पंडितजी ग्वाल्हेरला आले. प्रथमतः त्यांचा मुक्काम कै. भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांचेकडे होता. कै. वैद्यांचा व कै. बाळकृष्णबुवांचा परिचय होता व त्यांचा शिष्य म्हणून पंडितजींना त्यांनीं स्वतःकडे उतरवून घेतलें. अर्थात् त्यांचेकडे कांहीं दिवस राहिल्यानंतर व मग स्वतंत्रपणें राहून पंडितजींनीं सुमारें ४ महिने ग्वाल्हेरमध्यें मुक्काम केला. आपल्या गायनानें त्या संगीताच्या आद्यस्थानांतही त्यांनीं चांगलाच नांवलौकिक मिळविला. अनेक बैठकी यशस्वीपणें झाल्या व खास ग्वाल्हेरचें गाणें एका महाराष्ट्रीय तरुणाकडून ऐकावयास मिळाल्याचें आश्चर्य सर्वांनाच वाटलें! खुद्द ग्वाल्हेरमध्यें ज्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ग्वाल्हेर घराण्याची गायकी इतक्या शुद्ध स्वरूपांत ऐकावयास मिळत नसे ती एका परस्थ व अगदीं तरुण गायकाकडून ऐकावयास मिळाल्यानें लोक चकित झाले व तशा अर्थाची कबुली अनेक जणांनीं दिली ! ! कै. आपटे गुरुजी, कै. शंकर पंडित, कै. बाळागुरुजी इ. त्या काळच्या नामांकित गवयांनीं देखील पंडितजींचें मनापासून कौतुक केलें. या सर्व हकीगतीवरून एक गोष्ट सिद्ध झाली कीं, कै. बाळकृष्णबुवांनीं आपल्या शुद्ध गायकीचें पावित्र्य राखलें होतें व तेंच पंडितजींतही उतरलें होतें. घराणेदार गायकी जतन करणें हें शिक्षक व विद्यार्थी या दोघांचें पवित्र कर्तव्य असतें व त्या कसोटीस वरील दोघे महाभाग पूर्णपणें उतरले होते, हाच पंडितजींच्या ग्वाल्हेरमधील यशाचा खरा अर्थ होय असें मला वाटतें.

निरनिराळ्या सरदार लोकांकडे व गांवांत इतरत्र अनेक ठिकाणीं गाणीं होत, त्यांचा वृत्तांत ग्वाल्हेरचे महाराजांचे कानावर गेला व त्यांनींही पंडितजींना निमंत्रण दिलें. त्यांचे गायनावर खूष होऊन महाराजांनीं त्यांचा चांगला सन्मान तर केलाच पण त्यांच्या भरतपूर, मथुरा इ. पुढील मुक्कामांची चांगली व्यवस्थाही त्यांनीं करून दिली !

पंडितजींच्या पुढील दौऱ्याची हकीगत सांगण्यापूर्वीं त्या वेळीं ग्वाल्हेरमध्यें घडलेल्या दुसऱ्या एक घटनेचा ओझरता उल्लेख करणें भाग आहे. कै. रामकृष्णबुवा वझे त्या वेळीं ग्वाल्हेरला राहत असत. त्या वेळीं ते चांगले गात असत, पण अधिक शिक्षणाच्या हेतूनें ते त्या वेळीं ग्वाल्हेरला रहात होते. मरहूम निसार हुसेन खांसाहेबांचे जवळ त्यांचें शिक्षण चाललें होतें. कै. वझेबुवांना त्या वेळीं आपल्या उदरनिर्वाहासाठीं माधुकरी मागावी लागत असे. ही गोष्ट पंडितजींना कळतांच त्यांना बोलावून घेऊन पंडितजींनीं असें सांगितलें कीं, " माझा मुक्काम येथें असेपर्यंत तुम्ही माझेबरोबर जेवावयास येत जा. तुम्ही माधुकरी मागतां हें मला बरें वाटत नाहीं." वरील हकीगत मीं प्रत्यक्ष पंडितजींचे तोंडून ऐकली होती. कै. रामकृष्णबुवांनाही यासंबंधीं मीं एकदां विचारलें असतां ही हकीगत अक्षरशः खरी असल्याचें त्यांनींहि मान्य केलें होतें. वरील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हकीगतीवरून पंडितजींच्या स्वभावाची कल्पना येऊं शकते, म्हणून मुद्दाम उल्लेख केला आहे. चांगल्या गुणी माणसाचा परामर्ष घेऊन त्याची योग्य ती व्यवस्था लावण्याची पंडितजींना मनापासून हौस असे. मीं असे अनेक प्रसंग अनुभवलेले आहेत. तशाच तऱ्हेचा हा प्रसंग ग्वाल्हेरच्या मुक्कामांत घडलेला असल्यानें येथें दिला आहे.

मथुरेंतील वास्तव्य

मथुरेंत पंडितजींनीं एकूण ७ महिने मुक्काम केला. पण केवळ गाण्याच्या मैफली करण्यांत एवढा अवधि त्यांनीं घालविला असें नव्हे, तर त्या काळांत त्यांनीं व्रजभाषेचा अभ्यास केला व कांहीं जुन्या संगीतविषयक संस्कृत ग्रंथांचेंही परिशीलन केलें. हा त्यांचा व्यासंग त्यांना अत्यंत उपयुक्त ठरला. पुढें पुढें तर हिंदीवर त्यांनीं एवढें प्रभुत्व मिळविलें कीं हजारों श्रोत्यांचे समोर ते अस्खलितपणें व्याख्यानें देऊन संगीताची महती पटवूं लागले. ग्रंथाच्या परिशीलनानें त्यांना जुन्या शास्त्राची कल्पना आली व त्या शास्त्राचा आपल्या प्रचलित संगीताशीं कसा मेळ घालावा यासंबंधीं त्यांचा विचार सुरू झाला.

मथुरेंत त्या वेळीं पं. चंदन चौबे नांवाचे एक चांगले धृपदिये राहत असत. त्यांचा आवाज पहाडी होता व धृपद गायकीही मोठी रुबाबदार व घराणेदार होती. त्यांच्या व पंडितजींच्या मैफली मथुरेला बऱ्याच झाल्या. एकदां पं. चौबे पंडितजींना चिडवण्याचें हेतूनें "ख्यालिया धृपद क्या गा सकता है?" असें म्हणाले. पंडितजींनीं लगेच त्यांना सुनावलें कीं "ख्यालिया धृपद गा सकेगा, लेकिन धृपदिया ख्याल नही गा सकता." एवढें प्रत्युत्तर देऊन पंडितजी थांबले नाहींत, तर त्यांनीं स्वतः धृपदाचा अभ्यास केला. कांहीं नवीन धृपदांची रचना केली. अशा रीतीनें आपली गायकी अधिक समृद्ध केली. जें जें नवें व चांगलें ऐकावयास सांपडेल त्याचा शक्य असल्यास आपल्या गायकींत समावेश करून घेण्याची त्यांची नेहमीं तयारी असे या त्यांच्या प्रवृत्तीचें प्रदर्शन अनेक प्रसंगीं मला घडलेलें आहे. त्यांतील हा एक विशेष महत्त्वाचा प्रसंग होय. दुसऱ्याशीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सामना देण्यासाठीं लागणारी युयुत्सु वृत्ति व नव्याचा स्वीकार करण्यासाठीं लागणारें मनाचें औदार्य व परिश्रमशीलता गवयांत फार कमी प्रमाणांत असल्याचें आढळतें. पण पंडितजींच्या अंगीं मात्र हे गुण अगदीं प्रकर्षानें होते असें मला आढळलें आहे.

वक्तृत्वाची साधना

मथुरेंतील या वास्तव्यानंतर पंडितजी भरतपूरला गेले. तेथें एका नव्या उपक्रमाचा प्रारंभ झाला. जाहीर सभांतून भाषण करण्याचा प्रारंभ पंडितजींना येथें करावा लागला. पंडितजींचे गायनानें मुग्ध होऊन लोकांनीं त्यांचा सन्मान सर्वत्र केला. भरतपूरच्या कौन्सिलकडूनहि त्यांना एक सुवर्णपदक समर्पण केलें जाऊन त्यांचा मोठ्या प्रमाणावर सत्कार केला गेला. इतरत्रहि सन्मान करण्यानिमित्त सभा भरत, त्या वेळीं सभेंत बोलण्याची संधि पंडितजींना मिळत असे. श्री. जानी मयाशंकर नांवाचें एक नागर ब्राह्मण जातीचे स्कूल इन्स्पेक्टर त्या वेळीं भरतपूरला होते. त्यांनीं पंडितजींना याबाबत प्रेरणा दिली. प्रथमतः लिहून काढलेलें भाषण वाचण्यापासून सुरुवात झाली व हळूहळू जाहीर सभांमधून भाषण करण्याची संवय पंडितजींनीं आत्मसात् केली! श्री. जानीसाहेबांनीं पंडितजींना भाषणें करण्यास प्रवृत्त केलें व मुद्दाम कांहीं सभा घडवून आणून त्यांमध्यें पंडितजींना बोलावयासहि लावलें. त्यांच्या या प्रयत्नास हळूहळू चांगलें यश मिळूं लागलें व वक्तृत्वकला पंडितजींना साध्य होऊं लागली हें पाहून श्री. जानीसाहेबांनाहि फार समाधान वाटलें. पुढें वक्तृत्वाच्या जोरावर संगीताच्या प्रचाराच्या कार्यात पंडितजींना अपूर्व यश लाभलें. पंडितजींना आपल्या अंगच्या वक्तृत्वकलेचा परिपोष भरतपूर येथें झाला याचें स्मरण असे व त्यांचेच बोलण्यांत आलेल्या उल्लेखावरून मीं श्री. जानीसाहेब यांचें नांव वर उद्धृत केलें आहे. पंडितजींना वक्तृत्वकलेचा उपयोग स्वतःच्या उत्तरायुष्यांत तर फारच झाला. तुलसीकृत रामायणावर प्रवचनें करतांना पंडितजींनीं आत्मसात् केलेल्या वक्तृत्वाचा व संगीताचा श्रोत्यांवर फारच प्रभाव पडत असे. रसाळ संगीत व प्रभावी वाणी यांच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बळावर पंडितजींनीं हजारों श्रोत्यांना अक्षरशः मंत्रमुग्ध केल्याचें मला आठवतें. कित्येक शहरीं रामायणावरील प्रवचनाचे द्वारें संगीताचा प्रचारहि पंडितजींना करावा लागला. या सर्व गोष्टी करतांना भरतपूर येथें पाया घातला गेलेल्या या वक्तृत्वाचा पंडितजींना पुढील आयुष्यभर अत्यंत उपयोग झाला. आम्हीं शिष्यमंडळींनींहि वक्तृत्वकला हस्तगत करावी अशी त्यांची इच्छा असे व आम्हांस बोलके करण्यासाठीं ते वारंवार खटपट करीत असत. वक्तृत्वकलेचें संगीताच्या प्रचाराचे दृष्टीनें किती महत्त्व आहे हें आम्हांस स्वतःच्या उदाहरणावरून त्यांनीं पटवून दिलें व जाहीर सभांतून बोलावयास लावून वक्तृत्वकलेचा अभ्यासहि करवून घेतला. कोणत्याहि गोष्टीचें महत्त्व पटतांच ती आत्मसात् करावयास लागणारी निष्ठा व तिची प्रेरणा शिष्यमंडळींना देऊन ती दृढमूल करण्यासाठीं लागणारा करारीपणा, निश्चयीपणा व श्रमाची तयारी पंडितजींचे ठिकाणीं बिलक्षण होती. या असामान्य गुणाचे जोरावरच ते संगीताचें प्रचारकार्य इतक्या प्रभावीपणें प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून करूं शकले असें मला वाटतें.

दिल्ली सर झाली !

भरतपूरच्या मुक्कामानंतर पंडितजी दिल्लीस गेले. तेथेंहि त्यांचे गाण्यावर श्रोतृवर्ग सदैव खूष असे. अनेक ठिकाणीं त्यांचे सत्कार झाले. दिल्लीस त्या काळीं वास्तव्य करून राहिलेले गोस्वामी पं. पन्नालालजींची व त्यांची भेट झाली. त्यांचेबरोबर पंडितजींनीं संगीतशास्त्रावर चर्चा केली. कांहीं प्रसंगीं त्यांना वादविवादहि करावे लागले. संगीतशास्त्राचा व्यासंग व प्रसंगावधान या गुणांचे बळावर त्यांना येथेंहि यश लाभूं शकलें. पं. पन्नालालजी हे एक चांगल्यापैकीं सतारवादनकार होते व त्यांनीं सतारीवर एक मोठा ग्रंथहि लिहिलेला होता. आजकाल तो उपलब्ध नाहीं. अशा विद्वान् गृहस्थांशीं चर्चा करण्यानें पंडितजींचे ज्ञानभांडारांत भरच पडली असेल यांत कांहीं शंका नाहीं. मथुरेच्या मुक्कामांत पंडितजींनीं संस्कृत ग्रंथांचें जें अध्ययन केलें होतें त्याचाहि या दृष्टीनें फार उपयोग झाला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पं. पन्नालाल यांचेखेरीज सुप्रसिद्ध सतारिये मरहूम बरकतुल्लाखां यांचाहि परिचय दिल्लींचे मुक्कामांत झाला. या परिचयाचें पुढें परस्परांच्या दृढ स्नेहांत रूपांतर झालें. अखेरपर्यंत दोघांचे किती जिव्हाळ्याचे संबंध होते हें प्रस्तुत लेखकानें प्रत्यक्ष पाहिलेलें आहे. अशा गुणीजनांच्या स्नेह-भावाकडे लक्ष जातांच एकमेकांशीं क्षुल्लक कारणांवरून भांडणाऱ्या कलावंतांची कींव करावीशी वाटते! पंडितजींसारखे खरे कलावंत दुसऱ्याचे गुण जाणूं शकतात व त्याचा योग्य तो आदरहि राखूं शकतात. पंडितजींच्या या स्वभावविशेषामुळें त्यांनीं अनेक गुणी लोकांना स्नेह-रज्जूंनीं आपलेंसें करून टाकलें होतें. या स्वभावविशेषाला स्वार्थत्यागाची अपूर्व जोड लाभल्यानें पंडितजींनीं या सर्व गुणी मंडळींचा संगीताचे उद्धारांत पुढें चांगलाच उपयोग केला. या सर्व गुणीजनांचाहि पंडितजींचे संघटनाकौशल्यावर पूर्ण विश्वास होता व त्यांनींहि पंडितजींचे कार्याचें महत्त्व लक्षांत घेऊन त्यांना शक्य असेल तेवढें सर्व साहाय्य दिलें. दिल्लीच्या मुक्कामांत वरील दोन लोकांखेरीज गोस्वामी श्री. लालजी, दोजानाचे नबाबसाहेब इ. नामवंत मंडळींनींहि पंडिजींचें गाणें ऐकून व त्यांचे विद्वत्तेवर खूष होऊन त्यांची मुक्तकंठानें प्रशंसा केली. एखाद्या दिग्विजयी वीराप्रमाणें अनेक सभा जिंकीत हा महत्त्वाकांक्षी महाराष्ट्रीय तरुण दिल्लीपर्यंत तर मजल मारून आलाच, पण पुढें पंजाबांतहि दौरा करण्याची संधि योगायोगानें त्याचेपुढें चालून आली. गिरनार पर्वतावर लाभलेल्या संदेशाचें स्मरण पंडितजींना असल्यानें ही चालून आलेली संधि त्यांनीं मोठ्या आनंदानें स्वीकारली.

पंजाबमधील दौरा

त्या वेळीं नुकत्याच समाधिस्थ झालेल्या श्री. हरवल्लभस्वामींच्या पुण्यतिथीसाठीं होणाऱ्या गाण्याच्या जलशांत भाग घेण्यासाठीं पंडितजींना पाचारण करण्यासाठीं त्या उत्सवाचे व्यवस्थापक कै. पं. तोलोरामजी स्वतः दिल्लीस आले व त्यांनीं पंडितजींची भेट घेऊन त्यांना त्याबद्दल विनंति केली. पंडितजींनीं अर्थातच तें निमंत्रण मोठ्या आनंदानें स्वीकारलें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कारण त्यांना पंजाबमध्यें जाण्याची तीव्र इच्छा होती व ही संधि चालत आलेली–मग नकाराचा प्रश्नच कुठें उद्‌भवणार ! शिवाय पंजाबमध्यें नांवलौकिक होण्याचे दृष्टीनें तर ही एक सुवर्णसंधीच होती. कारण हरवल्लभजींच्या पुण्यतिथीचा हा उत्सव फार प्रख्यात असून येथें यश मिळविणाऱ्याचें नांव सबंध पंजाबभर होत असे. हरवल्लभ हे संत असले तरी स्वतः गात असत, म्हणून त्यांच्या पुण्यतिथीचे उत्सवांत गाण्याचे मैफलीची जोड मिळाली होती. या निमित्तानें जालंदरजवळील अमृतसर, होशारपूर, लुधियाना तसेंच लाहोरपासूनची गायकमंडळी या निमित्तानें एकत्र जमूं लागली. प्रथमतः धृपदियांचा विशेष भरणा असे. नंतर ख्याल-गायकही येथें जमूं लागले. गवय्याबजवय्यांचें एकादें संमेलन किंवा मेळावा जमावा असें स्वरूप या उत्सवास प्राप्त झालें. या उत्सवास धार्मिक अधिष्ठान असल्यानें श्रोतृवर्गही मोठ्या संख्येनें उपस्थित राहत असे. सतत ३-४ दिवस हा हरवल्लभ मेळा चालतो. सकाळ, दुपार, रात्र अशा सर्व वेळीं गाण्याचे जलसे चालतात. संगीतरूपी ही गंगाच जणूं वर्षांतून एकदां या उत्सवाचे निमित्तानें जालंदरला अवतरते म्हणा ना ! सध्यांही हा उत्सव सुरू आहे. आतां तर हरवल्लभ संगीत महासभेंत या उत्सवाचें रूपांतर झालें आहे व वर वर्णन केलेल्या विस्तृत प्रमाणावर हा सोहळा सुमारें ७५–८० वर्षें अखंडितपणें सुरू आहे. पंजाबांत हा एक संगीताचा महोत्सव म्हणून या जलशांचें मोठें अपूर्व स्थान आहे. अशा या जलशांत निमंत्रण मिळतांच पंडितजींनीं मोठ्या आनंदानें होकार दिला तो कांहीं उगीच नव्हे ! त्यांच्या महत्त्वाकांक्षेला योग्य अशीच ही संधि होती व तिचा त्यांनीं अगदीं योग्य रीतीनें उपयोग करून घेतला हें पुढील हकीगतीवरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

कै. पं. तोलोरामजींच्या खास निमंत्रणानें पंडितजी जालंदरला गेले. तेथील जलशांत त्यांचें गायन होतांच श्रोतृवर्ग असा कांहीं मुग्ध होऊन गेला कीं इतर कोणाचाही रंग जमूं शकला नाहीं. गोल व भरदार, परंतु तितकाच मधुर आवाज, रुबाबदार व्यक्तित्व, शुद्ध व सर्वसुलभ गायकी, तालसुराचा सच्चेपणा व रागविस्ताराची रंगतदार मांडणी या सर्व गुणांचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समन्वय पंडितजींचे अंगीं झालेला असल्यानें नभांगणांत एकादी वीज चमकतांच पाहणाऱ्यांचे डोळे दिपून जावेत तशी श्रोत्यांची अवस्था झाली. आवाजांतील तेजस्विता व माधुर्य तर अगदीं असामान्य होतें. त्यामुळें श्रोतृवर्गाचे कान अगदीं भरून गेले. शुद्ध शब्दोच्चार व भावनानुकूल रसपरिपोष यांचा त्यांचे गायकींत समावेश असल्यानें श्रोत्यांच्या मनांवरही त्यांनीं विलक्षण मोहिनी टाकली. श्रोत्यांना अशा प्रकारें वेडे करून टाकल्यानें पंडितजींचे खेरीज इतर कोणालाही त्यांचेप्रमाणें प्रभाव पाडतां आला नाहीं. जालंदरच्या या मेळाव्यांत अनेक ठिकाणची लालाजी (म्हणजे व्यापारी) मंडळी आलेली होती. त्यांनीं त्यांना आपआपले गांवीं गाण्यासाठीं निमत्रणें दिलीं. त्यानुसार पंडितजी पुढील वर्षभर (इ. स. १८९९ मध्यें) पंजाबमध्येंच हिंडले. अमृतसर, लाहोर, रावळपिंडी, मॉंटगुमरी, मुलतान इ. पंजाबमधील प्रमुख शहरीं, तसेंच काश्मीर, जम्मू वगैरे ठिकाणपर्यंत पंडितजींनीं दौरा केला. वरील सर्व ठिकाणीं त्यांना अपूर्व यश मिळत गेलें व अशा प्रकारें त्यांचा पंजाबमध्यें चांगलाच जम बसूं लागला.

पंडितजींचे मनांतही पंजाबांत कायमचें वास्तव्य करून आपलें कार्य सुरू करण्याची महत्त्वाकांक्षा होती. त्या दृष्टीनें एकाद्या ठिकाणीं मुक्काम करणें भाग होतें. विशेष परिचय झालेल्या अमृतसर येथील कै. लाला रामरतनलालजींचे कानीं पंडितजींनीं आपला विचार घातला. अर्थातच लालाजींनीं मोठ्या आनंदानें आपली संमति दिली. लालाजींनीं त्यांची राहण्याची व्यवस्था फारच चांगल्या रीतीनें करून दिली. पंडितजींनीं तेथें ७–८ महिने मुक्काम केला व थोड्याफार प्रमाणांत शिक्षणाचेंही कार्य सुरू केलें. पण एवढ्यांत पंजाबमधील एक श्रीमान गृहस्थ सर बाबा खेमसिंहजी वेदी अमृतसरला आले व आपल्या मुलांना शिकवण्यासाठीं पंडितजींना ओकारा (जि. मॉंटगुमरी) येथें घेऊन गेले. एवढ्या मोठ्या गृहस्थाचें प्रेमाचें निमंत्रण पंडितजींना नाकारतां आलें नाहीं. शिवाय संगीताचें शिक्षण देतांना ज्या अडचणी येतील त्या कशा निवारण करतां येतील यासंबंधीं विचार करण्यास व नवीन साधनें शोधून काढण्यासाठीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जो एक प्रकारचा निवांतपणा लागतो तोही तेथें मिळण्याची शक्यता होती. म्हणून पंडितजी सर बाबा खेमसिंहजी बेदींच्या साग्रह निमंत्रणानुसार ओकारा येथें गेले.

एकाद्या धनाढ्य गृहस्थाचे आश्रयास राहिल्यावर येणारा आळशीपणा पंडितजींचे वृत्तींत मुळींच नव्हता. त्यामुळें आतां आर्थिक विवंचना नाहीं तेव्हां विशेष धडपड करून काय करावयाचें असला विचार पंडितजींचे महत्त्वाकांक्षी मनास कधींच शिवला नाहीं. उलट पैशाची काळजी नसल्यानें जें मनःस्वास्थ लाभलें होतें त्याचा उपयोग संगीताचे शिक्षणांतील नवनवीन प्रयोग करण्यासाठीं त्यांनीं केला. मुलांना शिकवतांना विशेष अडचण पडत असे ती ही कीं, काल शिकवलेलें आज विद्यार्थ्यांचे लक्षांत राहत नसे. चिजा पाठ करून घेतां येतील, पण रागविस्तारांचें काय करणार ? त्याचेबाबत तर दुहेरी अडचण होती. प्रत्यक्ष गुरूलाही काल काय शिकवलें होतें तें तसेंच्या तसें आठवणें कठीण. शिवाय मुलांच्या आवाजाला काय झेपेल, तसेंच त्यांना संगीताकडे आकर्षित करण्यासाठीं काय केलें पाहिजे इ. अनेक विचारांची पंडितजींचे मनांत गर्दी झालेली होती. केवळ गुरूनें गायिलेलें आपण अंधपणें अनुकरण करून गाणें हें विद्यार्थ्यांचें खरें शिक्षण नव्हे, याची जाणीव पंडितजींना झाली व हा दोष नाहींसा करण्याची खटपट त्यांनीं सुरु केली. संगीताचें शिक्षण देण्यासाठीं स्वरलेखनाचें अत्यंत महत्त्व आहे अशी पंडितजींची खात्री झाली व त्या दिशेनें त्यांनीं प्रयत्न सुरू केले.

स्वरलेखन

स्वरलेखनाचा प्रयत्न करतांना पंडितजींना प्रथमतः पाश्चात्य स्वरलेखनाचा आधार घ्यावा लागला. कारण तेवढीच एक पद्धति तत्पूर्वी अमलांत होती. परंतु त्यांनीं भारतीय संगीताच्या दृष्टीनें आवश्यक त्या सुधारणा त्यामध्यें घडवून आणल्या व एक सुसंगत अशी नवी पद्धति अमलांत आणली. गाण्यांत येणाऱ्या तीन सप्तकांतील स्वर वेगवेगळ्या ओळींत लिहिण्यापेक्षां दुसरें कोणतेंच साम्य त्यांच्या व पाश्चात्य स्वरलेखनामध्यें शिल्लक राहिलें नव्हतें. संगीतांत स्वरांचें महत्त्व विशेष आहे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हें लक्षांत घेऊन स्वरांना मात्रा देण्याचें अत्यंत शास्त्रीय तत्त्व त्यांनीं स्वीकारलें. प्रत्येक स्वराचा लयीशीं व मात्रेशीं जो संबंध येतो तो दर्शविण्यासाठीं त्यांनीं वेगवेगळ्या चिन्हांची योजना केली. ४ मात्रेपासून ते एका मात्रेच्या १६ व्या विभागापर्यंत मात्रांचीं चिन्हें तयार केलीं. गायकींतील बारकावे संगीताचें लेखन करतांना लिहिले गेले पाहिजेत या उद्देशानें त्यांनीं एवढ्या सर्व चिन्हांचा अंतर्भाव आपल्या स्वरलेखन पद्धतींत केला. संगीताच्या शिक्षणाचें एक प्रभावी साधन व गायकीचें बिनचूक व हुबेहूब लेखन करतां येईल असें एक संगीताला चिरस्थायी रूप देणारें माध्यम या दोन्ही दृष्टींनीं त्यांनीं आपल्या स्वरलेखनाची रचना केली. त्यांच्या या रचनेंतील क्लिष्टपणा कमी करून त्यांची स्वरलेखन पद्धति त्यांच्या शिष्यमंडळींनीं पुढें सुधारली हें खरें; पण त्यामुळें त्यांनीं त्या काळांत ज्या पद्धतीची रचना केली तिचें महत्त्व कमी होत नाहीं. उलट पंडितजींच्या कल्पकतेचें हें एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून मानावयास हरकत नाहीं.

आपल्या स्वरलेखन पद्धतीची रचना करतांना मात्र पंडितजींना फारच कष्ट पडले. त्यासंबंधींची हकीगत मीं प्रत्यक्ष त्यांचे तोंडून ऐकलेली असल्यानें मला त्यासंबंधीं पूर्ण कल्पना आहे. पूर्वीचे गवई आपल्या गायकीचे व चिजेचे स्वर सांगून शिकवीत नसत. गुरुजी गातात त्यानुसार गाणें एवढाच शिक्षणाचा अर्थ होता. रागाचें नांव देखील सांगण्याची पद्धति नव्हती आणि यदाकदाचित् नांव सांगितलेंच तरी रागांतील वर्ज्यावर्ज्य, कोमलतीव्र, वादीसंवादी, आरोहावरोह इ. रागासंबंधीची माहिती सांगितली जात नसे; मग चिजेचे स्वर कोणते हा प्रश्नच मुळीं त्या काळीं उद्भवत नव्हता. त्यामुळें पंडितजींना चिजांचें स्वरलेखन करतांना फारच परिश्रम घ्यावे लागले. प्रत्येक ओळ, प्रत्येक अक्षर वारंवार म्हणून तो कोणता स्वर होतो तें ठरवावयाचें, तो कोणत्या सप्तकांतील आहे हें पहावयाचें व तो शुद्ध कीं विकृत आहे हें पहावयाचें; असे एकेक स्वर नक्की करावयाचे. मग एक ओळ पूर्ण झाल्यावर प्रत्येक स्वराला किती मात्रा दिल्या गेल्या तें पहावयाचें. स्वतःचें समाधान न झाल्यास इतरांचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विचार लक्षांत घेऊन त्यांत बदल करावयाचा. सर्वांची खात्री होऊन देखील त्यामध्यें कांहीं वैगुण्यें रहात तीं वेगळींच ! हें सर्व वर्णन वाचून वाचकांना वाटेल कीं, स्वरलेखन हें आज तर किती तरी सुलभ वाटतें ! मग तें पंडितजींना इतकें अवघड कां वाटावें ? ते खरोखरीच इतके अप्रबुद्ध होते कीं काय ? अशी शंकाही निर्माण होण्याचा संभव आहे. पण याबावतींत हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, ही शंका व्यर्थ होय. संगीतक्षेत्रांत नवयुग निर्माण करणाऱ्या या द्रष्ट्याबद्दल अशी शंका घेणें हें अत्यंत धाष्टर्याचें ठरेल. पंडितजींना या बाबतींत इतके कष्ट पडले याचें कारण एवढेंच कीं, स्वरलेखन ही गोष्ट त्यांना अगदीं नवीन होती. त्या वेळीं शिक्षणाची जी पद्धति होती व जें वातावरण सर्वत्र अस्तित्वांत होतें, त्या सर्वांचाच हा दोष होय, पंडितजींचा नव्हे. उलट ही परिस्थिति बदलून टाकण्यासाठीं परिश्रमपूर्वक प्रयत्न करणाऱ्या पंडितजींना आपण धन्यवादच दिले पाहिजेत ! !

'अवगुन न कीजिये' या यमनकल्याण रागांतील त्रितालांतील चीजेचें स्वरलेखन करण्यास पंडितजी व त्यांचे दोन साथीदार यांना सुमारें ३–३॥ तास लागले होते असें पंडितजींनीं मला सांगितल्याचें आठवतें. इतके कष्ट पडले तरीहि त्यांनीं यासंबंधीं आपले प्रयत्न सतत चालू ठेवले व हळूहळू सराव होतांच चिजांचें स्वरलेखन करणें हें त्यांना सुलभ वाटूं लागलें.

वरील सर्व हकीगतीवरून पंडितजींच्या चिकाटीची व सततोद्योगाची वाचकांना सहज कल्पना येऊं शकेल.

स्वरलेखनपद्धतीचें शिक्षण त्यांनीं पुढें आम्हां शिष्यमंडळीस दिलें व आमची त्यांत प्रगति झालेली पाहून त्यांना किती समाधान झालें असेल याची कल्पना फार थोड्या व्यक्तींना येऊं शकेल. आम्ही शिष्यमंडळी भराभर स्वरलेखन लिहूं लागलेले पाहतांच त्यांचें हृदय आनंदानें भरून येत असे व कधीं कधीं ते म्हणत, "अरे, तुमचें नशीब थोर म्हणून तुम्हांला इतक्या डोळसपणें शिक्षण मिळालें व तुम्हीं आज स्वरलेखन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

इतक्या लवकर करूं शकतां. पण हें सगळें शोधून काढतांना मला अत्यंत कष्ट करावे लागले होते हें विसरूं नका. तुम्हांला तसा त्रास पडूं नये अशीच माझी इच्छा आहे; पण मीं दिलेला हा ठेवा मात्र जिवापाड मेहनत करून तुम्हीं जपला पाहिजे व त्याचा प्रसारही केला पाहिजे. ही तुमची जबाबदारी विसरू नका." त्यांच्या या उद्‌गारांतील मर्म सूज्ञ वाचकांच्या सहज लक्षांत येईल अशी खात्री वाटते.

पंडितजींच्या पंजाबमधील दौऱ्याची हकीगत सांगतां सांगतां थोडें विषयांतर झालें हें खरें, पण स्वरलेखन हा एक त्यांच्या कार्याचा विशेष असल्यानें त्यासंबंधीं एवढा उहापोह येथें केला आहे. पंडितजींचें जीवन-चरित्र हें त्यांच्या कार्याचें यथार्थ दर्शन घडवून देण्यासाठीं मी लिहीत असल्यानें हें विषयांतरासारखें वाटणारें लेखन अगदींच अस्थानीं आहे असें मला वाटत नाहीं. असो. आतां पंडितजींच्या चरित्रांतील जो ओघ थोडासा खंडित झाल्यासारखा वाटतो तिकडे पुन्हां वळूंया.

गांधर्व महाविद्यालयाची स्थापना

ओकारा येथें अशा प्रकारें स्वरलेखनाचे प्रयोग करून अनेक चिजांचें स्वरलेखन तयार झालें. आतां या चिजा स्वरलेखनासहित छापून प्रसिद्ध कराव्या असें पंडितजींनीं ठरविलें. पुस्तकछपाईचे कामाचे दृष्टीनें मग त्यांनीं आपला मुक्काम तेथून हालवून लाहोर हें ठिकाण कायम वास्तव्या-साठीं निवडलें. लाहोरला आल्यावर पुस्तकें छापण्याचें काम तर सुरू झालेंच; पण त्यापेक्षांहि अधिक महत्त्वाच्या कामासंबंधींच्या योजना पंडितजींनीं आंखल्या. सर्वांत महत्त्वाची म्हणजे संगीताचें शिक्षण देणाऱ्या संस्थेची संस्थापना करण्याबद्दलची योजना होय. पंडितजींबद्दल सहानुभूति असणारे अनेक हितचिंतक त्या वेळीं लाहोरमध्यें होते. त्या सर्वांचेबरोबर पंडितजींनीं चर्चा केली व आपल्या योजनेची त्यांना कल्पना दिली. त्या सर्वांची संमति मिळतांच संस्था स्थापन करण्याचा पंडितजींनीं निश्चय केला. संस्थेचें नांव काय असावें याबद्दल त्यानंतर विचारविनिमय सुरू झाला. अनेकांनीं अनेक नांवें सुचविलीं; पण पंडितजींचे एक चहाते व त्या

प.च. ३

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वेळचे सनातन धर्मसभेंतील प्रमुख कार्यकर्ते कै. पं. दीनदयाळू शर्मा यांनीं सुचविलेलें 'गांधर्व महाविद्यालय' हें सर्वांना मान्य झालें. दि. ५ मे, १९०१ या दिवशीं संस्थेचा शुभारंभ त्या वेळचे लाहोर हायकोर्टचे चीफ जस्टिस कै. सर पी. सी. चॅटरजी यांचे हस्तें झाला. या दिवसाचें महत्त्व संगीताच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिलें जाईल अशी मला खात्री वाटते! या घटनेचें पंडितजींच्या जीवनचरित्रांत तर विशेष महत्त्वाचें स्थान आहेच!! (विद्यालयाच्या संस्थापनेची हकीगत मीं रिटायर्ड कै. कर्नल डॉ. घारपुरे यांचेकडून ऐकली. त्या वेळीं माझें मनही अगदीं आनंदानें भरून गेलें होतें. कै. डॉ. घारपुरे यांच्या खोलींतच विद्यालय प्रथमतः सुरू झालें होतें, त्यामुळें त्यांनाही त्या संस्थेबद्दल आत्मीयता वाटणें अगदीं साहजिक होतें.)

गांधर्व महाविद्यालयाची स्थापना हा एक संगीताच्या इतिहासांतील महत्त्वाचा टप्पा होय. (It is an important milestone in the history of Indian Music.) अशा तऱ्हेचे विचार पंडितजींच्या कार्याचें विवरण करतांना अनेकांनीं काढल्याचें मला माहीत आहे. माझ्या मतेंही हे उद्‌गार पूर्णपणें यथार्थ आहेत. अशा तऱ्हेची ही शिक्षण-संस्था सुरू करण्याची कल्पना अगदीं नवीन व त्या काळांत गवयांना न रुचणारी अशी होती. पण या कार्याबद्दलची पंडितजींची निष्ठा अविचल होती व पुढील काळांत अशा संघटनेशिवाय संगीताचा प्रचार होणें शक्य नाहीं याची पंडितजींना त्या काळींच कल्पना होती. आज त्यांच्या त्या दूरदृष्टीनें घेतलेल्या निर्णयाचें महत्त्व आपल्या लक्षांत येतें. केवळ राजाश्रयावर जगण्याचे दिवस संपत आले असून संगीताच्या उद्धारासाठीं संगीतकलेला आतां लोकाभिमुख झालेंच पाहिजे हा विचार पंडितजींचे मनांत आला व त्यानुसार त्यांनीं सतत प्रयत्न केला हीं एकच गोष्ट त्यांच्या द्रष्टेपणाची द्योतक आहे.

गाण्याचें शिक्षण दिल्यानें गायनविद्येचें नुकसान होतें असा जो एक चमत्कारिक समज त्या काळीं रूढ होता तो पंडितजींनीं आपल्या कार्यानेंच नष्ट करून टाकला. उलट आपल्याजवळील विद्या लोकांत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रसृत न करण्यानेंच आपल्यामधील अमोल अशा अनेक गोष्टींचा नाश झाला आहे व संगीताचा प्रचार केल्याखेरीज संगीताविषयीं जी एक प्रकारची उदासीनतेची व तिटकाऱ्याची भावना समाजांत फैलावलेली आहे ती नष्ट होणार नाहीं अशी त्यांची खात्री होती. हें आपलें मत स्वतःच्या कृतीनें पटवून देण्यासाठीं व निर्व्यसनी आणि चारित्र्यसंपन्न शिष्यशाखा निर्माण करून संगीताला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठीं त्यांनीं विद्यालयाची स्थापना केली. त्या संस्थेचें व संस्थेमधून तयार झालेल्या विद्यार्थीवर्गाचें कार्य पाहतां त्यांचा हा हेतु बहुतांशीं सफल झालेला आहे हें सर्वांनाच मान्य करावें लागेल.

एका लेखकानें पंडितजींच्या कार्याचें मूल्यमापन करतांना त्यांचे गुरु कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्या कांहीं उद्‌गारांचा उल्लेख करून पंडितजींची थोडी निंदा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या लेखकानें 'विष्णुबुवांनीं विद्या बुडवली' असें स्वतःचें मत म्हणून मांडलें असतें तर त्यासंबंधीं चर्चा करून त्यांचे मनांतील फोलपणा सिद्ध करतां आला असता. सूर्यप्रकाशाचें तेज कोणी झांकतो म्हटलें तरा तें नष्ट थोडेंच होणार आहे ! पण त्या लेखकानें वरील दोन्ही थोर व्यक्ति दिवंगत झाल्यावर ती हकीगत प्रसिद्ध केल्यानें एकाकडून दुसऱ्याला बदनाम करण्याचा व आपण मात्र अगदीं नामानिराळे राहण्याचा जो अश्लाघ्य प्रयत्न केला आहे तो अत्यंत निंद्य होय. हे लेखकही आज हयात नाहींत हें खरें; पण त्यांच्या त्या लेखनाबद्दल वाटलेली चीड व्यक्त करण्याखेरीज राहवेना म्हणूनच येथें एवढें लिहिलें आहे. पंडितजींच्या कार्यांचा गौरव न पाहवल्यामुळें त्यांचा द्वेष करणारी कांहीं मंडळी तयार झाली असतील तर कांहीं विशेष नवल नाहीं. तसल्याच प्रवृत्तीचें वरील लेखन हा एक नमुना आहे. पंडितजींचें कार्य व त्याचें महत्त्व संगीतांतील सर्व घराण्यांचें प्रतिनिधित्व करूं शकतील अशा सर्व थोर गायकांनीं यापूर्वींच मान्य केलें आहे. एवढेंच नव्हे तर वरील लेखन करणाऱ्या व्यक्तीलाही त्यांच्या कार्याचें गुणगान एका सभेंत करावें लागल्याचें मला माहित आहे. उदात्त हेतु मनाशीं बाळगून अत्यंत परिश्रमपूर्वक स्वार्थत्यागाच्या बिकट साध-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नानें पंडितर्जीसारख्या द्रष्ट्या पुरुषानें केलेलें कार्य समाजानें मान्य केलें तर त्यांत नवल तें काय ? खरोखरीच संगीताच्या सर्व उपासकांनीं त्यांचें ऋण मानलें पाहिजे एवढें महत्त्वपूर्ण कार्य पंडितर्जींनीं केलें आहे. त्या सर्व कार्याचें अधिष्ठान असलेली अशी 'गांधर्व महाविद्यालय' ही संस्था होय. तिच्या स्थापनेसंबंधींची हकीगत लिहितांना पंडितर्जींच्या कार्याविषयींचा उल्लेख येणें अगदीं अपरिहार्यच आहे.

केवळ एक चरितार्थाचें साधन म्हणून त्यांनीं विद्यालयाची स्थापना केली नव्हती. उलट विद्यालयाचा वाढता व्याप सांभाळण्यासाठीं आर्थिक झीजच पंडितर्जींना सोसावी लागली आहे. संगीत शिक्षण ही विशिष्ट लोकांची मिरासदारी नसून संगीताचें शिक्षण हें सर्वांसाठीं खुलें आहे, हेंच त्यांनीं विद्यालयाची स्थापना करून दाखविलें आहे. थोडक्या पैशांत पद्धतशीरपणें संगीताचे शिक्षणाची सोय अशा विद्यालयांमुळें सर्वसामान्य लोकांस उपलब्ध झाली आहे हें सर्वांनाच मान्य करावें लागेल. विशिष्ट ध्येयानें प्रेरित झालेली शिष्यशाखा निर्माण करण्याचें एक केंद्र म्हणून 'गांधर्व महाविद्यालय' या संस्थेचा उपयोग पंडितर्जींनीं केला. तसेंच सर्वसामान्य लोकांत संगीताबद्दल अभिरुची निर्माण करण्याचें ध्येयही संस्थेसमोर होतेंच. अनेक वर्षे विद्यालयानें कार्य करूनदेखील एकही 'तानसेन' अद्यापि निर्माण झाला नाहीं, अशा अर्थाची टीका झाली असतां "माझ्या विद्यालयामधून तानसेन निर्माण झाला नसेल, पण हजारों कानसेन मात्र जरूर निर्माण झाले आहेत." असें मोठें समयसूचक व खोंचक उत्तर पंडितर्जींनीं दिलें होतें. वरील हकीगतीवरून स्वतःच्या कार्याविषयीं त्यांची कल्पना किती स्पष्ट होती हें उघड दिसतें. पंडितर्जींच्या संगीताच्या प्रसाराचे कार्यामुळें "आमचें गाणें काय आहे तें समजूं शकतील असे श्रोते तरी आम्हांला पहावयास मिळतात" अशा तऱ्हेचे उद्गार कै.गा. भास्करबुवांचेसारख्या अनेक नामवंत गायकांनीं काढल्याचें मीं प्रत्यक्ष ऐकलेलें आहे. गुणग्राही रसिकांचेशिवाय गाणाऱ्याचें समाधान कधींच होऊं शकत नाहीं हें एक निर्विवाद सत्य आहे. गाण्याविषयीं समाजांत अभिरुची निर्माण करण्याचें हें महान् सांस्कृतिक कार्य पंडितर्जींनीं 'गांधर्व महाविद्यालय' या संस्थेमार्फत करून दाखविलें आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुरवातीच्या आर्थिक अडचणी व त्यांचें निवारण

नवा संसार थाटतांच ज्याप्रमाणें प्रथमतः आर्थिक अडचणींशीं सामना द्यावा लागतो त्याप्रमाणेंच नवीन संस्था स्थापन करतांच आर्थिक विवंचना निर्माण होतात. या गोष्टीचा थोडयाच दिवसांत पंडितजींना अनुभव घ्यावा लागला. विद्यालय सुरू करून ७–८ दिवस झाले पण एकही विद्यार्थी संस्थेंत दाखल झाला नाहीं. हें पाहून पंडितजी व त्यांचे साथीदार यांचा धीर खचला असेल हें नक्की; पण अशा संकटांनीं डगमगून जाण्याजोगे कच्च्या दिलाचे पंडितजी मुळींच नव्हते. आतां एकाच ठिकाणीं राहणेंही भाग होतें. थोडे दिवस जातांच कांहीं विद्यार्थी दाखल झाले. महिन्याचे अखेरीस सुमारें १५–२० विद्यार्थी शिकण्यासाठीं येऊं लागले. कार्य तर एकदांचें सुरू झालें; पण आपला स्वतःचा, घरचा व बरोबरच्या सर्व मंडळींचा खर्च चालवण्यास पुरेसे पैसे मात्र मिळत नव्हते व त्याची तर योजना केलीच पाहिजे. तेव्हां आतां काय करावें? असा प्रश्न पंडितजींना पडला. पण त्या वेळींहि ही आर्थिक अडचण दूर करण्याचा मार्ग स्वतःच्या कल्पकतेमुळें व कार्यावरील अविचल निष्ठेमुळें पंडितजींना सांपडूं शकला. गायनाचे जलसे करून विद्यालयाचे कार्यासाठीं पैसे जमवावेत अशी ती योजना होती व ती बऱ्याच अंशीं सफलही झाली. एकदोन जलसे लाहोरलाच झाले व लोकांना विनंती करतांच सुमारें २ हजार रुपये जमा झाले. काश्मीरच्या महाराजांनींहि एकदां पंडितजींचें गाणें ऐकतांच दरमहा दीडशें रुपयांची देणगी विद्यालयासाठीं दिली. ही देणगी इ. स. १९०७ पर्यंत मिळत असे. शिवाय अधूनमधून पंडितजींना जम्मू, श्रीनगर इ. ठिकाणीं बोलावून घेऊन त्यांचा सत्कार योग्य ती बिदागी देऊन काश्मीरचे महाराज वारंवार करीत असत. कपूरथळ्याचे महाराजही विद्यालय पहाण्यासाठीं लाहोरला आले असतां त्यांनींहि ४०० रु.ची देणगी संस्थेला दिली. अशा तऱ्हेनें आर्थिक विवंचना कमी झाली. हळू हळू विद्यार्थीहि वाढूं लागले. पण एक तर लोकांत गाण्याबद्दल व त्यांतल्या त्यांत शास्त्रीय गाण्याबद्दल अभिरुची जरायाच कमी व गाणें शिकणाऱ्या मंडळींबद्दल समाजाची तुच्छता! अशा प्रतिकूल परिस्थितीमुळें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विद्यार्थ्यांची संख्या ६०–७० पर्यंत पोंचण्यासाठींच २–३ वर्षांचा कालावधि लागला. पण पंडितजी त्यामुळें निराश झाले नाहींत. उलट समाजाचा दृष्टिकोन बदलावा व समाजांत संगीताबद्दलची अभिरुची निर्माण व्हावी म्हणून त्यांनीं इ. स. १९०५ मध्यें 'संगीतामृत प्रवाह' नांवाचें एक संगीतविषयक मासिक प्रकाशित करण्याचा आरंभ केला. या मासिकाच्या व संगीतविषयक पुस्तकांच्या छपाईसाठीं त्यांनीं एक छोटासा प्रेसही खरेदी केला. पंडितजींच्या कल्पकतेची व धाडसाची कल्पना यावरून वाचकांना सहज येऊं शकेल.

विद्यालयाची इमारत

लाहोरचे अगदीं एका टोंकास टक्साली गेटजवळ एक जागा रिकामी होती. जवळच स्मशान व आजूबाजूला जंगल अशा विचित्र ठिकाणीं ती जागा होती. तेथें एका साधूंचा मठ होता. ते साधू पंडितजींचे चहाते होते व त्यांनीं ती जागा व स्वतःचा मठ पंडितजींना देऊन टाकण्याचें ठरविलें. त्या साधूंचे जे भक्त होते त्यांनीं सर्व कायदेशीर व्यवहार पूर्ण करून ती जागा पंडितजींचे त्या वेळचे एक सहकारी व लेखकाचे चुलते कै. श्री. गुरुदेवजी पटवर्धन यांचे नांवें करून दिली. त्यांत महत्त्वाची अट अशी होती कीं, ह्या जागेचा उपयोग संगीताचें विद्यालय चालविण्यासाठींच झाला पाहिजे, विद्यालय न चालविलें तर जागा परत द्यावी लागेल. अशा या अटीमुळें तेथें विद्यालयाची स्वतःची इमारत उभी राहिली. पुढें इ. स. १९१३ मध्यें कै. गुरुदेवजींनीं आपला व विद्यालयाचा संबंध सोडतांना आपले नांवावरील कागदपत्र पंडितजींचे नांवावर करून दिले; पण ही सर्व इस्टेट खाजगी नसल्यानें पुढील संकटाचे काळांतही टिकून राहिली. विद्यालयाची ही इमारत पाहून आम्हां सर्व शिष्यमंडळींना किती आनंद वाटत असे याचें वर्णन करणें अशक्य आहे. वाडवडलार्जित घर पाहून देखील जेवढें समाधान होणार नाहीं तेवढें समाधान आपल्या विद्यालयाची ती छोटीशी इमारत पाहून लाभत असे. पण दैवाला तेंही पाहवलें नाहीं व पाकिस्तानच्या निर्मितीनंतर त्याही समाधानास आम्हांस मुकावें लागलें आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उपदेशक वर्ग

केवळ हौशी विद्यार्थ्यांना शिकवून संगीताच्या प्रचाराचें काम पुरें होणार नाहीं हें लक्षांत घेऊन संगीतासाठीं स्वतःचें जीवन वाहतील अशीं कांहीं माणसें शिकवून तयार करावीं असें पंडितजींनीं मनाशीं ठरविलें. त्यासाठीं त्यांनीं कांहीं विद्यार्थ्यांना केवळ फी न घेतां शिकवणें एवढेंच नव्हे तर ९ वर्षेपर्यंत त्यांचा सर्व खर्च करून विद्यादान करण्याचें ठरविलें. व या विद्यार्थ्यांच्या वर्गाला ते 'उपदेशक वर्ग' म्हणून म्हणत असत. या विद्यार्थ्यांच्या मार्फत स्वतःच्या जीवनध्येयाची पूर्तता त्यांना करावयाची होती. ही शिष्यमंडळी चांगली गाणारी तर व्हावीत. पण त्याचबरोबर अत्यंत शीलवान व व्यवस्थितपणें वागणारी व्हावीत अशी त्यांची खटपट असे. धार्मिक कार्य करणारी मिशनरी मंडळी ज्या निष्ठेनें व हिरिरीनें धर्मप्रचाराचें कार्य करतात तशाच निष्ठेनें संगीताच्या प्रचाराचें कार्य या शिष्यवर्गानें केलें पाहिजे अशी त्यांची मनीषा होती. शिवाय संगीताचे शिक्षणांत गुरुसहवासाचें फार महत्त्व आहे ही गोष्टही पंडितजींचे लक्षांत आली होती व म्हणूनच त्यांनीं निवडक मुलें निवडून त्यांचेवर चांगल्या प्रकारच्या गायकीचे व शुद्ध चारित्र्याचे संस्कार करण्यासाठीं वर उल्लेख केलेल्या उपदेशक वर्गाची योजना केली. पंडितजींच्या या शिष्यवर्गानें पुढें जें कार्य केलें व आजही करीत आहे तें लक्षांत घेतां पंडितजींचा हेतु सफल झाला हें लक्षांत येईल. पंडितजींची वरील योजनेमधील आकांक्षा पाहून खरोखरीच त्यांच्या स्वार्थत्यागी व ध्येयनिष्ठ मनोवृत्तीचें यथार्थ दर्शन घडतें. केवळ स्वतःच्या पोटापुरतें मिळवावयाचें म्हटलें असतें तर उत्तरायुष्यांत आर्थिक दृष्ट्या पंडितजींची जी परिस्थिति झाली ती त्यांना कधींच अनुभवावी लागली नसती. अनेक संस्थानिकांनीं मोठमोठ्या पगाराच्या जागाही पंडितजींना देऊं केल्या होत्या. पण त्या सर्व प्रलोभनांचा मोह पंडितजींना कधींच झाला नाहीं व म्हणूनच त्यांचे हातून एवढें श्रेष्ठ स्वरूपाचें कार्य होऊं शकलें. पण या सर्व कार्याचें अधिष्ठान असलेली त्यांची संगीता-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बद्दलची तळमळ, निःस्वार्थी मनोवृत्ती व ध्येयप्राप्तीसाठीं कराव्या लागणाऱ्या परिश्रमांची तयारी या सर्वांचा आदर्श सर्व संगीताच्या साधकांनीं आपल्यासमोर ठेवावयास हवा असें मला वाटतें.

उपदेशक वर्गाची योजना कार्याचे दृष्टीनें जितकी चांगली तितकीच आर्थिकदृष्ट्या अत्यंत कठीण होती. नुकतेंच सुरू केलेलें विद्यालय सुरळीत चालू झालें होतें हें खरें, पण आर्थिक विवंचना पूर्णपणें दूर झाली होती असें नव्हे. पण नवीन मार्ग शोधून कार्य वाढविण्याची पंडितजींची महत्त्वाकांक्षा फार जबरदस्त असल्यानें हें फारच खर्चाचें असें काम त्यांनीं सुरू केलें. प्रथमतः या उपदेशक वर्गात कांहीं पंजाबी विद्यार्थी दाखल झाले. नंतर मिरज, कोल्हापूर, सांगली, कुरुंदवाड, गणेशवाडी इ. पंडितजींच्या जन्मस्थानच्या आसपासचीं मुलेंही पंडितजींनीं या वर्गात दाखल करून घेतलीं. जसजसा या उपदेशक वर्गाचा व्याप वाढूं लागला तसतसा खर्चाचा बोजा वाढूं लागला व या आर्थिक अडचणींतून मार्ग काढण्यासाठीं आतां नुसते लाहोरमध्यें राहून व तेथें वर्गणी वगैरे जमवून भागणार नाहीं हें पंडितजींच्या लक्षांत आलें. मुंबईमध्यें आपल्या विद्यालयाची शाखा काढून कार्याचा विस्तार वाढवावा अशी योजना पंडितजींनीं ठरविली व त्या दृष्टीनें कांहीं प्रारंभिक कार्य करण्यासाठीं कांहीं शिष्यमंडळींना घेऊन पंडितजींनीं मुंबईस प्रयाण केलें.

मुंबईस प्रयाण करण्यापूर्वी उपदेशक वर्गाची आणखी वाढ झाली व त्यामध्यें जयपूर, किसनगढ, काश्मीर, मिरज इ. संस्थानांतील शिष्यवृत्ती घेऊन आलेले कांहीं विद्यार्थीहि दाखल झाले. या सर्व शिस्तींत वाढलेल्या व आपलें नेतृत्व मानणाऱ्या शिष्यलोकांचे द्वारें आपल्या संस्थेच्या शाखा काढून मूळ कार्याची व्याप्ति वाढवावी हा पंडितजींचा विचार असला पाहिजे.

मुंबईस गांधर्व महाविद्यालयाची स्थापना

१९०८ सालीं सप्टेंबरमध्यें पंडितजी कांहीं निवडक विद्यार्थ्यांना घेऊन मुंबईस आले. त्या काळांत मुंबईमध्यें गाण्याचा प्रचार विशेष

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नव्हता. शिवाय तेथें सर्व जातीचीं माणसें राहत असल्यानें सर्वांना कशा रीतीनें आकर्षित करावें हा एक प्रश्नही पंडितजींचे समोर होता. विद्यालय सुरू करण्यापूर्वी आपल्या कार्याचा लोकांना परिचय व्हावा व संस्थेची शाखा स्थापन होण्यास अनुकूल वातावरण निर्माण व्हावें यासाठीं त्यांनीं कांहीं जलसे मुंबईमध्यें केले. यापूर्वी गायनाचे कार्यक्रम कांहीं श्रीमंत लोकांच्या घरीं होत असत. ते सर्वांना खुले नसत. पण पंडितजींनीं तिकिटें लावून जलसे करण्याची ही नवी पद्धति सुरू केली. ती अर्थातच खूप यशस्वी झाली व पंडितजींच्या कार्याविषयीं लोकांत सहानुभूति निर्माण झाली. ७–८ जलसे केल्यानंतर लोकांना पंडितजींनीं आपल्या कार्याचा हेतु समजावून देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. नंतर दसऱ्याच्या सुमुहुर्तावर जगद्‌गुरु शंकराचार्य यांच्या हस्तें गांधर्व महाविद्यालयाच्या शाखेचें उद्‌घाटन झालें.

दोन हत्तींजवळ गिरगांव बॅक रोड (हल्लींचा विठ्ठलभाई पटेल रोड) येथें दीक्षितांच्या भव्य इमारतींत विद्यालय सुरू झालें. थोड्याच अवधींत विद्यालयाची एवढी प्रगति झाली कीं ती भव्य इमारतहि विद्यालयाच्या वर्गांना अपुरी पडूं लागली. कामाचें स्वरूप अत्यंत पद्धतशीर व शिक्षण देण्याची अत्यंत सुलभ व सूत्रबद्ध पद्धति यामुळें थोड्याच दिवसांत विद्यालयाचा खूपच बोलबाला झाला. पारशी, गुजराथी, बोहरी, मुसलमान, महाराष्ट्रीय इ. सर्व जातींचे व सर्व प्रांतीय लोक विद्यालयांत शिक्षणासाठीं येऊं लागले. १०-१२ गाण्याचे वर्ग, ४-५ वादनाचे वर्ग व ४-५ स्पेशल वर्ग असे एकूण सुमारें २० वर्ग एका वेळीं सुरू असत. सकाळीं ७ ते १० व संध्याकाळीं ६ ते १० पुरुषांचेसाठीं व दुपारीं ३ ते ६ कुलीन स्त्रियांसाठीं अशा विद्यालयाच्या वर्गांच्या वेळा होत्या. स्त्रियांचे वर्गांची वेळ थोड्याच दिवसांत अपुरी वाटूं लागली. सुमारें २९० स्त्रिया विद्यालयांत शिक्षण घेण्यासाठीं येऊं लागल्या.

पारशी समाजांत त्या काळीं इंग्रजी संगीताचा अभ्यास फार मोठ्या प्रमाणावर होत असे. भारतीय संगीताकडे त्यांचें दुर्लक्ष होतें. याचें कारण एक तर त्यांची पाश्चात्य पद्धतीची राहणी हें होतें व दुसरें असें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कीं, विद्यालयाची स्थापना होण्यापूर्वी भारतीय संगीताच्या शिक्षणाची पद्धतशीर व्यवस्था नव्हती, पण पंडितजींनीं पारशी समाजांतहि आपल्या प्रचाराचें लोण पोंचविलें व त्या समाजांतील अनेक स्त्रीपुरुष विद्यालयांत दाखल झाले.

हळूहळू विद्यालयाचा व्याप वाढत गेला व २-३ वर्षांचे अवधींत विद्यार्थ्यांची संख्या ५०० पर्यंत जाऊन पोंचली. येथील कार्याचें व्यापक स्वरूप लक्षात घेऊन मुंबईचें विद्यालय हेंच संस्थेचें मुख्य केंद्र बनलें व लाहोरच्या संस्थेस शाखेचें स्वरूप आलें. थोड्याच दिवसांत विद्यालयाच्या शाखा पुणें व नागपूर येथें सुरू करण्यांत आल्या. मुंबईंत सुद्धां काळबा-देवी रोडवर आणखी एक शाखा उघडण्यांत आली.

गांधर्व महाविद्यालयाचा वाढता व्याप

मुंबई येथें चाललेलें गांधर्व महाविद्यालयाचें कार्य इतक्या यशस्वी रीतीनें चालू होतें कीं, थोड्याच दिवसात मुंबईचें कार्यक्षेत्र वाढत्या व्यापास अपुरें वाटून गांधर्व महाविद्यालयाच्या दोन शाखा नागपूर व पुणें येथें १९१२ सालीं काढण्यांत आल्या. मुंबईच्या गांधर्व महाविद्या-लयाचें आणखी वैशिष्टय असें कीं, सर्व जमातींतील लहानथोर व स्त्री-पुरुष मोठ्या आवडीनें विद्यालयांत शास्त्रीय संगीताचा अभ्यास करूं लागले. याचाच अर्थ शास्त्रीय संगीत हें केवळ मूठभर लोकांच्यासाठीं राहिलें नसून बहुजन समाजाला शास्त्रीय संगीताची अभिरुची खऱ्या अर्थानें निर्माण झाली. ज्या काळांत ही अभिरुची उत्पन्न झाली त्या काळाचा विचार करतां ही गोष्ट कौतुकास्पद आहे हें कोणीहिं मान्य करील. ज्या पारशी जमातींवर इंग्रजी संगीताचा फार मोठा पगडा बसला होता, त्या जमातींतील स्त्रियांचा सुद्धां भारतीय स्वर्गीय संगीत शिकण्या-कडे कल वाढूं लागला. नेमकी हीच गोष्ट मुसलमान, गुजराथी, मारवाडी स्त्रियांचे बाबतींत दिसून येऊं लागली.

दर वर्षी विद्यालयांतील विद्यार्थ्यांची संख्या अतिशय मोठ्या प्रमाणावर वाढूं लागल्यानें साहजिकच नवीन शिक्षकवर्ग निर्माण करण्याची गरज

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भासूं लागली. ही गोष्ट पंडितजींनीं लक्षांत घेऊन नवीन संगीत शिक्षक तयार करून गायन शिकविणें हीसुद्धां प्रत्यक्ष गाण्याइतकी मेहेनतीची कला आहे हें सिद्ध केलें. थोडक्यांत म्हणजे मोठमोठ्या शैक्षणिक संस्थांत जे जे कार्यक्रम शैक्षणिक दृष्ट्या उपयुक्त असतात ते ते कार्यक्रम गांधर्व महाविद्यालयांत सुरू करण्यांत आले. उदाहरणार्थ, विद्यालयाचा वार्षिकोत्सव व विद्यार्थ्यांचें वार्षिक स्नेहसंमेलन; या गोष्टीमुळें विद्यालयाचा बाहेरील जगाशीं अतिशय निकटचा संबंध येऊन संगीत शिक्षण ही गोष्ट जीवनास अत्यंत उपयुक्त व आवश्यक आहे ही गोष्ट समाजास पटूं लागली.

याही पुढील प्रगतीचा टप्पा म्हणजे लग्न-मुंजीसारख्या मंगल प्रसंगीं होणाऱ्या नायकिणींच्या गाण्याची जागा पंडितजींसारख्या गायनाचार्यांनीं घेतली. अशानें गायकास समाजांत उच्च दर्जा प्राप्त झाला व नवीन-नवीन गायक उदयास येण्यास मदत झाली. अशा रीतीनें पंडितजींच्या कार्याला विशाल स्वरूप येऊन संगीताच्या कोणत्याहि बाबतींत पंडितजींचा सल्ला घेण्याची समाजास गरज भासूं लागली. अशा रीतीनें गांधर्व महाविद्यालय ही संस्था केवळ संगीत शिकविण्याचें केंद्र न रहातां त्यास ॲकॅडमी ऑफ इंडियन म्यूझिक हें विशाल स्वरूप प्राप्त झालें.

संगीत परीक्षांची अभिनव कल्पना

वरीलप्रमाणें गांधर्व महाविद्यालयास जें विशाल स्वरूप प्राप्त झालें तेवढ्यावरच पंडितजी संतुष्ट राहिले नाहींत तर त्यांच्या विचारांची धांव आणखी पुढें गेली होती. त्याचें थोडक्यांत उदाहरण द्यावयाचें झालें तर पंडितजींनीं काढलेली संगीत परीक्षांची अभिनव कल्पना. यामध्यें सुद्धां पंडितजींना विद्यार्थ्यांना शिकविण्याचे जे अनुभव आले होते त्या अनुभवांच्या जोरावरच पहिल्या चार वर्षांत संगीत प्रवेशिका व पुढील पांच वर्षांत संगीत प्रवीण अशा दोन परीक्षा त्यांनीं निर्माण केल्या. कोणत्याहि विद्यार्थ्यास तो गाणें शिकण्यास योग्य होण्यासाठीं—प्रथम गाण्याचे प्राथमिक अभ्यासासाठीं—कमींत कमी चार वर्षांचा अवधि लागतो आणि पुढील पांच वर्षांचा अवधि त्या विद्यार्थ्यांची गाण्यांतील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विचारशक्ति अधिक प्रगल्भ होण्यास लागतो, असाच पंडितजींचा अनुभव होता. आणि त्यानुसार त्यांना या वरील दोन संगीत-परीक्षा निर्माण करण्याची आवश्यकता भासली. अर्थात् कोणत्याहि अभिनव कल्पनेस मूर्त स्वरूप येण्याचेपूर्वी समाजाकडून जी हेटाळणी केली जाते त्या हेटाळणीस पंडितजी अपवाद नव्हते. परंतु अतिशय उच्च कल्पनांचा हा निर्माता अशा अडचणीमुळें डगमगणारा नव्हता. व आनंदाची गोष्ट ही कीं, कांहीं जुन्या गायकांनींहि या नवीन कल्पनेचें अतिशय मोठ्या प्रमाणावर स्वागत केलें. हेटाळणी करणाऱ्या लोकांना पंडितजींनीं असें रोखठोक उत्तर दिलें कीं, "इंग्रजी अभ्यासक्रमांतील पदव्या मिळविण्यास जी मेहेनत व बुद्धि लागते तितकीच मेहेनत व बुद्धि संगीत शिक्षणास आवश्यक आहे. त्या दृष्टीनें इंग्रजी पदव्यांना जी मानमान्यता तुम्ही देतां तीच मानमान्यता संगीत पदव्यांना कां देत नाहीं?" हें उत्तर ऐकल्यानंतर हेटाळणी करणारे लोक निरुत्तर झाले हें सांगणें नकोच! आपण स्वतः तर कांहीं करावयाचें नाहीं व दुसऱ्यानें चांगलें केलेलें पहावत नाहीं अशी वरील लोकांची गत झाली होती. त्याही पलीकडे जाऊन ज्याप्रमाणें मुंबई किंवा इतर प्रांतांतील विश्वविद्यालयांचे (युनिव्हर्सिटीचे) 'पदवीदान समारंभ' त्या त्या प्रांतांच्या गव्हर्नरांचे हस्तें व्हावयाचे, तोच प्रघात आपल्याकडे लागू करण्याचे इराद्यानें पंडिजींनीं पदवीदान-समारंभ मुंबईच्या गव्हर्नरांच्या हस्तें घडवून आणण्याचा निश्चय केला. त्या उद्योगास पंडितजी लागले व त्यांच्या निश्चयास फळहि लवकरच आलें.

मुंबईतील पदवीदान-समारंभ

सन १९११ पर्यंत खुद्द पंडितजी व त्यांचे सहकारी व विद्यालयाचे उपप्राचार्य कै. वादनाचार्य पं. गुरुदेवजी पटवर्धन हे दोघे शेवटची परीक्षा (संगीत प्रवीण) घेत व प्राथमिक परीक्षा विद्यालयांतील इतर शिक्षक घेत असत. १९११ सालीं पहिला पदवीदान समारंभ मुंबईचे त्या वेळचे गव्हर्नर लॉर्ड सिडनहॅम क्लार्क यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटामाटानें साजरा झाला. त्यानंतर दुसरा पदवीदान समारंभ १९१५

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सालीं मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. १९१९ सालीं विद्यालयाचा तिसरा पदवीदान-समारंभ मुंबईचे श्रीमान् गृहस्थ व संगीताचे महान् प्रेमी सर महंमद युसुफ सौदागर यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. चौथा पदवीदान-समारंभ १९२१ सालीं मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड यांचे हस्तें पार पडला. अशा रीतीनें पदवीदान-समारंभांची प्रथा पंडितजींनीं सुरू केली. संगीत-सृष्टींत या दृष्टीनें पंडितजी महान् क्रांतिकारक ठरले!

अशा तऱ्हेचा पदवीदान-समारंभ करण्याच्या पंडितजींच्या नवीन कल्पनेकडे कांहीं गायक फार तुच्छतेनें पाहूं लागले. परंतु त्या गरीब बिचाऱ्या गायकांना हें समजत नव्हतें कीं, समाजांतील इतर आवश्यक व्यवहारांप्रमाणेंच संगीताला जर कां व्यावहारिक स्वरूप दिलें नाहीं तर भविष्य काळांत या गायकांना धन, मान, मान्यता या कोणत्याही दृष्टीनें महत्त्वाचें स्थान मिळणें कठीण आहे. गायनकला ही चार ठराविक लोकांची शिक्षणाची बाब नसून त्या वेळच्या सुविद्य लोकांनादेखील इतर शिक्षणाप्रमाणेंच संगीताची आराधना करण्यामध्यें कोणताच कमीपणा वाटूं नये हाच उच्च विचार पंडितजींच्या मनांत होता. अशा रीतीनें हेटाळणीच्या काटेरी मार्गांतून जात असतां पंडितजींना प्रगतीचीं नवीन नवीन क्षितिजें दिसूं लागलीं. अशा रीतीनें पंडितजींनीं समाजांत संगीताला हळूहळू मानाचें स्थान मिळवून दिलें; त्याचाच परिणाम म्हणून कीं काय विद्यालयाच्या पवित्र जागेंत शेंकडो विद्यार्थी विद्याग्रहण करूं लागले व अप्रत्यक्षरीत्या खऱ्या कलेचे हजारों रसिक निर्माण झाले. खऱ्या मुरब्बी गायकाला लोकांना गायन शिकविणें ही कमीपणाची गोष्ट बिलकूल नाहीं ही गोष्ट पंडितजींच्या रूपानें सिद्ध झाली. आजकालचे कांहीं विद्वान् संगीततज्ञ म्हणतात कीं सच्चा कलाकार हा कधींहि शिक्षकी पेशांतून निर्माण होऊं शकत नाहीं. खरा कलाकार गाणें शिकविण्यांत कधींहि रममाण होऊं शकत नाहीं. अशा विधानकाराला स्वतःसंबंधीं शिक्षक कीं कलाकार काय म्हणावयाचें हें समजणें कठीण आहे. परंतु वरील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रविवानांना पंडितजींनीं आपल्या कृतीनें योग्य तें उत्तर यापूर्वीच देऊन ठेवलें आहे.

जलशाचे 'आद्य प्रवर्तक' पंडितजी

गायकांचे जलसे करण्याचा प्रघात त्या काळीं फारच कमी होता. संस्थानिक, क्लब, श्रीमंत लोक, सरदार, इत्यादि खास लोकच आपल्या खासगीच गायकांच्या बैठकी करीत. त्यामुळें सामान्य जनांना हक्कानें गाणें ऐकावयास मिळत नसे. शिवाय श्रीमंत लोकांचा गाणें ऐकण्याचा षोकहि पुढेंपुढें कमी होत गेला व गाणाऱ्यांचें पोटहि भरेनासें झालें. अशा काळीं पंडितजींनींच प्रथम 'जलसा' जाहीरपणें सुरू केला. जलसा सुरू केल्याबरोबर श्रोतृसमाजहि बराच जमूं लागला. पंडितजींचा आवाजहि मोठा असल्याकारणानें गाणें ऐकूं न येण्याची अडचण उत्पन्न होण्यासारखी नव्हतीच. १९०९ सालीं मुंबईस धोबी तलावावरील फ्रॉमजी कावसजी हॉलमध्यें जलसे सुरू झाले ते अव्याहत विद्यालयाची स्वतःची इमारत १९१५ पर्यंत होईंतों वरील हॉलमध्येंच होत असत. अशा रीतीनें जलसे करून पंडितजींनीं लोकांमध्यें संगीताची अभिरुचि निर्माण केली. पंडितजींनीं सात वर्षें लोकांना जलसे जे ऐकविले ते असे कीं, हिंदु, मुसलमान, पारशी, गुजराथी यांचे कोणत्याहि सणाला पंडितजींचा जलसा हा असावयाचाच अशा रीतीनें!

पंडितजींचें लोकशिक्षण

जलसा सुरू होण्याची वेळ जर रात्रींची ९॥ ची ठेविलेली असेल तर जलसा ९॥ च्या ठोक्याला सुरू झालाच पाहिजे असा पंडितजींचा कटाक्ष असे. त्या वेळच्या खांसाहेबी प्रकारास अनुसरून लोक पंडितजींच्या जलशाला उशिरानें येत व मग 'गाणें थोडेंच ऐकण्यास मिळालें' म्हणून तक्रार करीत! त्यावरून 'जलसा अगदीं वेळेवर सुरू होत असतो, तेव्हां लोकांनीं वेळेवर यावें' अशी पंडितजींनीं विनंति करतांच श्रोते अगदीं वेळेवर जमूं लागले!! अशा प्रकारें वेळेवर जलसा सुरू करणें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

व वेळेवरच बंद करणें हा प्रघात पंडितजींनीं पाडला!!! एकेक वेळीं जलसा बंद होण्याची वेळ जवळ आली आहे व इकडे गाणें तर चांगलेंच रंगलें आहे अशा परिस्थितींत सुद्धां पंडितजी आपलें गाणें अगदीं वेळेवर बंद करीत असत. असें करतांना पुष्कळ लोक नाखूष होत असत. त्या वेळीं पंडितजी त्यांना म्हणत, "अहो, 'गायकाला वेळेची किंमत कळली पाहिजे' असें तुम्ही जसें सांगतां, तसेंच वेळेवर जलसा बंद करण्याची संवयसुद्धां तुम्हीं लोकांनीं केली पाहिजे." हें श्रोत्यांना पटवून देण्याचें काम पंडितजींच्या जलशानें केलें असें म्हणणें अनुचित ठरणार नाहीं.

पंडितजींच्या जलशांची लोकप्रियता

सर्व हिंदुस्थानभर जलसे करून विद्यालयाचे खर्चासाठीं पंडितजींनीं पैसे कमवून आणून दिले. मुंबईस जलशाची टूम इतकी लोकप्रिय झाली कीं पंडितजींच्या जलशानंतर ट्रामगाड्या, मोटारगाड्या, व्हिक्टोरिया यांची स्वतंत्र व्यवस्था त्या त्या कंपन्या करूं लागल्या! पारशी लोकांच्या सणानिमित्त त्यांच्या धर्मांतील एका प्रसंगावर, इतकेंच काय पण सोराब रुस्तुमच्या गोष्टीवरसुद्धां प्रासंगिक गाणीं व भाषणें करून त्या लोकांचीं मनें पंडितजींनीं आकर्षण करून घेतलीं!!!

पंडितजींची सोन्याची सरी

जलसे करून पैसे मिळविण्याची कल्पना इतर विद्वान् गायकांना पटून त्यांचेहि जलसे सुरू झाले. आपल्या जलसे करण्याच्या कल्पनेनें विद्वान् गायकहि आपापले जलसे करूं लागल्याचें पाहून पंडितजींना फार आनंद झाला! मात्र थोड्याच दिवसांत इतर गायकांना मिळावयास पाहिजेत तेवढे पैसे मिळत नाहींत असें कळल्यावर त्यांना फार वाईट वाटलें!! इतर गायकांच्या जलशांमागें स्वोदरभरणाशिवाय अन्य कांहीं उद्दिष्ट नसल्यामुळें व पंडितजींच्या जलशांचें उत्पन्न विद्यालयाचे खर्चासाठीं असून लोककार्याला उपयोगी पडण्याची कल्पना त्यांमागें असल्यामुळें, लोकांची उडी पंडितजींच्याच जलशावर पडे!!! पंडितजींचा वक्तशीर-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पणा, मोठा आवाज, टापटीप, इतर आकर्षक कार्यक्रम वगैरे गोष्टी इतर गायकांमध्यें नसल्यामुळें, मोकळ्या खुर्च्यांना जलसा ऐकविण्याचा प्रसंग कांहीं गायकांवर आलेला प्रस्तुत लेखकानें प्रत्यक्ष पाहिलेला आहे.

'खुर्चीवर बसूनच गाणार !'

मिरज, सांगली, कोल्हापूर या भागांत जलसे करण्यासाठीं पंडितजी १९१२-१३ सालीं गेले असतां, कोल्हापुरास तीन चार सार्वजनिक जलसे झाले. ते जलसे झाल्यावर त्या वेळचे कोल्हापूरचे श्रीशाहू छत्रपती महाराजांनीं आपल्या राजवाड्यांत पंडितजींचा खास जलसा करविला. राजवाड्यांतील चौक लोकांच्या गर्दीनें भरून गेला होता. पंडितजींच्या गाण्याची वेळ जवळ येतांच पंडितजींनीं महाराजांच्या कारकुनांना सांगितलें कीं, "मला गाण्यासाठीं ५-६ खुर्च्या पाहिजेत." "कशाकरितां खुर्च्या पाहिजेत ? गवई नेहमीं खालीं बसून गातो, गाणें करविणाऱ्यांच्या पायांजवळ बसून गात असतो, तेव्हां तुम्ही त्यांचेपेक्षां निराळे असे कोण गाणारे आहांत ?" म्हणून विचारल्यावर पंडितजींनीं समयसूचकतेनें उत्तर केलें, "जर महाराज, सरदार व इतर प्रतिष्ठित लोक खुर्च्यांवर बसले आहेत, तर हा गवईसुद्धां खुर्चीवर बसूनच गाणार !" असें रोख-ठोक उत्तर मिळतांच, "महाराजांना विचारून तुम्हांला खुर्च्या देतों" असें सांगून महाराजांना विचारतांच महाराजहि चकित झाले व त्यांनीं खुर्च्या देण्यास सांगितलें. दोन तास खुर्चीवर बसून पंडितजींचें गाणें झालें! सर्व साथीदार सुद्धां खुर्च्यांवर बसले होते !! तें दृश्य पाहून गाणें संपल्यावर महाराज पंडितजींना म्हणाले, "विष्णुबुवा, गवई खुर्चीवर बसून गातांना मी आज प्रथमच पाहतों आहें. फार आनंद वाटला." यावर पंडितजींनीं सुद्धां पुढीलप्रमाणें योग्य तेंच उत्तर दिलें. ते म्हणाले, "महाराज, सर्व समाज खुर्च्यांवर बसला असतांना गायकानें खालीं काय म्हणून बसावें ? गायकाचा व संगीतविद्येचा हा अपमान आहे ! तो मला सहन होईना म्हणून मीं खुर्च्या मागितल्या." अशा प्रकारचा जबाब पंडितजींच्या कडून मिळतांच महाराज पंडितजींच्या बाणेदारपणाबद्दल धन्योद्गार काढून निघून गेले !!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

' तेंच पद मला ऐकवा ! '

काश्मीरच्या महाराजांचेकडे १९१३ सालीं काश्मीरच्या महाराजांचे पुतण्यांच्या लग्नानिमित्त पंडितजींना पार्टीसहित रोजचे ५०० रु. वर बोलावलें होतें. लग्नसमारंभ जम्मूस होता. लग्नाला पुष्कळ गवई बोलावले होते. त्यांचे निरनिराळ्या वेळीं कार्यक्रम होते. पंडितजींच्या जलशाचा कार्यक्रम मात्र रोज रात्रीं ३ तास होत होता. एके दिवशीं पंडितजींना पंजाबचे त्या वेळचे गव्हर्नरांचे समोर गाण्यासाठीं फक्त ३ मिनिटें वेळ दिला होता ! इतर इंग्रजी कार्यक्रम होते व पंडितजींच्याच गाण्याचा कार्यक्रम फक्त ठेवला होता ! ! तीन मिनिटांत पंडितजींनीं त्यांचें खास लोकप्रिय पद ' सुमरन करले मेरे मन ' हें सुरू केलें. पंडितजींचें पद खणखणीत आवाजांत ऐकूं गेल्यानें गव्हर्नर " आणखी ५ मिनिटें तेंच पद मला ऐकवा " म्हणून सांगूं लागले ! ! !

पंडितजींच्या गाण्याचा परिणाम गव्हर्नरसाहेबांवर इतका झाला कीं, काश्मीर महाराजांच्या मदतीनें त्यांनीं पंडितजींची ओळख करून घेतली व प्रत्यक्ष पंडितजींचें गाणें ऐकविल्याबद्दल स्वतःच आभार मानले !

' सो सुनारकी और एक लुहारकी ! '

वरील लग्नसमारंभास पुष्कळसे संस्थानिक आले होते. त्यांचेसाठीं पुष्कळ गायकांचीं गाणीं होत होतीं. एका संस्थानिकांच्या बैठकींत पंडितजींनींच भेट करवून देऊन त्यांचें गाणें ठरविल्यामुळें कलकत्त्याचे गजल म्हणणारे प्यारासाहेब यांचें गजल म्हणणें चाललें होतें. आवाज फारच गोड व बायकी होता. सर्व संस्थानिक मजेंत होते. अशा स्थितींत पंडितजींच्या ओळखीचे एक संस्थानिक पंडितजींना म्हणाले, " पंडितजी, तुमच्या गाण्यापेक्षां हें गाणें आम्हांला फार बरें वाटतें." तेव्हां पंडितजींनीं उत्तर दिलें, "खरें आहे, महाराज. माझें गाणें इतकें हलकें नाहीं कीं, तें आपणांला सहज समजेल. आपण मजेंत आल्यावर तर हें जनानी गाणेंच आपणांस पसंत पडणार ! " असें उत्तर देऊनसुद्धां पुन्हा ते संस्थानिक म्हणाले, " पंडितजी, यांचें गाणें किती गोड आहे, नाजूक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आहे व ते कशा बारीक बारीक भिरभिरून ताना घेत आहेत ! ” असें बोलतांच पंडितजी म्हणाले, “ कहां तोफ की गोली और कहां ये बंदूककी गोली ! महाराज शाहाब, ‘ सो सुनारकी और एक लुहारकी ! ! ’ इतका आम्हां दोघांमध्यें फरक आहे.”

लगेच दुसरे दिवशीं त्याच संस्थानिकांनीं पंडितजींचें गाणें ऐकून त्यांची योग्यता किती मोठी आहे याची प्रचीति त्यांनीं प्रत्यक्षच अनुभविली !

पंडितजींचे दौरे

पंडितजींनीं सर्व हिंदुस्थानभर जलसे केले. संगीताची आवड उत्पन्न करणें व संगीताचा प्रचार करणें या दोन्ही गोष्टी जलशांमुळें साध्य होत असत. दिवाळीच्या, नाताळाच्या व उन्हाळ्याच्या सुट्टींत पंडितजी दौरे काढीत असत.

नागपूर, उमरावती, अकोला, खामगांव, यवतमाळ इत्यादि गांवांतून वऱ्हाडांत, पुणें, नाशिक, मिरज, सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी, बेळगांव, धारवाड, हुबळी, दक्षिण हैद्राबाद इत्यादि महाराष्ट्रांतील दक्षिण विभागांत, यू. पी. व बिहारमध्यें, पाटणा, बनारस, अलाहाबाद, कानपूर, लखनौ इत्यादि ठिकाणीं, दिल्ली, मथुरा, जालंदर, अमृतसर, पेशावर, रावळपिंडी, कराची, सिंध हैद्राबाद, सक्कर, शिकारपूर, क्वेट्टा, मुलतान, नागपूर, रायपूर, विलासपूर, खडगपूर, कलकत्ता, जयपूर, जोधपूर, विकानेर, अजमेर, इंदूर, उदयपूर, उज्जैन इत्यादि अनेक लहानमोठ्या गांवांत दौरे काढून पंडितजींनीं संगीताचा प्रचार केला. या सर्व ठिकाणीं संगीताच्या बाबतींत श्रोते इतके मागासलेले दिसले कीं, त्यांना खऱ्या गाण्याचा अजून गंध सुद्धां नाहीं असे अनुभव पंडितजींना आले !

संस्थानिकांच्या पदरीं गायक लोक नोकरीसच होते, त्यामुळें संस्थानांतून रसिक श्रोते चांगले मिळत असत. पतियाळा, नाभा, काश्मीर, म्हैसूर वगैरे ठिकाणीं तर पंडितजींना बोलावून, दोन-दोन महिने ठेवून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घेऊन, उत्तम बिदागी देऊन व सन्मान करून वरील संस्थानिक पाठवीत असत. वरील सर्व ठिकाणीं पंडितर्जींच्या बरोबर शिष्य या नात्यानें प्रस्तुत लेखकास त्यांचेबरोबर राहण्याची संधि मिळाली होती. त्यामुळेंच त्या वेळचे पंडितर्जींचे अनुभव संक्षेपानें लिहिणें शक्य झालें आहे.

" जलसा बंद ठेवा ! "

१९१२ अखेर रायपूर, बिलासपूर, खडगपूर अशीं गांवें घेत घेत कलकत्त्यास आल्यावर लाला दामोदरदास म्हणून एक फार मोठे व्यापारी व श्रीमान् गृहस्थ तेथें होते, त्यांचेच घरीं पंडितर्जींना व त्यांच्या सर्व पार्टीला उतरण्यास जागा मिळाली होती. कलकत्ता हें फार मोठें शहर, तेथें गाण्याचा षोक फार, श्रोते चांगले रसिक मोठमोठे जमीनदार म्हणून पंडितर्जींनीं अगोदरच बराच खर्च करून पार्टीतील मुलांना व मोठ्या मंडळींना कपडे वगैरे अगदीं व्यवस्थित करून घेतले होते ! पण प्रत्यक्ष अनुभव मात्र उलटा आला ! ! जलसे करण्यास आलेल्यांचें गाणें ऐकण्याचा षोक त्या वेळीं कलकत्त्यांत मुळींच नव्हता. पडदापद्धति रूढ होती. गांव इतकें अफाट कीं सर्व गांवांत माहिती करून द्यावयाची म्हटलें तर साधारण माणसांचें हें काम नाहीं असाच अनुभव आला. तथापि पंडितर्जींना शक्य होतें तेवढा जाहीरखबरींत त्यांनीं खर्च केला. परंतु व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. एकदोन जलशांना जेमतेम उत्पन्न झालें. पंडितर्जींना काय करावें असा विचार पडला.

त्याच वेळीं पंडितर्जींचे लाहोरचे एक शिष्य लाला लालचंद हे कलकत्त्यास गव्हर्नमेंट पोस्टखात्याचे प्रिंटिंग कॉन्ट्रॅक्टर होते. जलशांची जाहीर खबर जास्त केली तर फायदा होईल असें त्यांना पंडितर्जींकडून कळल्यावरून त्यांनीं सांगितलें, " पंडितजी, आपणांस हस्तपत्रिका (हँड्बिलें) पाहिजेत तितक्या छापून देतों. बिल सावकाश द्या. " हस्तपत्रिकांचा थोडा फायदा दिसूं लागल्यामुळें नाताळच्या सुट्टीपर्यंत कलकत्त्यास राहण्याचें पंडितर्जींनीं ठरविलें. परंतु त्याचे आधींच एक भयंकर गंडांतर पंडितर्जींवर गुदरलें !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्या वेळीं बंगाल क्रांतिकारकांची भूमि म्हणून प्रसिद्ध होता. आणि पंडितजी व त्यांची पार्टी सर्व महाराष्ट्रीय होती. अशा स्थितींत दिल्लीस लॉर्ड हार्डिंज यांचेवर बॉंब फेकण्यांत आल्यामुळें सगळीकडे एकच गडबड उडून गेली होती. त्या दिवशीं पंडितजींचा जलसा होता. जलशाला गर्दीहि बरीच झाली होती. जलशाला सुरुवात होण्याचे अगोदर कांहीं सरकारी अधिकारी "जलसा बंद ठेवा" म्हणून सांगण्यास आले. पण त्यांस पंडितजींनीं नकार देऊन जलसा ठरल्याप्रमाणें सुरू केला! जलशांतील २।३ कार्यक्रमांनंतर जलशांतच "आज जलसा चालू ठेवण्याचें कारणच हें कीं, 'व्हाइसरॉय साहेबांना दीर्घायुष्य लाभो' अशी ईश्वराची प्रार्थना आपणां सर्वांस करतां यावी. संगीतानें ईश्वराची प्रार्थना केली असतां, तो लवकर पावतो, म्हणून आजचा सर्व जलसा व्हाइसरॉय साहेबांना दीर्घायुष्य चिंतण्यांत आपण घालवूं.' असें समयोचित भाषण करून पंडितजींनीं अधिकाऱ्यांस खूष केलें!!

कलकत्त्यांतील कार्य

कलकत्त्यांतील मुक्कामाचा जेमतेम खर्च भागला. फार फायदा होऊन विद्यालयाचे खर्चास उपयोगी पडेल असें वाटत होतें, तें झालें नाहीं. कलकत्त्याहून बनारसला जाण्याचें ठरवून कलकत्त्याचीं बिलें भागविणें सुरू झालें. लाला दामोदरदासांनीं घराचें भाडें घेतलें नाहीं! लाला लालचंदांनीं लाख हस्तपत्रिका छापून दिल्या होत्या; पण त्यांनीं त्यांचें बिल मुळींच घेतलें नाहीं!! कलकत्त्याला ज्या कांहीं देणग्या मिळाल्या त्यांमुळें तोंडमिळवणी होऊन कलकत्त्याहून बनारसला सर्व पार्टीसह पंडितजी येऊन पोहोंचले.

कलकत्त्याची ही अशी विकट परिस्थिति असतांना सुद्धां पंडितजी ४० ते ५० मंडळी बरोबर घेऊन कलकत्त्याला राहूं शकले, ही हलकी गोष्ट नाहीं. आणि हें सर्व कशासाठीं? तर संगीताच्या प्रचारासाठीं! केवढी ही धाडशी वृत्ति नि केवढा हा स्वार्थत्याग!! हें धाडस सर्वांच्या हातून होण्यासारखें नाहीं. ज्यांनीं पंडितजींचें अनुकरण करून धाडस

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केलें त्यांना धक्काच बसला ! ! ! कारण त्या भांडसामागें कांहीं कार्य नव्हतें, केवळ उदरंभरण होतें, त्यामुळें त्यांना यश आलें नाहीं.

१९१३ नंतर पंडितजी पुष्कळदां कलकत्त्यास गेले व त्यांनीं तेथें संगीताचा प्रचार केला. आज त्याच कलकत्त्यांत संगीताच्या बाबतींत इतकी जागृति झाली आहे कीं, गवयांचे सन्मान होत आहेत, हजारोंनीं लोक गाणें ऐकण्यास येत आहेत, व शेंकडयांनीं मुलें व मुली गाण्याचा अभ्यास करूं लागलीं आहेत. हा सर्व प्रचार पंडितजींनींच केला. झीज सोसून कार्य केलें तें पंडितजींनींच.

अलाहाबाद, कानपूर, अहमदाबाद, संयुक्तप्रांत येथील कार्य

१९१५-१६ सालापर्यंत अलाहाबादला संगीताचा मुळींच प्रचार नव्हता. साधी तान जर पदांत घेतली तर लोक हंसत असत ! आतां त्याच अलाहाबादमध्यें पंडितजींच्या प्रचारामुळें केवळ उच्च संगीतच ऐकणारा असा दांडगा श्रोतृसमाज तयार झाला आहे ! ! पंडितजींचे शिष्य प्रो. विष्णु अण्णाजी कशाळकर यांना प्रथम फारच त्रास पडला, पण त्याच ठिकाणीं पंडितजींचे शिष्य कै. प्रो. रघुनाथराव पटवर्धन, प्रो. वामनराव ठकार व प्रो. सदाशिवराव आपटे हे उत्तम तऱ्हेनें प्रचारकार्य करूं शकले. त्याचप्रमाणें कानपूरला प्रो. शंकरराव बोडस यांनाहि प्रथम तोच अनुभव आला. तान घेतली कीं श्रोते हंसून मोकळे ! मात्र आतां हें सर्व पालटलें आहे. अहमदाबादेला कै. पं. नारायणराव खरे यांनाहि प्रथम असाच अनुभव आला. प्रथम उपेक्षा, नंतर स्वागत.

कानपूर काय नि अहमदाबाद काय, हीं शहरें म्हणजे केवळ व्यापाराचीं केंद्रें. पण तेथें सुद्धां पंडितजींनीं संगीताची आवड इतकी लाविली कीं, उच्च संगीतासाठीं श्रोते आतां नुसते वेडे झाले आहेत ! शेंकड्यांनीं विद्यार्थी-विद्यार्थिनी संगीताचा अभ्यास करीत आहेत. उच्च संगीताबद्दल बरीच चर्चा करीत आहेत. हें पाहण्यास आज पंडितजी हयात नाहींत ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे ! तरी पण त्यांचा आत्मा या प्रचारामुळें शांत झाल्याशिवाय राहणार नाहीं ! !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गुजराथमध्यें तर संगीताचा प्रचार आज इतका झाला आहे कीं, ३०० ते ४०० विद्यार्थी दरवर्षी संगीताचा अभ्यास करून परीक्षेला बसत आहेत !

संयुक्त प्रांतांत तर प्रचाराची कमालच झाली आहे ! तेथें असें एक गांव नाहीं कीं तेथें संगीताचा जलसा होत नाहीं ! !

पंडितजींनीं प्रचार तर केलाच; पण त्याचबरोबर गायक वर्गाला समाजाकडून श्रेष्ठता मिळावी असेंहि कार्य केलें. प्रत्येक ठिकाणीं प्रचार केंद्रें उघडून तेथें आपल्या एकेक शिष्याची योजना केली. त्याचेंच फळ म्हणून सर्व प्रांतांत आज संगीताचा प्रचार झालेला दिसून येतो.

महाराष्ट्रांत सुद्धां संगीताला अभ्यासक्रमाचें वळण लावून विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणें इत्यादि कार्य पंडितजींच्या शिष्यांनींच केलें आहे. महाराष्ट्रांत मोठमोठे विद्वान् गायक पंडितजींच्या काळीं होते. परंतु त्यांचे हातून पंडितजींच्या कार्यासारखें कार्य झालें नाहीं. " आमचे हातून असें कार्य झालें नसतें व पुढें कधीं काळीं होईल असें वाटत नाहीं. " अशी कबुली पंडितजींच्या वेळचे गायक स्वतः पंडितजींजवळ देत असल्याचें लेखकानें प्रत्यक्ष ऐकलें आहे. कांहीं निंदकांनीं जर पंडितजींची टवाळी केली, तर पंडितजी नेहमीं म्हणत, "असे निंदक असणें म्हणजेच आपला खरा प्रचार चालला असून तो लोकांना पटत चालला आहे याचें उत्कृष्ट गमक होय ! "

जलशांतील नावीन्य !

प्रतिपदेच्या चंद्राची कोर ज्याप्रमाणें दिनप्रतिदिनीं वाढतच जाते, त्याप्रमाणें जलसे केल्यानें पंडितजींचा नांवलौकिक उत्तरोत्तर अधिकच होत होता; पण आश्चर्य हें कीं, पंडितजी येवढ्यावरच संतुष्ट राहिले नाहींत. नावीन्याच्या शोधांतच पंडितजींनीं आपलें सर्व आयुष्य वेंचलें. त्या वेळीं जलशांना अतोनात गर्दी होत असे. सर्व लोकांना पंडितजींचा जलसा म्हणजे एक प्रकारचें आकर्षण वाटे. वेळेवर सुरवात होणें, वेळेवर कार्यक्रम बंद करणें या गोष्टी लोकांना अगदीं नवीन वाटल्या आणि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कलाकारसुद्धां नियमित असूं शकतो ही गोष्ट लोकांच्या निदर्शनास आली. पंडितजींनीं शास्त्रीय संगीताच्याच जोडीला सर्वसामान्य लोकांना जें सहजासहजीं रुचेल पचेल असें अस्सल मराठी वळणाचें काव्य स्वरांत गुंफलें. संतांचे अभंग भजनरूपानें रागदारींत बसवून शास्त्रीय संगीतांत एक नवीन दालन उघडलें. आणि मराठी अभंगांतसुद्धां भावनेचा ओलावा किती निर्माण होऊं शकतो हें पंडितजींनीं लोकांना पटवून दिलें. पुण्यामध्यें तर एक जलसा असा झाला कीं ज्यांत फक्त मराठी पदें, संत रामदासांचें श्लोक, अभंग आणि शिवदिनकेसरीचीं पदें यांचाच अंतर्भाव होता. चार तास कोठें निघून गेले हें लोकांना समजलेंच नाहीं. थोडक्यांत म्हणजे संगीताचे मराठीकरणच प्रात्यक्षिकांसह पंडितजींनीं लोकांसमोर सुलभतेनें मांडलें असें म्हणणें जास्त उचित ठरेल.

ज्याप्रमाणें जलशांत होणाऱ्या कार्यक्रमांत अधिक नावीन्याचा हव्यास पंडितजींनीं धरला त्याचप्रमाणें कुलीन स्त्रियांनीं देखील गाण्याच्या कार्यक्रमांत भाग घ्यावयास हवा अशा मताचे पंडितजी होते. ‘न स्त्री स्वातंत्र्यमर्हति’ अशा प्रकारच्या कल्पना एकूण स्त्रीजातीविषयीं होत्या. आज प्रत्येक क्षेत्रांत पुरुषांबरोबर स्त्रिया कार्य करीत आहेत. याची चाहूल पंडितजींना त्याच काळांत लागली कीं काय कोणास ठाऊक ! कुलीन स्त्रियांना आणि मुलींना जलशांत गाण्यास बसवण्याचें पहिलें श्रेय पंडितजींना आहे आणि मुख्य म्हणजे पंडितजींच्या ठिकाणीं जातिभेदाला मुळींच अवसर नव्हता. ज्याच्याजवळ गुण आहेत त्याला पुढें आणावयाचें. आणि म्हणूनच नुसत्या महाराष्ट्रीय स्त्रियाच नव्हे तर गुजराथी, पारशी, प्रभू वगैरे इतर जातींतील स्त्रिया आणि मुली देखील जलशांत गाऊं लागल्या; अहमहमिकेनें पुढें येऊं लागल्या आणि अशा रीतीनें संगीत प्रसाराचें क्षेत्र अधिकाधिक व्यापक होत गेलें. ज्या काळांत स्त्री ही चार भिंतींच्या बाहेर येणं कठिण त्या काळांत ‘स्त्री’ ही जलशांत येऊन गाऊं लागली ही गोष्ट खरोखरच क्रांतिकारक म्हटली पाहिजे आणि म्हणूनच आज एवढ्या गायिका निर्माण झाल्याचें सारें श्रेय पंडितजींनाच द्यावयास हवें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

‘ गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते । ’

पंडितजी निव्वळ गायक नव्हते किंवा केवळ गाणें शिकवण्यासाठीं त्यांचा जन्म झाला नव्हता. ते खरे प्रतिभावंत होते. प्रत्येक गोष्टींत संपूर्णपणें अगदीं स्वतःच्या अशा कांहीं कल्पना त्यांच्याजवळ होत्या. त्यांच्या बुद्धींत स्वतंत्रता होती. पण केवळ कल्पना सुचणें याला तितकेंसें महत्त्व नाहीं तर तितक्याच कौशल्यानें पंडितजींनीं त्या सर्व गोष्टी पार पाडल्या, यांतच त्यांच्या मोठेपणाचें सारसर्वस्व आहे. कोणतीही चांगली कल्पना सुचली कीं ती अमलांत आणणें ह्याला निष्ठेचें, तपश्चर्येचें आणि निश्चयाचें सामर्थ्य लागतें. आणि या सर्व गोष्टी पंडितजींच्या ठिकाणीं पूर्णपणें होत्या.

सध्यां आपण नृत्याचे अनेक कार्यक्रम पहात आहोंत; पण या कल्पनेचें सारें श्रेय पंडितजींनाच आहे. गाण्याला नृत्याची जोड देऊन खरोखरच पंडितजींनीं गाण्याला नव्हे संगीताला पूर्णता आणली. आणि याच वेळीं पंडितजींच्या मनांत दोन कल्पना आल्या. त्या म्हणजे तबलातरंग व तंबोरातरंग. खुद्द पंडितजींनीं या नवीन कल्पनांचा अभ्यास केला, संशोधन केलें आणि त्या मूर्त स्वरूपांत लोकांसमोर मांडल्या. पंडितजींची वृत्तीच मुळीं संशोधकाची होती. नाटकाच्या वेळीं तबलजी तबल्यावर थाप मारून नाटकांत गंमत करत असे. त्यावरून तबलातरंगाची कल्पना पंडितजींना सुचली. प्रत्येक स्वराचा तबला मिळवून रागांत लागणारे स्वर व बसवलेल्या पदांत किती उंच जावें लागतें तितके तबले मिळवून प्रत्येक तबल्यावर एकेक मनुष्य बसवून तबलातरंग प्रथम वाजवला जात असे. ज्याचा जो स्वर असेल तेवढ्यापुरती त्या माणसानें थाप मारून वाजवणें हें एकट्यानें तबलातरंग वाजवण्यापेक्षां फार कठिण.

पण ज्याप्रमाणें राजकारणाच्या क्षेत्रांत नेपोलियनला ‘अशक्य’ हा शब्द माहीत नव्हता, त्याचप्रमाणें संगीतक्षेत्रांत पंडितजींना ‘अशक्य’ हा शब्द माहीत नव्हता.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

' वृंदवादनाची रम्य कल्पना '

संशोधक वृत्तीचा मनुष्य हा जों जों अधिक विचार करूं लागतो तों तों त्याला नवीन कल्पना सुचूं लागतात. ज्या दिशेला तो जाईल त्या दिशेला त्याला नवीन कांहीं तरी सांपडूं लागतें. पण जगांतल्या प्रत्येक गोष्टीकडे डोळसपणानें पाहिलें तरच अधिक सांपडणार. इंग्रजी ऑर्केस्ट्रा (Orchestra) पाहून पंडितजींना वृंदवादनाची कल्पना सुचली. वाद्यांच्या मेळाव्यांतून भावनेला पोषक असा स्वरसमूह तयार करणें ही गोष्ट कठीण खरी. पण पंडितजींनीं तीहि गोष्ट साध्य करून दाखविली. मूळची वृंद-वादनाची कल्पना अतिशय रम्य खरी; पण आजकाल केवळ वाद्यांचा बेसुमार ताफा जमवून, भावनेला योग्य—पोषक—असे स्वर न घेतां केवळ अतिरेकी असूचक अस स्वर घेण्याच्या जडलेल्या वाईट खोडीमुळें बदल-लेलें वृंदवादनाचें स्वरूप पाहून वाईट वाटल्यावांचून रहात नाहीं.

' व्यायामके साथ संगीत '

अशा तऱ्हेनें नवीन संशोधन करीत असतांना पंडितजींचें लक्ष व्यायामाकडे वळलें. बनारस मुक्कामी प्रो. माणिक पंडितजींना भेटण्यास आले. त्या वेळीं व्यायामाबरोबर जर संगीताची जोड दिली तर फार बरें होईल, असें वाटल्यावरून पंडितजींनीं त्याही बाबतींत लक्ष घातलें.

व्यायामाबरोबर संगीताची जोड दिली तर फार बरें होईल असें वाटून प्रो. माणिक यांचें क्लबड्रिल, फ्लॅगड्रिल व बारबेलड्रिल अशीं तीन ड्रिल्स पंडितजींनीं आपल्या विद्यार्थ्यांस शिकवण्यास सांगून त्याला संगीताची जोड दिली. प्रत्यक्ष जलशांत प्रात्यक्षिकांचा तो प्रयोग पाहून लोकांना फार समाधान झालें आणि टाळ्यांच्या कडकडाटांतच त्या व्यायामाचा शेवट झाला. वास्तविक पहातां व्यायाम हें शरिराचें काम; तर संगीत ही हृदयाला जऊन भिडणारी अनुपम कला. पण आत्मा काय नि शरीर काय! शरीर चांगलें धष्टपुष्ट तर मनुष्य सुखी. संगीताच्या विद्यार्थ्यांना व्यायामाचें शिक्षण देणें ही कल्पना प्रथमदर्शनीं किंचित् विचित्र आहे. पण वास्तवतेंत मात्र उलटा अनुभव आला आणि व्यायामाबरोबर संगीताची जोड अतिशय सार्थ ठरली!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

" पंडितजींनीं आपलें गाणें बुडविलें ?"

पंडितजींनीं आपल्या जीवनांत अनेक नव्या नव्या गोष्टी केल्या; अनेक संशोधनें केलीं; अनेक प्रयोग केले. अर्थात् त्यांचे कांहीं प्रयोग संपूर्णतया फलदायी होऊं शकले नाहींत. तरी आज त्यांच्या बहुतेक सार्‍या श्रमांचें चीज झालें आहे. संगीतकलेच्या प्रांतांत आज अनेक नव्या गोष्टी प्रस्थापित केल्या त्या पंडिजींनींच. बावीस श्रुतींची बाजाची पेटी निर्माण करण्यामध्येंसुद्धां पंडितजींनीं फार पूर्वीं म्हणजे १९१७-१८ सालीं फार मोठी खटपट केली. अशा एक ना अनेक गोष्टी फार मोठ्या कल्पकतेनें पंडितजींनीं केल्या. पण एवढ्या थोर पुरुषाचा सत्कारसमारंभ तर बाजूलाच राहो पण साधा कौतुकाचा शब्द देखील कोणीं काढला नाहीं. जीवनांत आपलें ध्येय साध्य करण्यासाठीं आपल्या रक्ताचें तुम्ही कितीही पाणी केलें तरी तुमच्या श्रमांचें चीज होईलच हें सांगतां येणें अशक्य आहे. कारण कोणत्याही क्रांतिकारक पुरुषाच्या वांट्याला तत्कालीन सामाजिक रोष आल्याखेरीज रहात नाहीं. पण खरा थोर पुरुष हा प्रसिद्धीसाठीं मुळींच हपापलेला नसतो. पंडितजी या गोष्टीस अपवाद असणें शक्य नाहीं! कोणी निंदोत, कोणी वंदोत पण पंडितजी आपल्या कलासेवेंत अविरतपणें रंगले होते. जगांत आजपर्यंत जे जे महान तत्त्वज्ञ, राजकारणी व संत झाले त्यांची समाजाकडून त्यांचे हयातींत उपेक्षाच झाली. पंडितजींनीं आयुष्यभर संगीत कलेच्या उद्धारासाठीं एवढी खटपट केली तरी देखील त्यांच्या कार्यांचें अवमूल्यन करणारे टीकाकार निघाले हे केवढें दुर्दैव! एक स्वतंत्र स्वरलेखनपद्धति निर्माण करून व इतर अनेक संगीतोपयोगी गोष्टी निर्माण करून पंडितजींनीं घरोघरीं गाणें पोहोंचविलें. लोकांना गाणें उत्तम समजूं लागलें. नेमक्या याच गोष्टीमुळें तत्कालीन कांहीं गवयांचें पित्त भडकलें; व विष्णुबुवांनीं गाणें लिहून ठेवल्यामुळें तें बुडविलें असें म्हणूं लागले. परंतु वास्तविक पहातां संगीतांतील स्वरलेखन पद्धतीमुळें संगीताची उन्नतीच झाली. पण खेद या गोष्टीचा होतो कीं, कांहीं अशिक्षित गायकांनींच पंडितजींच्या कार्यावर हल्ला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चढविला असें नव्हे तर सुशिक्षित लोक देखील 'पंडितजींनीं विद्येचा ऱ्हास केला' असें म्हणूं लागले! पण हे कसले सुशिक्षित? पंडितजींसारख्या आयुष्यभर कलेसाठीं जीवन वेचणाऱ्या कलाकाराच्या कलेची उपेक्षा करणारे हे अशिक्षित नव्हेत काय? जाहीर सत्कार नको! कौतुक नको! पण साधी सहानुभूति तरी! पण तीदेखील पंडितजींसारख्या थोर महात्म्याला मिळूं नये ही केवढी खेदाची गोष्ट!!!

गांधर्व महाविद्यालयातर्फे संगीत परिषदा

१९१६ च्या मार्च महिन्यांत कै. पं. भातखंडे यांच्या खटपटीनें बडोद्यास 'ऑल इंडिया म्यूझिक कॉन्फरन्स' प्रथम भरविण्यांत आली. नाना प्रांतांतील नाना गायकांना निमंत्रणें करण्यांत आलीं. स्वतः बडोद्याचे महाराज श्रीमंत सरकार सयाजीराव गायकवाड यांनींच परिषदेचें उद्घाटन केल्यामुळें परिषदेस एक प्रकारचा भारदस्तपणा आला होता. पण कोणतीही परिषद म्हणजे एकाच व्यक्तीचा गौरव किंबहुना एकाच व्यक्तीचें स्तोम माजवणें ही गोष्ट खाचितच बरी नव्हे. परिषदा, मग त्या कोठल्याही असोत; साहित्यविषयक असोत, राजकारणासंबंधीं असोत, संगीतासंबंधीं असोत त्यांचा हेतु व्यक्तिजीवनाशीं संलग्नित कधीं राहूंच शकत नाहीं. कलावंत आणि रसिक यांच्यांत एरवीं असणारी परकेपणाची तटस्थतेची भावना दूर व्हावी. त्यांनीं एकाच व्यासपीठावर येऊन त्या त्या शास्त्रासंबंधीं उद्बोधक चर्चा करावी, त्या विषयासंबंधीं कार्याचा नवा ओघ कसा निर्माण करतां येईल, नवी दिशा कशी शोधतां येईल, यासाठींच परिषदांचा अट्टाहास हवा. वैयक्तिक प्रसिद्धीसाठीं परिषदेसारखी कल्पना राबवणें ही गोष्ट खचितच बरी नव्हे. कारण याच परिषदेंत कै. पं. भातखंडे यांच्या कार्याचा बडेजाव माजवण्याचा एक अप्रस्तुत प्रयोग करण्यांत आला. कै.पं. भातखंडे हे 'चतुरपंडित' या उपनांवानें संगीत-विषयक लिखाण करीत असत. पण ह्यांनीं हा 'चतुरपंडित' म्हणजे कोणी जुना जाणता लेखक आहे असें विधान केलें. पण जगांत ज्याप्रमाणें सत्याला मरण नाहीं त्याप्रमाणें असत्याला जीवन नाहीं. म्हातारीनें कोंबडा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झाकला तरी उजाडायचें थोडेंच राहणार! याच परिषदेंत सुप्रसिद्ध विद्वान् व बीनकार कै. मंगेशराव तेलंग हे जोरानें पुढें आले व त्यांनीं कै. पं. भातखंडे यांचें 'चतुरपंडिता' संबंधींचें विधान अगदीं असत्य आहे हें पटवून दिलें.

याच परिषदेंत पंडितजींनीं स्वरलेखनपद्धतीवर दिलेलें व्याख्यान अतिशय उद्बोधक, अभ्यासपरिपूर्ण आणि परिणामकारक होतें. येवढ्यांवरच न थांबतां कोणासही स्वरलेखन करून दाखवण्याचें उघड आव्हान पंडितजींनीं दिलें. त्यांनीं स्वतः लेखन करून दाखवितांच सारा श्रोतृ-समाज आनंदानें पुलकित झाला.

पण पंडितजींना ढोंगीपणाचा फार राग होता आणि म्हणूनच चिडून पंडितजींनीं आणखी एक परिषद भरवण्याचें निश्चित केलें. पण पंडित-जींच्या या आशावादामुळें संगीतांत एक नवीन तेज, नवीन चैतन्य निर्माण झालें. या परिषदेंत घडलेल्या वाईट गोष्टींतूनच पंडितजींनीं पुढील परिषदेचें कार्य केलें. वाईटांतून चांगलें निघतें तें हें असें!

आतांपर्यंत पंडितजी आपल्याला केवळ प्रात्यक्षिक करणारे म्हणून कमी मानून घेणारे असल्यामुळें, वडयावडया धेंडांना आणि पैसेवाल्यांना भाव असणाऱ्या या परिषदेच्या तंत्रांत आपण कशाला पडावें, असा विचार करून मागें राहिले होते; पण पंडितजींच्या मनांत नवा जोम निर्माण झाला आणि म्हणूनच १९१८ सालीं पंडितजींनीं परिषद भरवली. १९१८ च्या मार्च महिन्यांत मुंबईस परिषद भरली. या परिषदेच्या रूपानें विद्वान् संगीताचार्यांचा मेळावाच भरला. अर्थात्च परिषद ही काय चीज आहे हें ज्यांच्या गांवींहि नव्हतें असे कांहीं खांसाहेब व हिंदु गायक मात्र गैरहजर राहिले. भूगंधर्व रहिमतखाँसाहेब यांना कै. अण्णा-साहेब कुरुंदवाडकर यांनीं मुद्दाम पाठविलें होतें. याशिवाय कै. गुरुवर्य गायनाचार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, कै. गा. भास्करबुवा बखले, कै. गा. रामकृष्णबुवा वझे, गा. अनंत मनोहर, कै. गा. गुंडुबुवा इत्यादि विद्वान् लोक आले होते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

याशिवाय कै. श्री. शिवलाल कथ्थक नृत्यकार व कै. इस्माईलखाँसाहेब सतारिये इ. लोक आले होते.

परिषदेचें अध्यक्षस्थान बॅ. मुकुंदराव जयकरांनीं भूषित केलें होतें. प्रास्ताविक भाषण, अध्यक्षांचें भाषण इ. परिषदेचीं सर्व अंगें परिपूर्ण करून परिषद अत्यंत यशस्वीपणें पार पडली. पण केवळ हीच परिषद करून पंडितजी थांबले काय ?—नाहीं. 'थांबला तो संपला' हें पंडितजींना माहीत होतें. नुसता अग्नि प्रज्वलित केला म्हणजे यज्ञाची सांगता होत नाहीं. त्यांत नित्यनेमानें आहुति द्यायला हवी. नदीचा प्रवाह वाहता राहिला तरच नवेनवे प्रदेश समृद्ध करणार. कोणत्याहि कार्याच्या बाबतींत निष्ठेचें सातत्य हवेंच. निरनिराळीं वाद्यें ही एक अभिमानाची गोष्ट आहे हें जाणून पंडितजींनीं हिंदी वाद्यांचें प्रदर्शनहि भरविलें. अशा तऱ्हेनें परिषदांचा हा क्रम पुढें सतत पांच वर्षे चालू होता. या परिषदांपैकीं एका परिषदेचें उद्‌घाटन तर कै. गा. बाळकृष्णबुवांनीं केलें आणि प्रदर्शनाचें उद्‌घाटन कै. गा. बखलेबुवांनीं केलें. अशा तऱ्हेनें संगीत परिषदांचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचा मान देखील ज्यानें गानदेवतेची निष्ठेनें तपश्चर्या केली अशा संगीताचार्याचाच आहे हें पंडितजींनीं लोकांना पटवून दिलें.

या परिषदेचा मुख्य फायदा म्हणजे निरनिराळे विद्वान् गायक आणि वादक एकत्र येऊं लागले हा तर झालाच. पण गायनविद्येसाठीं अविरत कष्ट करणारा विद्यार्थी जर गायनकलेंत निपुण झाला तर तोदेखील कांहीं बी. ए., एम्. ए. अशा ग्रॅजुएटसूपेक्षां हलका नाहीं हें पंडितजींनीं लोकांना पटवून दिलें.

संगीताच्या विद्यार्थ्याबद्दल असलेली लोकांच्या मनांतील उपेक्षेची भावना पंडितजींनीं अजिबात काढून टाकली. संगीत परिषदेच्या रूपानें निरनिराळ्या गायक-वादकांचें संमेलन भरलें व त्यांच्यांतील मतभेद नष्ट होण्यास त्यामुळें चांगलाच वाव मिळाला. पण सुशिक्षित लोक जर गाण्याचा अभ्यास न करतां केवळ पुस्तकी शिक्षणाच्या जोरावर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गाण्याच्या प्रांतांत लुडबुड करूं लागले तर तें बरें नव्हे. याचा अर्थ असा नव्हे कीं सुशिक्षित लोकांनीं गाण्याच्या प्रांतांत प्रवेशच करूं नये. पण सुशिक्षित लोक आणि गायक अशा दोघांचेंही सहकार्य गाण्यासारख्या विषयास हवें. सहकार्यावांचून फळ नाहीं व फळावांचून तपश्चर्येला किंमत नाहीं !

पदव्या धारण करणाऱ्या सुशिक्षितांमध्यें स्वतःबद्दलची 'कर्तुमकर्तुम्' अशी एक विचित्र उच्च गंडाची (Superiority Complex) भावना निर्माण झालेली असते. गायकांना ते तुच्छ मानतात. पण एवढेंच काय तर पलटणींतल्या अधिकाऱ्याप्रमाणें आम्ही सांगूं तसें गायकांनीं वागलें पाहिजे असा त्यांचा सतत अट्टाहास असतो. पण सुशिक्षित म्हणवणाऱ्या मंडळींनीं जरा अंतःकरणाच्या आंतल्या कप्प्यांतून येणारा साद ऐकला तर त्यांना कळून चुकेल कीं गानदेवतेची उपासना ही गोष्ट महान् कष्टाची आहे. देवघरांत तेवणारा दिवादेखील सतत तेवत ठेवणें जमत नाहीं, मग संगीतासारख्या श्रेष्ठ विद्यांचें जतन करणें किती कठीण. सुशिक्षितांच्या मतानुसार गायकांना कदाचित् व्यवहार समजत नसेल, पण त्यांना बाहेरचा व्यवहार कळला नाहीं तरी गाण्यांतला व्यवहार मात्र पुरेपुर समजतो. आणि म्हणूनच पंडितजी आपला प्रत्येक शिष्य जसा गाण्यांत तरबेज हवा तसा व्यवहारचतुर असावा अशा आग्रहानें तयार करीत.

पंडितजींनीं जाणलेलें राष्ट्रभाषेचें महत्त्व

त्या काळीं संगीत परिषदांमध्यें जी चर्चा होत असे ती इंग्रजी भाषेंतूनच होई. अर्थातच ज्यांच्यासाठीं परिषदेचा हा व्याप मांडलेला होता त्या विद्वान् गायकांना त्यांतील कांहींच कळत नसे. चक्रव्यूहांत सांपडलेल्या अभिमन्यूप्रमाणें ते भांबावून विचारीत कीं हें काय चाललें आहे ? संगीताच्या परिषदेंतील महत्त्वाच्या गोष्टी संगीत कलेची जन्मभर उपासना करणाऱ्या गायकाला जर समजल्या नाहींत तर त्यांचा उपयोग काय ?

आणि म्हणूनच ही सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन पंडितजींनीं परिषदेचे सर्व व्यवहार हिंदी भाषेंत सुरू केले. कारण त्यांना संगीत कला ही मूठभर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लोकांची मिरासदारी बनवायची नव्हती तर तिचें लोण जनताजनार्दनापर्यंत पोहोंचवायचें होतें. पंडितजींच्या या सुधारणेमुळेंच अगदीं सर्वसामान्य गायकाला देखील परिषदेंत काय चर्चा चालते हें कळूं लागलें. आणि सहाजिकच त्याविषयीं आत्मीयता वाटूं लागली. पंडितजींनीं अत्यंत धडाडीनें अनेक ठिकाणीं संगीत परिषदा सुरू केल्या आणि लोकांत एक प्रकारची विलक्षण जागृति निर्माण केली. आज उदाहरणादाखल संयुक्तप्रांत घेतां येईल, कीं, ज्यामध्यें असें एकही शहर नाहीं कीं, जेथें संगीताची परिषद भरत नाहीं. पण आजकाल असें झालें आहे कीं, एकाद्या परिषदेंत थोडासा देखील मतभेद झाला तरी फुटून निघालेली मंडळी लगेच दुसरी परिषद भरविण्याचे खटपटीस लागतात. त्यामुळें परिषद म्हणजे निष्ठावंत गायकांचें एकत्रीकरण ही स्थिति आज मुळींच राहिलेली नाहीं. त्याउलट आजकाल भरविल्या जाणाऱ्या परिषदा म्हणजे धनिकांचा एक उत्तम धंदाच झाला आहे. अर्थात् माणसाला भविष्यकाळाच्या भीषण छाया अगोदर दिसत नाहींत त्या अशा ! नाहींतर परिषदांच्या व्यापात पंडितजी पडलेच नसते.

आपला स्वार्थ साधण्यासाठीं परिषदा भरविणारे लोक आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठीं पंडितजींसारख्या महान् गायकाला 'ते केवळ भजनी गायक आहेत,' असें म्हणत, ही गोष्ट तर फारच खेदाची आहे.

बनारसमधील परिषद

१९२५ सालीं कै. पंडित भातखंडे यांनीं बनारसला एक परिषद भरविली. आणि आश्चर्य हें कीं पंडितजींना परिषदेचें साधें आमंत्रणही गेलें नाहीं. बाकी संगीताची परिषद आणि तेथें पंडितजींना न बोलावणें हें कधीं तरी शक्य होतें का ? स्वागत समितींत पुष्कळ वादविवाद झाले तरी कै. पं. भातखंडे पंडितजींना बोलविण्यास तयार होईनात. अखेर स्वागतसमितीच्या सर्व सभासदांनीं, पंडितजींना न बोलाविल्यास आम्ही सर्वजण राजीनामे देऊं, असें सांगतांच नाइलाजानें पंडितजींना बोलावणें आलें. पंडितजी परिषदेंत गेले आणि त्यांनीं प्रभाव पाडला हें सांगणें नकोच !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अर्थात् पं. भातखंडे यांनीं पंडितजींना बोलाविण्याचे बाबतींत टाळाटाळ कां केली हेंच समजत नाहीं. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, पंडित भातखंड्यांनीं संगीत क्षेत्रांत कांहींच केलें नाहीं. संगीताच्या क्षेत्रांत कै. पं. भातखंडे यांनीं अनेक उपयुक्त संशोधनें केलीं आणि गाण्याची केवळ आवड असतांना त्यासाठीं तनमनधन अर्पण केलें. या गोष्टी निर्विवाद सत्य आहेत. पं. भातखंडे यांचेवर कोणत्याही प्रकारें टीका करण्याची इच्छा नसतांना देखील संगीतकलेच्या आणि पंडितजींच्या कार्याच्या अनुषंगानें सुचलेले विचार व प्रत्यक्ष आलेले अनुभव यांवरून माझ्या सदसद्विवेक बुद्धीस जें पटेल तेंच मी लिहीत आहें व लिहिणार आहें. कै. पं. भातखंडे व कै. पंडित विष्णु दिगंबर या दोघांनीं एकत्र येऊन कार्य केलें असतें तर संगीत कलेचा वेल आजच्यापेक्षां किती तरी अधिक फोफावला असता. पंडितजी केवळ बोलत नसत तर तें कृतींत आणून दाखवीत. केवळ शास्त्राच्या मागें न लागतां प्रत्यक्ष दिव्य संगीत ऐकवून लोकांना पंडितजींनीं संतुष्ट केलें. पंडितजींचें चालू असलेलें विशाल कार्य सहन न होऊन कांहीं संकुचित वृत्तीच्या लोकांनीं पंडितजींच्या कार्यावर टीकास्त्र उठविलें. बाकी टीका होणें हें त्या व्यक्तीच्या गुणीपणाचें लक्षण नव्हे कां ? कलाकृतींत काय किंवा व्यक्तींत काय, जेव्हां कांहीं तरी गुण असतील तेव्हांच त्याचें रसग्रहण व्हायचें व त्यावर टीका व्हायची.

संगीताचें मराठीकरण

कोणतेंहि चांगलें चाललेलें कार्य कसें हाणून पाडतां येईल यासाठींच दुष्ट लोक टपून बसलेले असतात. १९२८ सालीं पुण्याला दे. भ. कै. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेली महाराष्ट्र संगीत परिषद या गोष्टीला अपवाद ठरती तरच नवल. त्या वेळेस गंधर्व नाटक मंडळी पुण्यांत होती. नटसम्राट श्री. बालगंधर्व व पंडितजी यांचे संबंध फार जुने आणि चांगले होते. किर्लोस्कर थिएटर या कामीं द्याल कां असें विचारलें असतां श्री. बालगंधर्वांनीं मोठ्या आनंदानें कबूल केलें. पण सगळ्याच गोष्टी ठरल्याप्रमाणें कुठें घडतात ! कारण श्री. बालगंधर्व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

यांनीं एवढें कबूल करून देखील ४-५ दिवसच अगोदर थिएटर देतां येत नाहीं असा कंपनीच्या मॅनेजरांचा निरोप आला. कोठून कळ फिरली कोणास ठाऊक ! कां वालगंधर्वांनाच काय वाटलें कोणास ठाऊक ! आपल्या मनांत योजलेली एक कल्पना अशी धुळीस मिळालेली पाहून पंडितजी थोडेसे खिन्न झाले. पण अशा अडचणींनीं डगमगणारे पंडितजी नव्हते. " थिएटर मिळालें नाहीं म्हणून हात गाळून आमची परिषद आम्ही बंद करूं काय ? थिएरसुद्धां काय फुकट घेणार नव्हतों. त्याचें भाडें देणार होतों. " असे उद्गार काढून पंडितजी दुसरें थिएटर मिळविण्याच्या मार्गास लागले आणि पंडितजींनीं विजयानंद थिएटरांत परिषद भरवली. आणि याच परिषदेंत साहित्यसम्राट कै. तात्यासाहेब केळकरांनीं संगीताच्या मराठीकरणाचा ठराव मांडला; आणि पूर्वपरंपरागत चालत आलेल्या कल्पनांना चांगलाच धक्का दिला. अर्थात् थोडा विरोध या गोष्टीस घडलाच. पण अखेर 'मराठीकरणा'चा ठराव बहुमतानें पास करण्यांत आला. या एकाच ठरावामुळें गेलीं १३ वर्षें महाराष्ट्रांत मराठीकरणाच्या विषयावर बरेच वादविवाद झाले. पण एका तऱ्हेनें या वादाचा निकाल १९३७ सालीं भरलेल्या नागपुरांतील साहित्यसंमेलनांत लागला. मराठीकरण करावें असा ठराव पास होऊन त्यावर महाराष्ट्रांतील सर्व साहित्यिकांचे शिक्कामोर्तब होऊन आपोआपच हा विषय व त्याची चर्चा आतां संपलेली आहे. अर्थात् 'वाद' ही गोष्टच अशी आहे कीं तिला अंत नाहीं. पण या ठरावामुळें संगीताचे बाबतींत महाराष्ट्र चांगलाच जागा झाला ही गोष्ट मात्र निर्विवाद सत्य आहे.

गांधर्व महाविद्यालयाची मुंबईस इमारत

पंडितजींनीं मुंबईस विद्यालय सुरू केलें. पण तें तेवढेंच राहिलें नव्हतें. विद्यार्थ्यांची संख्या अतिशय मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळें विद्यालयास जागा अपुरी वाटूं लागली. त्यामुळें विद्यालयाच्या शाखा निरनिराळ्या ठिकाणीं निघूं लागल्या. अशा रीतीनें भाड्याच्या इमारती ५-६ घेऊन सुद्धां ५०० ते ६०० रु. भाडें भरून देखील या विद्यालयाला जागेची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अडचण पडूं लागली. तेव्हां मुंबईस निरनिराळ्या सभांतून विद्यालयाची स्वतःची इमारत व्हावी व त्यासाठीं धनिकांनीं व दानशूरांनीं इकडे लक्ष द्यावें अशी विनंति पंडितजी करीत असत.

सद्‌हेतूनें प्रेरित झालेल्या व्यक्ति आणि संस्था यांना कधींच कांहीं कमी पडत नाहीं आणि म्हणूनच एका दानशूरानें कळकळीनें पुढें येऊन मदत करण्याची आपली इच्छा व्यक्त केली. आणि त्यांनीं पंडितजींबरोबर वाटाघाटी सुरू केल्या. होतां होतां सर्व गोष्टी जमून आल्या. सँढर्स्ट रोडवर मुंबईच्या इंप्रूव्हमेंट ट्रस्टकडून एक प्लॉट घेतला गेला. कांहीं वर्षांचे करारावर पैसे वगैरे भरण्याच्या आर्थिक गोष्टी निश्चित झाल्या. १९१३ सालीं सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या हस्तें इमारतीची कोनशिला बसविली. तेव्हां फार दिवस हृदयाशीं बाळगलेली आकांक्षा पुरी झाल्यामुळें पंडितजींना जें समाधान लाभलें तें शब्दांनीं व्यक्त करणें अशक्य आहे.

इमारतीसाठीं जरूर ती आर्थिक मदत करणारा हा उमद्या दिलाचा गृहस्थ प्रसिद्धीसाठीं मुळींच हपापलेला नव्हता. आणि म्हणूनच इमारतीचें प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर त्या उदार गृहस्थांचें नांव समजलें. ते म्हणजे श्रीमंत सरदार बाबासाहेब बिवलकर हे होत. श्रीमंत बिवलकर हे कै. श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन मिरजकर यांचे जामात होत. पंडितजींचा व त्यांचा फार जुना स्नेह असल्यामुळें त्यांनीं इमारतीला लागणारा सर्व पैसा मी देतों व वर्षाअखेरी कांहीं ठराविक हप्त्यानें फेडा असें सांगितलें. श्रीमंत बिवलकर हे अतिशय सरळ मनाचे व सालस स्वभावाचे होते. त्यांनीं अमुक एक गोष्ट करतों असें म्हटलें कीं अगदीं काळ्या दगडावरची पांढरी ब्रह्मरेघ ! त्यामुळेंच केवळ सव्वा वर्षांच्या अवधींत गांधर्व महाविद्यालयाची स्वतःची टोलेजंग इमारत मुंबईत मोठ्या दिमाखानें झळकूं लागली. ती इमारत निव्वळ दगडधोंड्यांनीं बनलेली नव्हती. पंडितजींच्या परिश्रमामुळें आणि बाबासाहेबांच्या पुण्याईनें उभारलेली व पंडितजींच्या आशा-आकांक्षांचें ज्वलंत प्रतीक असलेली इमारत होती ती.

१९१५ सालीं त्या इमारतीचा उद्‌घाटन-समारंभ त्या वेळचे मुंबईचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांचे हस्तें झाला. चांदीच्या किल्लीनें कुलूप उघडून उद्‌घाटन झालें म्हणून जाहीर करतांच चौघडा नौबती वाजूं लागल्या. सर्व वातावरण आनंदभरित झालें होतें. संगीत कलेच्या प्रांतांतील हा मंगल प्रसंग खरोखर अविस्मरणीय ठरला. या प्रसंगीं गव्हर्नर-साहेबांना अतिशय समर्पक अशी भेट (चांदीचा तंबोरा) देण्यांत आली. मुंबईसारख्या शहरांत संगीतकलेच्या प्रचारासाठीं कार्य करणारी संस्था सुरू झाल्यानें मुंबईच्या सर्व वर्तमानपत्रांतून विद्यालयाबद्दल व पंडितजीं-बद्दल धन्योद्गार प्रगट केले गेले. पंडितजींच्या कार्यांची सुरवातीस जरी उपेक्षा केली गेली तरी अखेरीस त्याचें चीज झालें. अशा रीतीनें जुन्या इमारतींतून नव्या इमारतींत विद्यालय गेल्यानें फार फायदा झाला. कोहिनूर हिरा कोठेंहि ठेवला तरी आपलें तेज प्रगट केल्यावांचून कसा राहील ? त्याहीपेक्षां त्याला सुंदर कोंदण मिळालें तर त्याची सुंदरता शतपटीनें वाढणार ! विद्यालयाचे बाबतींत तसेंच झालें. विद्यालयाची इमारत चार मजली असून तळमजल्यावर वाद्यांचे प्रदर्शनाचा एक हॉल होता. बाजूच्या खोल्यांतून वादनाचे वर्ग बसत. दुसऱ्या मजल्या-वर प्रार्थना हॉल होता; व पांच खोल्यांतून वर्ग बसत. तिसऱ्या मजल्या-वरील व्यवस्था याच प्रकारची होती. शिवाय तेथें पंडितजींचें-प्रिन्सि-पॉलांचें कार्यालय होतें. चौथ्या मजल्यावर ७००।८०० लोक खुर्च्यांवर बसूं शकतील असा एक मोठा हॉल होता. हॉलचें एकंदर वातावरण गाण्याचे जलशास अत्यंत अनुकूल असल्यानें धोबी तलावावरील फ्रामजी कावसजी हॉलमध्यें होणारे जलसे व सर्व समारंभ विद्यालयाचे जागेंतच होऊं लागले. पवित्र कार्यासाठीं स्थापन झालेल्या संस्थांचें पावित्र्य थोरांच्या दर्शनानें अधिकच वाढतें. गांधर्व महाविद्यालयास अनेक थोर लोकांनीं भेटी दिल्या. कै. लोकमान्य टिळक, कै. महात्मा गांधी, कै. देशबंधु चित्तरंजन दास, कै. नेताजी सुभाषचंद्र, कै. लाला लजपतराय, कै. पंडित मदनमोहन मालवीय इत्यादि थोर राजकीय पुढारी संस्थेंत येऊन गेले. त्याचप्रमाणें कै. श्रीमंत मिरजकर, कै. श्रीमंत कुरुंदवाडकर, कै. श्रीमंत इचलकरंजीकर, श्री. बावडेकर, लिमडीचे ठाकूर, श्रीमंत विंचूरकर इत्यादि थोर संस्थानिक विद्यालय पाहून गेले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अशा रीतीनें विद्यालयाची भरभराट झाल्याबद्दल पंडितजींना एक प्रकारचें समाधान वाटत होतें. पण झालेल्या कर्जामुळें त्यांना सारखी काळजी लागून राहिली होती. ज्या तऱ्हेनें देणग्या मिळावयास पाहिजे होत्या त्या कमी झाल्या. त्यांतच पहिल्या महायुद्धाची धामधूम सुरू झाल्यानें लोकांचें लक्ष संगीत कलेकडे राहिलें नाहीं. पंडितजी कोणासहि भेटण्यास जात तेव्हां युद्धाची सबब पुढें करून धनाढ्य लोक पैशाची मदत करीत नसत. पंडितजींच्या चित्तांत आपल्या विद्यालयाच्या भवितव्याच्या विचारानें फार मोठी कालवाकालव होई. इतकी यातायात करण्यापेक्षां विद्यालय बांधलेंच नसतें तर एक वेळ बरें असा उद्विग्नतेचा विचार त्यांच्या मनांत आल्यावांचून रहात नसे. जमेची बाब एक आणि खर्चांचीं तोंडें हजार अशी स्थिति झाली. इंप्रुव्हमेंट ट्रस्टचा हप्ता, शिक्षकांचे पगार, विद्यालयांतील वाद्यांची व इतर दुरुस्ती यांचा खर्च, उपदेशक वर्गाचा कपडालत्त्याचा व भोजनाचा खर्च असे एक ना दोन! पण पंडितजींनीं धीर सोडला नव्हता. एकजुटीची शिष्यमंडळी तर हात जोडून वाटेल ते परिश्रम करण्यास कंबर कसून तयार होती. पण पैसा कसा निर्माण करावा याचा मार्ग कांहीं केल्या सांपडेना. माणसाला सगळीं सोंगें आणतां येतात पण पैशाचें सोंग आणणें कठीण म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. विद्यालयाच्या आणि पंडितजींच्या आशाआकांक्षांच्या जीवनमरणाचा प्रश्न होता. तेव्हां बाहेरगांवीं जाऊन जलसे करून कांहीं फंड मिळतो कां पहावा म्हणून पंडितजी बाहेर पडले. पण आर्थिक अडचणींमुळें तेंही शक्य झालें नाहीं. अत्यंत उदास मनःस्थितींत निदान विद्यालयाचें कार्य तरी जोमांत चाललें आहे तें चालूं दे म्हणून पंडितजी पुन्हां मुंबईस आले व मुंबईत राहूनच कांहीं फंड जमा करतां आला तर पहावें म्हणून खटपटीस लागले. पण फंड फार थोड्या प्रमाणांत मिळाला. त्यांत भांगेना म्हणून पंडितजी बाहेरचें बोलावणें आलें होतें म्हणून पार्टी घेऊन बाहेरगांवीं गेले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परिस्थितीचें पारडें फिरलें

पंडितजी बाहेरगांवीं गेले खरे, पण इकडे कर्जाऊ रक्कम घेतलेल्याचें व्याज दिलें गेलें नव्हतें व मुद्दलसुद्धां कांहीं फिटूं शकलें नव्हतें !

अशा परिस्थितींत श्री. बाबासाहेबांना भेटून आपल्या परिस्थितीचा सर्व खुलासा पंडितजींनीं करावयास पाहिजे होता, तो पंडितजींनीं केला नाहीं, असें त्या वेळच्या आम्हां शिष्य लोकांना वाटलें. परंतु पंडितजींना विचारतांच ते म्हणाले, "व्याजहि वर्षांत देऊं शकलों नाहीं, व कर्जफेडहि कांहीं करूं शकलों नाहीं ! अशा परिस्थितींत मी श्री. बाबासाहेबांना कसा भेटूं ? अशी वाईट वेळ कधीं आली नव्हती !! "

शेवटीं श्री. बाबासाहेब यांच्या वकिलांचेकडून पैशाच्या मागणीबद्दल नोटीस आली ! ती वाचून दाखवितांच पंडितजींचा धीरच खचून गेला ! ! एकदम परिस्थितीचें पारडें फिरल्यासारखें झालें. तरी पण पंडितजींनीं धडपड करण्याचें सोडलें नाहीं. कांहीं मंडळींच्या भेटी घेतांना कांहीं व्यापारी तत्त्वावर विचार झाला. 'घर उभें आहे; तेव्हां घरावर पैसे कोणीहि देईल' असेंहि पंडितजींना सांगण्यांत आलें.

अशा स्थितींत पंडितजी श्री. बाबासाहेबांना भेटण्यास गेले. तेथें बरीच खडाजंगी होऊन मार्च अखेर पैसे भरल्यास, व्याजासह होणाऱ्या १६००० रुपयांपैकीं व्याजाचे ६००० रुपये सूट देण्याचें श्री. बाबासाहेब यांनीं मान्य केलें. लागलीच पंडितजी कर्ज उभारण्याच्या व्यवस्थेला लागले. दोन महिने खटपट केली, परंतु कांहीं जमलें नाहीं. इकडे कर्ज देऊं इच्छिणाऱ्यांचे वकील, सॉलिसिटर वगैरे विद्यालयाची इमारत पाहून जात होते. होतां होतां विद्यालयाचे इमारतीवर कर्ज देणारे ६०,००० रु. देत आहेत, बाकीच्या ३०,००० रुपयांची व्यवस्था काय करावी असा विकट पेंच पंडितजींना पडला ! !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गजेंद्र-मोक्ष !!

उरलेल्या ३० हजारांची व्यवस्था करण्याकरितां पंडितजींच्या पुन्हां भेटी सुरू झाल्या. भेटींमध्यें पंडितजींचे परमप्रिय मित्र व रामभक्त कै. रा. रा. सुकथनकर इंजिनिअर यांची गांठ पडली. त्यांना सर्व हकीगत पंडितजींनीं निवेदन केली. ती ऐकून रा. रा. सुकथनकर-साहेबांना फार वाईट वाटलें! ते पंडितजींना म्हणाले, "तुमच्यासारख्या रामभक्तावर असें संकट परमेश्वर कां आणतो तें कळत नाहीं."

दुसरे दिवशीं सकाळीं ८–८॥ च्या सुमारास श्री. सुकथनकरसाहेब अचानक पंडितजींना भेटण्यास आले व बोलतां बोलतां त्यांनीं सर्वांना चकित करून सोडणारी पुढील गोष्ट सांगितली. "आज पहांटे माझ्या मनांत कसली तरी प्रेरणा होऊन कुणीतरी मला सांगूं लागलाः—पंडितजी संकटांत आहेत; तुम्हांला काय मदत करतां येईल ती करा, व ती तुम्ही केल्याशिवाय तुम्हांला बरें वाटणार नाहीं." असें म्हणून त्यांनीं पंडितजींच्या समोर सरकारी प्रॉमिसरी नोटांचें पुडकें ठेवलें नि उद्गारले, "पंडितजी, माझ्या प्रेरणेप्रमाणें मीं या दहा हजारांच्या प्रॉमिसरी नोटा आणल्या आहेत, त्या विकून त्याचे रुपये तुमच्या कर्जफेडीसाठीं घ्या!"

हें ऐकतांच पंडितजींना जो आनंद झाला तो वर्णन करतां येत नाहीं!! परमेश्वरावर आधींपासूनच पंडितजींचा दृढ विश्वास होता, तो श्री. सुकथनकरसाहेबांच्या या प्रेरणेमुळें दृढतर झाला!!! "परमेश्वर या संकटांतून मला खात्रीनें निभावून नेणार" असा पंडितजींना आत्म-विश्वास वाटूं लागला.

श्री. सुकथनकरसाहेबांच्या मदतीमुळें आतां फक्त वीस हजारांचीच काळजी पंडितजींना राहिली. त्याहि काळजींतून परमेश्वरानें पंडितजींना थोड्याच दिवसांत मुक्त केलें, नि ठरल्याप्रमाणें मार्चअखेर श्री. बाबा-साहेब यांचे सॉलिसिटरचे ऑफिसांत नव्वद हजार रुपये भरून श्री. बाबासाहेब यांच्या कर्जांतून पंडितजी मुक्त झाले!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पंडितजी प्रवचनकार झाले !!

१९१६ च्या चातुर्मासांत चार महिने श्रीतुलसीदासकृत रामायणावर पंडितजींनीं, विद्यालयाचे फंडाकरितां, विद्यालयाचे हॉलमध्येंच प्रवचनें करण्याचा कार्यक्रम सुरू ठेवला. चार महिन्यांत विद्यालयाचे फंडास सुमारें साठ हजार रुपये मिळवून दिले !

त्याच वेळीं विद्यालयास जोडून विद्यार्थ्यांचें वसतिगृह बांधण्याचें घाटूं लागलें. पंडितजींची शिष्यमंडळी म्हणत होती कीं, आतां फक्त तीस हजार रुपयेच पाहिजे आहेत, तेवढे फंड म्हणून जमा करून, कर्जमुक्त झाल्यावरच मग मागील इमारत बांधतां येईल. परंतु या विचारा-पेक्षां, मागें इमारत तावडतोब बांधावी या विचाराचा प्रभाव जास्त पडून, मागें वसतिगृहाची इमारत बांधण्याचें ठरलें !

श्रीरामायणामुळें संत लोकांचा व पंडितजींचा परिचय होऊं लागल्यानें मागील इमारतीचा कोनशिला-समारंभ श्रीनारायणमहाराज केडगांवकर यांचे हस्तें झाला व त्याच इमारतीचा उद्‌घाटनसमारंभ श्रीमंत नारायण-राव ऊर्फ बाबासाहेब इचलकरंजीकर यांचे हस्तें झाला !!

अशा तऱ्हेनें विद्यालयाचें कार्य चांगलें चालू झालें. १९१७ च्या चातुर्मासांत पुन्हां रामायण-प्रवचन करण्याचें ठरलें. चातुर्मास संपला. परंतु मागील वर्षांपेक्षां या वेळीं फंड अजिबात कमी मिळून रामायणास गर्दीसुद्धां अगदीं बेताचीच होत होती.

पुढें विचार करून, बाहेरगांवीं हिंडून पूर्वीप्रमाणें जलसे करण्याचें ठरलें. १९१८ सालीं लढाई बंद झाली, व पुढें कांहीं काळ चांगला येईल असें वाटत होतें. परंतु खरें बोलायचें तर पंडितजींची आर्थिक परिस्थिति कांहीं सुधारली नाहीं !

विनाशकाले विपरीतबुद्धिः

मध्यंतरीं इमारतीच्या किंमती पुष्कळच वाढल्या. त्या वेळीं विद्या-लयाच्या इमारतीस जवळजवळ पांच ते सहा लाख रुपये किंमत येत होती. आणि १९२१ सालीं याच इमारतीवर कर्ज देणाऱ्याकडून ऐंशी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हजार रुपये कर्ज काढलें होतें, तें आतां व्याजासुद्धां लाखाच्या घरांत आलें होतें.

'इमारतीस किंमत उत्तमच येत आहे, तेव्हां आपलें दोन लाखांचें कर्ज फिटून दोनतीन लाख रुपये राहतील. त्यांत पुन्हां दुसरीकडे इमारत बांधतां येईल' असा सल्ला पंडितजींना आम्हीं शिष्यमंडळींनीं दिला. परंतु पंडितजी स्वाभिमानाला बळी पडून म्हणाले, "इतके मोठे लोक विद्यालयांत आले, इतक्या मोठ्या लोकांचे हातून उद्‌घाटन, कोनशिला-समारंभ केले, तेव्हां ही इमारत विकणें मला रास्त दिसत नाहीं !"

पुढील वर्षांतच घरांच्या किंमती उतरल्या व पूर्वींसारखी किंमत येईना. विद्यालयाच्या इमारतीवरील कर्जहि कमी होईना !!

अखेर १९२४ सालीं विद्यालयाच्या इमारतीचा कर्जवाल्यांनीं लिलांव पुकारून दोन लाख सोळा हजाराला इमारत फुंकून टाकली !!!

ही हकीगत आम्हां शिष्यमंडळींना जेव्हां कळली, तेव्हां प्रत्येक विद्यार्थ्याला हळहळ वाटली ! जेवण जाईना !! आम्ही पंडितजींच्या शिष्यांनीं या इमारतीकरितां फार खस्ता खाल्ल्या होत्या. रक्ताचें पाणी केलें होतें !!! त्यामुळें इमारत गेली हें वाक्य लिहितांना कसेंसेंच वाटत आहे !

पंडितजींचा हृद्‌रोग !

इमारतीच्या लिलांवाचे वेळीं पंडितजी मुंबईंत नव्हते. ते दक्षिण हैद्राबादेस होते. लिलांवाची बातमी ऐकून ते बेचैन झाले ! तो दिवस त्यांना अत्यंत कष्टाचा गेला !!

अशी वाईट वेळ आली तरी पंडितजी डगमगले नाहींत; पण हृद्‌रोग मात्र कायमचा लागला ! रामनामाचा जप करून क्षुब्ध मनाला शांति आणण्याची त्यांनीं खटपट केली, तरी शांति कांहीं केल्या येईना !!

थोडे दिवस गेल्यावर दुःखाचा वेग नि मानहानीचा उमाळा थोडा थंडावला. मग मात्र पंडितजी रामायणाच्या मार्गेंच लागले. नाशिकला "श्रीराम नाम आधार आश्रम" स्थापन केलाच होता, तेथेंच ते वास्तव्य करूं लागले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुंबईस त्यानंतर पंडितजी पुष्कळ वेळां गेले व त्याच इमारतींत जागा भाड्यानें घेऊन पुन्हां विद्यालय सुरू करावें, अशा विचारांत ते होते; परंतु तें कांहीं जमलें नाहीं !

१९२६ सालीं विद्यालयाची रौप्य ज्युबिली साजरी करणेचें ठरलें. त्याप्रमाणें कराची मुक्कामीं विद्यालयाची रौप्य ज्युबिली मोठ्या समारंभानें साजरी झाली ! अशा लौकिकाच्या गोष्टी पंडितजी 'कर्तव्य' म्हणून करीत होते; पण 'विद्यालयाची इमारत गेली' हा हृद्रोग पंडितजींना चांगलाच जाणवत होता ! !

आम्ही शिष्यमंडळीसुद्धां सँड्हर्स्ट रोडवरून जाण्याचा प्रसंग कटाक्षानें टाळतोंच; पण नाइलाजानें जावें लागलेंच तर 'हीच ती विद्यालयाची इमारत' असें हळहळून पहात पहात जातों ! ही इमारत आतां आपली नाहीं, या विचारानेंसुद्धां मनास मनस्वी दुःख होतें ! !

पंडितजींचें रामायण-प्रवचन

१९०२ सालच्या मे महिन्यांत 'भाई नंदगोपालजी के ठाकुर-द्वारा'मध्यें (पंजाबमध्यें मंदिराला ठाकुरद्वारा म्हणतात) प्रेमसागर नांवाची सभा होती. त्या सभेंत पंडितजींचें गायन झालें व त्यांचें बक्षीस म्हणून पंडितजींना तुलसीकृत रामायणाचें पुस्तक अर्पण करण्यांत आलें! त्याच वेळीं सभेच्या अध्यक्षांनीं पंडितजींना विनंति केली कीं, "आपलें गायन तर स्वर्गीय आहेच; तथापि त्या गायनाला जर श्रीरामायणाच्या चौपायांची जोड दिली, तर तें गाणें अधिकच खुलून दिसेल."

पंडितजींनीं, वरील विनंति लक्षांत घेऊन, नित्य रामायणचें वाचन सुरू केलें, व त्यांतील चौपाया व दोहे रागदारींत बसवून ते गाऊं लागले.

१९१०-११ सालीं मुंबईत माधव बागेंत पंडितजींचें जाहीर रामायण-प्रवचन सुरू झालें व त्या रामायणाला अतोनात गर्दी होऊं लागली ! आधीं पंडितजींचें गाणें चांगलें; त्यांतच रामायणाला गाण्याची जोड दिल्यानें रामायण प्रवचन फारच आकर्षक होऊं लागलें ! !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पंडितजी कीर्तनकार झाले !

पंडितजींच्या घराण्यांत कीर्तनपरंपरा फार पूर्वीपासूनची. पंडितजींचे वडील बंधु पंडितजींच्या काळांत उत्तम कीर्तनकार होते. प्रस्तुत लेखक व त्यांचे सहकारी गुरुबंधु यांनीं पंडितजींच्या वडील बंधूंजवळ—पं. गोपाळ बुवा यांचेजवळ- गायनाचे प्राथमिक धडे घेतलेले होते.

पंडितजी जरी संस्कृत फारसे शिकलेले नव्हते, तरी त्यांचेजवळ कीर्तन-परंपरेंतील गोष्टींचा भरणा भरपूर होता. रसाळ वाणी, चालू काळाला धरून प्रवचन करण्याची धाटणी इत्यादि गुण पंडितजींना त्यांच्या घरा-ण्यांतूनच निसर्गतः प्राप्त झाले होते. कैक प्रसंगीं रामायणानें गुंगवून टाकलेले व पंडितजींनीं गायनाच्या विद्वत्तेबरोबर कीर्तनाची विद्वत्ता केव्हां मिळविली याबद्दल आश्चर्यानें थक्क झालेले रसिक श्रोते पाहण्याचें भाग्य लेखकानें प्रत्यक्ष साभिमान व सानंद अनुभवलें आहे !

रामायण-संकीर्तन मुंबईंत तर इतकें लोकप्रिय झालें होतें कीं, मुंबई-तील गुजराथी व मारवाडी समाजसुद्धां, एखाद्या गाण्याच्या बैठकींतल्या-प्रमाणें त्यांत रंगून जाई ! संगीताला जमणारीं निरनिराळीं स्वरूपें पंडितजींनीं इतकीं जमवून टाकलीं होतीं कीं, पंडितजी हे गायक आहेत कीं प्रवचनकार आहेत, कीं कीर्तनकार आहेत हेंच लोकांना कळेनासें झालें !!

सन १९१५ सालीं मिरजेस मुक्काम असतांना कै. श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन, मिरज संस्थानाधिपती यांनींच पंडितजींना कीर्तनाची दीक्षा दिली. पूर्वरंग व आख्यान पाठ करून पंडितजींनीं श्रीमंत मिरजकर यांचे समक्ष हिराबागेंत पहिलें कीर्तन केलें. त्यानंतर पंडितजींनीं पुष्कळच कीर्तनें केलीं व नवीन आख्यानें रचिलीं. पुढें पुढें तर रात्र रात्रभर पंडितजींचें कीर्तन होऊं लागलें ! सर्व कीर्तनकार मिळून २४ तास कीर्तनें करण्याचे वेळीं, रात्रीं १ वाजल्यापासून सकाळीं ६ वाजेपर्यंत कीर्तन करण्यास कोणी कीर्तनकार तयार नसावयाचे ! ती वेळ पंडितजी हौसेनें पत्करीत !! अशा रीतीनें रसाळ वाणी व सुंदर गायन यांच्या जोरावर पंडितजींनीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi.

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कीर्तनप्रांतहि पूर्णपणें हस्तगत केला !!! शिवाय हिंदींतून व मराठींतून कीर्तनें पंडितजींनीं सुरू केल्यामुळें संगीताच्या प्रसारावरोबरच कीर्तन संस्थेचाहि प्रसार चांगलाच झाला !

रामनामाचा भारतभर प्रचार !

रामायणाचें प्रवचन करीत असतां राम, कृष्ण, शंकर, गणपती, देवी इत्यादि देवदेवींचे निरनिराळे सोपे मंत्र तालसुरांत बसवून, ते लोकांना प्रवचनांत म्हणायला सांगून, पंडितजी त्यांचेकडून ते पाठ करून घेत. त्यामुळें घरोघरीं रामनाम सुरांत घेण्याची प्रथा सर्वत्र रूढ झाली ! पंडितजींचें मुख्य ध्येय म्हणजे संगीताचा प्रचार. तें ध्येय साध्य होण्यास जीं जीं उपयुक्त साधनें पंडितजींना मिळालीं तीं तीं घेऊन त्यांनीं संगीताचा प्रचार घराघरांत केला. " रघुपति राघव राजाराम, पतीतपावन सीताराम " या रामदासपंथी मंत्राचा पंडितजींनीं भारतभर प्रसार केला !

प्रस्तुत लेखकास एकदां दक्षिण हैद्राबादेस जाण्याचा प्रसंग आला असतां, एका गल्लींतील मुसलमान बंधूंचीं मुलें ' रघुपति राघव राजाराम ' म्हणतांना आढळलीं ! तें ऐकून आश्चर्य वाटून त्यांपैकीं एका मुलाला लेखकानें प्रश्न केला, " क्यौ भाई, यह भजन तो हिंदुओंका, और तुम कैसे गाते हो ? " यावर त्या मुलानें जें उत्तर दिलें तें लेखकास फार मौजेचें, आनंदाचें व अभिमानाचें वाटलें !! तो मुलगा म्हणाला, "देखों! यहा गौळीगुडामें एक हिंदू साधू रामायण की कथा करता था, और वडा अच्छा गाता था. उसके मूँहसे जो भजन निकलता था वह इतना मीठा था कि उसको गा लेनेकी इच्छा होती थी, और यहांपर कथा सुनने के लिये हजारों स्त्री पुरुष आते थे, और वह साधू सबको गाने को कहता था. वह सुनकर हम लोगोंने गाना गाकर याद करलिया ! "

तपासाअंतीं हे ' मिंदूंना सुद्धां हिंदु मंत्राची दीक्षा देणारे हिंदु साधु दुसरे तिसरे कोणी नसून आपलेच परमपूज्य गुरुदेव पंडितजी आहेत हें कळल्यावर लेखकाला ' अशा थोर विभूतीचा मी शिष्य आहें ' या विचारानें अतिशय धन्यता वाटली !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीदत्तमहाराजांचा पंडितजींना प्रसाद !

१९१९ सालीं, कीर्तनाचा अभ्यास झाल्यावर, पंडितजींना आपल्या पूर्वपरंपरेची आठवण होऊन आपले पूर्वज सर्व दत्तभक्त होते व ते कीर्तन करीत होते, तेव्हां आपणहि श्रीनृसिंहवाडीस जाऊन श्रीदत्तमहाराजांचे समोर आपल्या कीर्तनाची हजेरी द्यावी, असें मनांत आलें. त्याप्रमाणें मिरजेहून श्रीनरसोबाचे वाडीस जाण्याचें त्यांनीं ठरविलें.

परंतु ते दिवस पावसाळी असल्यामुळें व त्या वेळींच अचानक महाराष्ट्रांत भयंकर पाऊस पडून श्रीकृष्णा नदीला महापूर आल्यामुळें, १०-१५ दिवसांनीं वाडीस जाण्याचें ठरवून महापूर ओसरल्यावर, पंडितजी हे सर्व पार्टीसह नरसोबाचे वाडीस गेले. तेथें महापुरामुळें घाटावर इतका गाळ येऊन पडला होता कीं, श्रीदत्तदर्शनास कोणालाहि जाणें शक्य नव्हतें ! तेव्हां सर्व पार्टीला घेऊन तो गाळ काढण्याचें काम पंडितजींनीं सुरू केलें !! २-३ दिवसांत सर्व गाळ निघून दत्ताच्या पादुकांचें दर्शन सर्वांना मिळूं लागलें, तेव्हां जो तो पंडितजींना धन्यवाद देऊं लागला !!!

पंडितजींनीं प्रथम श्रीदत्तासमोर कीर्तनाची व गाण्याची हजेरी दिली व मग रामायण कथा ७ दिवस सांगितली. त्यांच्या रामायण प्रवचनास खेड्यापाड्यांतून व इचलकरंजी, कुरुंदवाड वगैरे भागांतूनहि लोक येऊं लागले. श्री दत्तासमोर अशा तऱ्हेनें संगीतासह रामायणावर पुराण सांगणें ही गोष्ट नवीन होती, त्यामुळें लोक पंडितजींचें रामायण ऐकून अगदीं रामवेडे होऊन गेले होते ! ७ व्या दिवशीं रामायण-समाप्तीला हजारों स्त्री-पुरुष जमले होते व रामनामाच्या नि दत्तनामाच्या गजरांत गुंग होऊन संगीतसागरांत डुंबत होते !!

अशा रीतीनें रामनामाचा संगीत संदेश घरोघर वाढून पंडितजी दुसरे दिवशीं कुरुंदवाडास, म्हणजे त्यांच्या जन्मभूमीस, जाण्यास निघतांना श्रीदत्त दर्शनास गेले असतां, पुजारी मंडळींनीं पंडितजींना सांगितलें, "पंडितजी, आपल्यासारखे मोठे लोक येथें येऊन सेवा करतात, त्यांना आपण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काय द्यावें या चिंतेंत आम्ही चूर असतां श्रीदत्तमहाराजांनीं ती आमची चिंता दूर केली आहे ! आज पहांटे श्रीदत्त महाराजांचा आम्हांला दृष्टांत झाला कीं, "'पंडितजींना आमच्या अंगावरची छाटी प्रसाद म्हणून द्यावी'."

कोणालाच कधीं न मिळणारी श्रीदत्तमहाराजांची छाटी आपणांस देण्याची खुद्द दत्तमहाराजांची आज्ञा झाली आहे, हें पंडितजींच्या कानीं पडतांच पंडितजींना गहिंवरून आलें व आपल्या पूर्वजांवर जशी दत्ताची कृपा होती तशीच आपल्यावरहि आहे हें पाहतांच पंडितजींचे डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले ! प्रसाद देतांना तेथें हजर असलेले लोक आनंदाश्रूंनीं स्तंभित होऊन गेले होते !!

अशा स्थितींत पंडितजींनीं ईश्वरी प्रसाद म्हणून ती छाटी घेतली व श्रीदत्तनामाच्या गजरांत तेथून कुरुंदवाडास प्रयाण केलें.

पुढें कित्येक वर्षें पंडितजींनीं त्या छाटीचा उपयोग रामायण प्रवचनाचे वेळीं साक्षेपानें वापरून केला !

तपस्वी पंडितजी !

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील श्रीदत्तमहाराजांचा कृपाप्रसाद म्हणून मिळालेल्या भगव्या छाटीचा उल्लेख करून पंडितजी पुढें विनोदानें म्हणत : "परमेश्वराच्या प्राप्तीकरितां किंवा कोणत्याहि कार्याच्या सिद्धीकरितां, सर्वस्वाचा त्याग करून अशी भगवी छाटी (कफनी) अंगिकारावी लागते ! " या छाटीमुळेंच पुढील काळांत इतर कपड्यांचा त्याग करण्याची प्रवृत्ति पंडितजींना झाली व नेहमीं कफनीच घालणें त्यांना आवडूं लागलें ! त्यानंतर रंगीबेरंगी अशा पुष्कळच कफन्या करून पंडितजी त्या वापरूं लागले !

१९१६ सालीं विद्यालयाच्या इमारतीवरील गंडांतरात केवळ रामायण सांगूनच साठ हजारांचा निधि पंडितजींनीं जमविला होता ! त्यानंतर कित्येक वेळां एक कोट रामनामाचा जप स्वतः केला, नि लोकांच्याकडून करविला ! ! श्री. गोसेवक चौंडेमहाराज यांनीं कोट रामनामाचा संकल्प केला होता, तो पूर्ण होणें कठीण, असें श्री. चौंडेमहाराजांना वाटतांच,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांनीं पंडितजींच्याकडे धांव घेतली व पंडितजींनीं त्यांचा संकल्प पुरा केला !

अशाच तऱ्हेनें अलाहाबाद, बनारस या ठिकाणीं सुद्धां कोर्टीनीं जप्त करून घेऊन रामनामाची तपश्चर्या केली. पंडितजींचें नेहमीं हेंच तत्त्व असे कीं, जें काम हातीं घ्यावयाचें तें पूर्ण करून सोडावयाचें ! 'निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु सतां एतद्धि गोत्रव्रतम्' हेंच व्रत त्यांनीं अंमलांत आणलें !! 'अनारम्भो हि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम्। प्रारब्धस्यान्तगमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम्॥' हेंच 'द्वितीय बुद्धिलक्षण' त्यांच्या अद्वितीय बुद्धीचें होतें !!!

संत पंडितजीं !

१९१९ सालीं पुण्यांतील तुळशीबागेंत पंडितजींनीं रामायणावर प्रवचन केलें. त्यानंतर १९२८ सालीं भिकारदास मारुतीचे मंदिरांत तीन आठवडे प्रवचन केलें.

मिरजेस रामायण प्रवचन केलें तें, मोंगली कारकीर्दीत मिरजेच्या किल्ल्यांत श्रीरामदासस्वामींनीं स्थापन केलेल्या मारुतिरायासमोर ! हजारों स्त्री-पुरुष पंडितजींच्या या प्रवचनास जमत असत !!

तिकडे उत्तर हिंदुस्थानांत लाहोर, अमृतसर, देहली, पतियाळा, मंडी इत्यादि ठिकाणीं रामायणावर प्रवचनें करून पंडितजींनीं संगीताचा प्रचार केला. हरिद्वारला तर गंगातटाकीं 'हरी की पावडी'च्या अगदीं जवळ रामायणाची कथा सांगण्याचा पहिला मान पंडितजींनाच मिळाला !

या रामायण-प्रवचनांमुळेंच पं.मदनमोहन मालवीय व महात्मा गांधींच्या-सारखीं जगद्वंद्य माणसें पंडितजींच्या रामायणावर मोहित असत !!

अशा रीतीनें भक्तीची ज्योत पंडितजींच्या मनांत एकसारखी तेवत चालली होती. अखेरीला तर रामनामाचा प्रचार करणें हें एक पंडित-जींचें ध्येयच होऊन बसलें होतें. मात्र असें होतांना, पंडितजी आपलें गाणें कधीं विसरले नव्हते, आपल्या गाण्यामुळेंच लोक आपलें प्रवचन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ऐकतात, ही त्यांच्या मनाची खात्री कायम होती. तसेंच संगीताच्या साहाय्यानेंच रामनामाचा जप केला असतां, तो जास्त फलदायी होतो असें ते श्रोत्यांना सांगत. आपल्या आपत्कालीं रामनामच आपणांस तारील असा पंडितजींचा रामनामावर दृढ विश्वास बसला होता.

अशा वेळीं कांहीं लोक पंडितजींना संत समजूं लागले, कांहीं लोक तुलसीदासांचा अवतार समजूं लागले; तर कांहीं लोक पंडितजी रामदासांच्या 'रघुपति राघव राजाराम' या मंत्राचा प्रचार करीत म्हणून 'रामदासांचा अवतार' असें त्यांना म्हणूं लागले !

संसारी साधू !

लोक जरी पंडितजींना 'अवतारी पुरुष' मानीत असत, तरी स्वतः पंडितजींना मात्र या उपाधीचा राग येई ! कधीं कधीं त्या बाबतींत लोकांचें हंसें उडविण्यासहि पंडितजी कमी करत नसत ! ! आम्हां शिष्यवर्गाला पंडितजी कधीं 'संत' वाटले नाहींत. कारण ते अत्यंत व्यवहारी संसारी पुरुष असल्याचें आमच्या नित्य अनुभवास येत होतें. इतकें असूनसुद्धां कांहीं लोक पंडितजींची टवाळी करीत असत. कांहीं गायक तर अगदीं निंदा करीत ! एका साधारण प्रतीच्या गायकानें तर टोपण नांवाखालीं पंडितजींची भयंकर निंदा केली होती ! तथापि पंडितजींच्या स्वार्थत्यागापुढें व संगीत प्रचाराच्या कार्यापुढें त्यांची निंदा कोणीहि ऐकत नसत. अखरपर्यंत पंडितजी संसारीच राहिले. त्यांनीं आपलें सर्व जीवन संगीताच्या प्रचारासाठीं अर्पण केलें होतें !!

वाईट काळांत वाईटपणें वागण्यापेक्षां रामायण सांगावें, व त्याकरितां इतर कपडे वापरण्यापेक्षां कफनी वापरणें अधिक बरें (आणि कफनी वापरण्याच्यामागें इतिहास होता) म्हणून ते कफनी वापरीत. रामायण सांगतां सांगतां, पंडितजींनीं अशी एक अपूर्व शक्ति मिळविली होती कीं, त्यांच्या रामायण प्रवचनास त्यांचे वैरीदेखील चोरून ऐकण्यास येऊन बसत !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जेथें जलशाला गर्दी होत नसे तेथें पंडितजी लोकांचीं मनें आपल्या-कडे खेंचून घेण्यासाठीं प्रथम रामायण प्रवचन करीत व नंतर गायनाचा जलसा करीत ! त्यामुळें जलशाचाहि प्रचार होई व आपण कशासाठीं जलसा करीत आहोंत हेंहि लोकांना पटवून देतां येई.

रामायण हें विद्यालयाचा प्रचार करण्याचें एक साधन म्हणून पंडितजी त्याचा उपयोग करीत असत हें आम्हां शिष्यांना पूर्ण माहीत होतें. पंडितजी हे 'अवतारी पुरुष' नसून 'संसारी साधू' होते याची आम्हांस जाणीव होती.

रामनामाचा सुपरिणाम !

रामनामांत पंडितजी अखेरीस इतके रंगून गेले कीं, " आतां राम-नामाशिवाय मुखानें दुसरें कांहीं गाणें आवडेनासें झालें आहे " असें ते म्हणूं लागले ! कोणी मुद्दाम 'जुन्या चिजा ऐकवा' म्हणून सांगितलें तरच ते त्या म्हणत. नाहीं तर जुन्या चिजा अजिबात म्हणत नसत.

अशा रीतीनें परमेश्वराच्या भजनांत रमल्यामुळें पंडितजींनीं आपल्या देहाचें सार्थक केलें, यांत काडीमात्र संशय नाहीं. परंतु संगीताचें मात्र अपरिमित नुकसान झालें असें म्हणणें भाग आहे. " जुन्या चिजांमधून परमेश्वराचें नांवहि नाहीं, तेव्हां त्या चिजांच्या धर्तीवर जर देवादिकांचीं पदें म्हटलीं तर काय हरकत आहे ? " असा पंडितजींचा सवाल होता. परंतु जुन्या परंपरेच्या लोकांना त्याच जुन्या चिजा पाहिजे होत्या ! त्यांनाहि पंडितजी पुढीलप्रमाणें उत्तर देत ! " मला येत असलेले सर्व राग व येत असलेल्या सर्व चिजा मीं माझ्या पुस्तकांत दिल्या आहेत व शिष्यांना शिकविल्या आहेत. त्यांचेकडून त्या चिजा तुम्ही ऐका; मला मात्र चिजांच्या गर्तेत परत रुतवूं नका. "

अशा प्रकारें रामायण वाचनाचा परिणाम पंडितजींच्या देहाच्या उद्धारार्थ झाला, असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. पंडितजींना दिसणेचें कमी झालें म्हणून सर्व रामायण मोठ्या अक्षरांत लिहून काढून ती पोथी पंडितजी वाचीत असत. नाशिकच्या रामनाम आधार आश्रमांत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कैं. गायनाचार्य पं. विष्णु दिगंबर पलुसकर



संस्थापक : गांधर्व महाविद्यालय.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तीच प्रचंड पोथी पूजेंत ठेविली आहे! ही प्रचंड पोथी बव्हंशीं, पंडितजींचे त्या वेळचे 'हनुमान' म्हणून समजले जाणारे पं. शंकरराव व्यास यांनीं लिहिली आहे!!

पंडितजींचा राष्ट्रीय बाणा

पंडितजींचा स्वदेशाभिमान फार जाज्वल्य होता. पंडितजी नेहमीं म्हणत, " ज्या कलेवर किंवा विद्येवर आपण पोट भरतों, त्या विद्येचा सर्वत्र फैलाव करून त्या विद्येची किंवा कलेची उन्नति करणें हा सुद्धां एक प्रकारें स्वदेशाभिमानच म्हटला पाहिजे."

सन १९०६–७ सालीं स्वदेशीची जी लाट उसळली होती त्या वेळीं पंडितजी व त्यांचे शिष्य स्वदेशी कपड्यांचीं ठाणें खांद्यावर घेऊन लाहोर येथें बाजारांत विक्रीस जात होते!

राष्ट्रीय चळवळीच्या ज्या सभा होत तेथें हजारोंनीं जनसमुदाय जमत असे, व त्या वेळीं सभेंत शांतता प्रस्थापित करण्यासाठीं पंडितजींना गाण्यासाठीं पाचारण करण्यांत येई. पंडितजींचे मोहक सुस्वर स्वर कानीं पडतांच सभेंतील लोक एकदम शांत होत, व मगच सभेच्या कामास सुरुवात होई; तेव्हांपासूनच कोणतीही सभा सुरू करण्याचे अगोदर ईश्वरस्तवन गाण्याची प्रथा पडली! आणि या सुयोग्य अशा प्रथेचें सर्व श्रेय पंडितजींच्या राष्ट्रीयत्वास दिलें पाहिजे. सन १९०६ सालीं वंदेमातरम् म्हणण्यासाठीं म्हणून पंडितजींना राष्ट्रीय सभेच्या चिटणिसांचें बोलावणें आल्यावरून ते बनारसला गेले होते; तेव्हांपासून प्रत्येक राष्ट्रीय सभेला बहुतेक पंडितजींना बोलावणें येई व तेहि आवर्जून जात असत. सन १९१८ सालीं राष्ट्रीय सभेचें जादा अधिवेशन मुंबईस भरलें, तेव्हां तर सर्व तऱ्हेची संगीताची व्यवस्था पंडितजींच्या विद्यालयाकडेच सोंपविली होती! १९२१ सालीं अहमदाबादेस राष्ट्रीय अधिवेशन सुरू होण्याचे वेळीं महात्मा गांधीजींना दरवाजावरील लोकांच्या गर्दीनें अडवून ठेवलें, तेव्हां त्या गर्दीतून मुक्त होण्यासाठीं महात्माजींनीं पंडितजींनाच बोलाविलें! अर्थात् तेथून मुक्त झाल्यावरच महात्माजी सभेच्या कामास गेले!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ईशस्तवन गाण्यास मनाई ?

राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाबरोबरच, पुढें पुढें जवळ जवळ प्रत्येक वर्षी, पंडितजींनीं संगीत परिषद् भरविली.

सन १९२३ सालीं कोकोनाडा येथें मौ. महमदअल्ली यांचे अध्यक्षते-खालीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन भरलें होतें. त्या वेळीं अध्यक्ष महाशय मुसलमान असल्यामुळें, त्यांनीं प्रथम ईशस्तवन गाण्यास मनाई केली ! तेव्हां पंडितजींनीं, एकदम भडकून जाऊन, अध्यक्षांना विचारलें, "राष्ट्रीय सभा म्हणजे काय मशीद आहे ? राष्ट्रीय सभा ही सर्व जमातींची आहे, तेव्हां संगीताला मनाई करण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे ? "

तरीसुद्धां अध्यक्ष आपला हेका चालवूं लागले, तेव्हां पंडितजींनीं अधिकच भडकून, अध्यक्षांना सवाल केला, " मघां वाजत गाजत येतांना वाद्यें वाजलेलीं तुम्हांस चाललीं, नि आतां मी ईशस्तवन करीत आहें, तें तुम्हांस चालत नाहीं हें कसें ? " झालें ! सर्व मंडपांतून 'पंडितजींना गाऊं द्या, पंडितजींना गाऊं द्या ' अशा आरोळ्या सुरू होतांच पंडितजी गाऊं लागले ! अध्यक्षांच्या परवानगीची त्यांनीं वाटहि पाहिली नाहीं ! !

मोठमोठे पुढारी पंडितजींच्या बाजूला आहेत असें पाहतांच अध्यक्ष अगदीं चूप बसले !

पुढें मौ. महमदअल्ली हे पंडितजींना डेक्कन हैद्राबादला भेटल्यावर त्यांना म्हणाले, " वा ! पंडितजी, आपने तो हमारी कोकोनाडामें खूब उडाई ! ! " त्यावर पंडितजींनीं उत्तर केलें, " तुम्ही करीत असलेला अपमान हा माझा अपमान नव्हता, संगीताचा तो अपमान होता, व तो मला सहन होईना म्हणून मीं तसें उत्तर दिलें !! "

याबाबत सर्व हिंदुस्थानभर वर्तमानपत्रांतून पंडितजींची प्रशंसा झाली, व त्यामुळें त्यांचा राष्ट्रीय बाणा सर्वत्र दुमदुमून गेला !!!

पंडितजींचें राष्ट्रीय संगीत

पंडितजींनीं 'राष्ट्रीय संगीत' म्हणून एक पुस्तक काढून सभांच्या वेळीं राष्ट्रीय पदें म्हणण्याची लोकांची फार चांगली सोय करून ठेविली होती !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१९०६-७ सालीं 'जगमें घर की फूट बुरी' हें पद बागेश्रींत बसविलें होतें. हें पद पंडितजी इतक्या आत्मीयतेनें म्हणत असत कीं, या घटकेला जरी त्याची नुसती आठवण झाली तरी सुद्धां अंगावर कांटा उभा राहतो!

शिवाजीवर एक हिंदी पद करवून घेऊन ते तेथें मुद्दाम म्हणत असत. अशीं राष्ट्रीय वृत्तीचीं पदें पंडितजींनीं आपल्या 'संगीतामृत प्रवाह' मासिकांत छापलीं होतीं, त्यांचा एवढा सुपरिणाम झाला कीं, जो तो तीं राष्ट्रीय पदें म्हणूं लागला! 'भारत हमारा देश है' हें पद देखील पंडितजींनींच लोकप्रिय केलें! गेल्या सर्व राष्ट्रीय चळवळींत हें पद सर्व लोक म्हणत असत!!

'वंदे मातरम्' हें पद सुद्धां आपल्या काफी रागांत बसवून पंडितजींनीं तें इतकें ओजस्वी करून टाकलें कीं, त्या पदाची ओजस्विता पंडितजींच्या चालीनेंच या घटकेपर्यंत पंडितजींच्या पश्चात्‌हि राखली असून सर्व हिंदुस्थानभर याच चालीचा प्रसार झालेला आहे!

मध्यंतरीं फक्त महाराष्ट्रांतच ही चाल बदलण्याची लाट कांहीं भावनाशून्य लोकांनीं उठविली होती. आपल्या विलासलोलुप प्रवृत्तीला आळा घालून 'वंदेमातरम्' हें पद ओजस्वीपणानें म्हणण्याचें धाडस करणें त्यांना शक्य नव्हतें. त्यामुळें 'वंदे मातरम्'ला नवीन चाल लावणारा म्हणून प्रसिद्धीची इच्छा झालेल्यांची 'झिंजोटी'ची चाल 'वांझोटी' ठरून, पळून जाण्याचा प्रसंग पंडितजींच्या शिष्यांनीं त्यांचेवर आणला! 'जय वंदेमातरम्!'

राष्ट्रीय बाण्याचा अज्ञातवास!

१९०७ सालीं दे. भ. लाला लजपतराय यांना हद्दपारी झाल्यावर पंजाबमध्यें फारच विकट परिस्थिति उत्पन्न झाली! पंडितजी हे 'चित्पावन' म्हणून त्यांचेवर सरकारी नजर होती!! १९०७–८ सालीं प्रत्येक चित्पावन माणूस लो. टिळकांचा अनुयायी समजला जात असे; आणि आमचे पंडितजी तर बोलून चालून 'टिळक सांप्रदायिक' होते, नि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अखेरपर्यंत ते 'टिळक सांप्रदायिक'च राहिले! पंडितजींचे शिष्यसुद्धां बहुतेक दक्षिणी असल्यामुळें विद्यालयांतील मंडळींच्या हालचालींवर सी. आय्. डी.ची सक्त नजर असे.

तथापि पंडितजी धडाडीनें राष्ट्रीय गाणीं म्हणावयास जातच असत. याचा एक विपरीत परिणाम असा होणार होता कीं, 'संगीतामृत प्रवाह' मासिकांत जीं पदें छापलीं होतीं, त्यांबद्दल जप्ती येणार होती! सरकारी गोटांतीलच एका पंडितजींच्या भक्तानें आगाऊ सूचना देतांच रात्रींच्या रात्रीं, मासिकांतील पदें फाडून जाळून टाकण्यांत आलीं!! ठरल्याप्रमाणें सरकारी अधिकारी झडती घेण्यास आले, पण आक्षेपार्ह असें कांहीं न सांपडल्यामुळें जसे आले तसे परत गेले!!!

त्यानंतर पंडितजींच्या त्या भक्तांनीं पंडितजींना एक फार चांगला व्यावहारिक सल्ला दिला. ते म्हणाले, "पंडितजी, आपण संगीतांत फार थोर आहांत, पण हें कार्य जर आपणांस सातत्यानें करावयाचें असेल तर हीं राष्ट्रीय पदें म्हणण्याचें सोडून द्या. नाहीं तर सरकार आपणांस धुळीला मिळविल्याशिवाय कदापि राहणार नाहीं. तुम्हीच धुळीला मिळाल्यावर तुमच्या संगीताची काय दशा होईल याचा आपण अवश्य विचार करावा."

पंडितजींना वरील सल्ला पटला, नि पुढें बरेच दिवस पंडितजींनीं आपला राष्ट्रीय बाणा, केवळ संगीतोद्धारासाठीं, अज्ञातवासांत ठेवला!!

पंडितजींच्या राष्ट्रीय देणग्या!

कै. प्रो. विजापूरकरांचा व पंडितजींचा स्नेह होता. त्यांच्या समर्थ विद्यालयास एक वाजाची पेटी, अगदीं शुद्ध देशी सुरांची—विद्यालयांत मुद्दाम हातानें ढाळून, घांसून सूर तयार करून, पंडितजींनीं भेटीदाखल दिली होती! त्या पेटींतील सूर घांसण्यांत प्रस्तुत लेखकहि सामील होता, हें येथें साभिमानानें नमूद करावेंसें वाटतें. सदरची पेटी अद्याप ह. भ. प. डॉ. दत्तोपंत पटवर्धन, राष्ट्रीय कीर्तनकार, यांचेजवळ शाबूत आहे!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तळेगांवचें समर्थ विद्यालय बंद झाल्यावर त्यांतील बरीच मंडळी पंडितजींच्या आश्रयाला होती. त्यांपैकींच एक म्हणजे पुणें येथील गोपाळ गायन समाजाचे चालक श्री. गोविंदराव देसाई हे होत.

यवतमाळचें राष्ट्रीय विद्यालय सरकारनें बंद केल्यावर कै. रा. रा. गोपाळराव घारप यांना पंडितजींनीं आपल्याजवळ ठेवून घेऊन, गाणें शिकवून, पुण्यास गणेश गायन समाज चालविण्यास समर्थ केलें !

अशा रीतीनें पंडितजींनीं समाजास चालत्या, बोलत्या, गात्या राष्ट्रीय देणग्या दिल्या !

विद्यालयांत, पंडितजींचा देशीवर फार कटाक्ष असे. लो. टिळक व त्यांचे अनुयायी हे नेहमीं विद्यालयांत येत असत. अखेरीस संगीत हें सर्व पक्षांनाच पाहिजे असें झाल्यानें, जो पक्ष गाण्यास बोलवील, त्या पक्षाकडे पंडितजी स्वतः जाऊं लागले व आपल्या शिष्यांनाहि पाठवूं लागले. यामुळें पंडितजी जरी स्वतः टिळक पक्षाचे पक्के अनुयायी होते, तरीहि संगीताच्या प्रसारासाठीं त्यांनीं सर्वसंग्राहक वृत्ति ठेवल्याचें सर्वांच्या प्रत्ययास आलें.

राष्ट्रीय पुढारी नि पंडितजी !

पंडितजींच्या राष्ट्रीय वृत्तीमुळें त्यांचेवर थोर राष्ट्रीय पुढाऱ्यांचाहि लोभ जडला होता !

१९१८ सालीं विद्यालयाच्या वसतिगृहाचे उद्घाटन-प्रसंगीं स्वतः लोकमान्य टिळक, सर्व समारंभ आटोपल्यावर, स्मरणपूर्वक पानसुपारी घेऊन गेले !!

महात्मा गांधीजींच्याकडे तर, पंडितजींनीं आपले शिष्य कै. पं. नारायण-राव खरे यांना संगीत राष्ट्रसेवेप्रीत्यर्थ समर्पणच केलें होतें ! १९३० च्या दांडीकूचमध्यें कै. पं. खरे हे अगदीं पुढें होऊन संगीतांत राष्ट्रसेवा करीत असतां पकडले जाऊन त्यांची कारागृहांत रवानगी झाली !!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शिक्षा भोगून पं. खरे हे पंडितजींना भेटावयास आले असतां पंडितजी अत्यंत अभिमानानें म्हणाले, "राष्ट्राच्या लढ्यांत इतर पुढाऱ्यांबरोबर आमचा एक गवईसुद्धां शिक्षा भोगतो व संगीत हेंहि राष्ट्रोद्धाराच्या कार्यांत उपयोगी पडतें, हें सिद्ध करतो हें पाहून अतिशय धन्यता वाटते!" धन्य पंडितजी !!!

पंडितजींचा जाज्वल्य देशाभिमान

पंडितजी हे केवळ गवई नव्हते तर त्यांना स्वदेशाविषयीं पूर्ण अभिमान होता. हा अभिमान त्यांनीं वेळोवेळीं कसा प्रगट केला तें पुढील गोष्टींवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. पांचवे जॉर्ज बादशहा हिंदुस्थानांत आले होते. त्या वेळीं सर्व मुंबई अक्षरशः लाखों लोकांच्या झुंडींनीं गजबजून गेली होती. कै. गा. बाळकृष्णबुवाही इचलकरंजीहून मुद्दाम बादशहाची ही मिरवणूक पाहाण्यासाठीं आले होते. आम्ही मुलेंही मिरवणूक पाहाण्यासाठीं अतिशय उत्सुक होतों. हल्लींच्या रॉयल ऑपेरा हाउसजवळ (मुंबईस) एक नवी ५।६ मजली इमारत तयार होत होती. तीमध्यें आम्हां सर्वांची मिरवणूक पहाण्याची व्यवस्था पंडितजींनीं केली होती. पण आश्चर्य असें कीं खुद्द पंडितजी मात्र मिरवणुकीस आले नाहींत. गु. बाळकृष्णबुवांनीं त्याचें कारण पंडितजींना विचारतांच "माझा हिंदुस्थानचा राजा मंडालेच्या तुरुंगांत असतांना या राजाचें तोंड मी कधींच पहाणार नाहीं" असे उद्गार काढून पंडितजींनीं लोकमान्यांवरील अलौकिक भक्ति व देशप्रेम व्यक्त केलें.

१९२१ च्या अहमदाबादच्या कॉंग्रेसमध्येंही म. गांधींनीं पंडितजींच्या गाण्याचा उपयोग प्रचंड जनसमुदायाला शांत करण्यासाठीं करून घेतला. म. गांधींच्या दर्शनासाठीं कॉंग्रेस मंडपाबाहेरच लोकांची इतकी गर्दी जमली होती कीं, म. गांधींना मंडपांत प्रवेश करणेंच अशक्य होऊन बसलें. आणि नेमकें त्याच वेळीं पंडितजींनीं आपल्या खड्या व पल्लेदार आवाजांत भजन सुरू केलें व हजारों लोकांना 'रघुपति राघव राजाराम' म्हणावयास लावलें. तेवढ्या वेळांत महात्माजी हळूच निसटून मंडपांत गेले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भजन संपल्यावर महात्माजी निघून गेल्याचें लोकांना समजलें. अशा त-हेनें आपल्या संगीतानें पंडितजी लोकांना अगदीं मंत्रमुग्ध करून टाकीत असत. अशा तऱ्हेनें पंडितजींनीं आपल्या संगीताचा उपयोग राष्ट्रसेवेसाठीं देखील केला.

कै. गायनाचार्य भास्करबुवा व पंडितजी

कै. गायनाचार्य भास्करबुवा बखले यांचा व पंडितजींचा परिचय फार जुना होता. परंतु एका वेळीं दोघे मिळून एकाच बैठकीवर गाण्याचा प्रसंग कधींच आला नाहीं !

गा. भास्करबुवांचा पंडितजींच्याबरोबर परिचय प्रथम १९०६-७ सालीं मुंबई येथें झाला. पंडितजी हे पुष्कळ वर्षांपासून पंजाबकडेच राहात असल्यामुळें महाराष्ट्रांतील गायकांची ओळख त्यांना फारच थोडी होती. जी काय होती ती फक्त निवडक गायकांचीच !

पंडितजींनीं गा. भास्करबुवांच्या गुरूंचा बडोद्यास अपमान केला अशी समजूत गा. भास्करबुवांची असलेमुळें (या समजुतीची हकीगत पंडितजींच्या तोंडूनच प्रस्तुत लेखकास ऐकावयास मिळाली आहे) गा. भास्करबुवा हे मोकळ्या मनानें पंडितजींच्या बरोबर बोलत नसत. तथापि पंडितजींची व भास्करबुवांची गांठ पडल्यावर एकमेक मनमोकळेपणानें बोलत असत, हें प्रत्यक्ष लेखकानें पाहिलें आहे !

जालंदरच्या जलशांत पंडितजींचें भांडण झाल्यावर कै. भास्करबुवांना व कै. गा. वझेबुवांना बोलाविल्याबद्दल पंडितजींनींच कै. पं. तोलोरामजी यांना सांगितलें. कोल्हापूर वगैरे ठिकाणीं पंडितजींचे जलसे होत, तेव्हां भास्करबुवांना आमंत्रण देण्यास पंडितजी कधीं विसरले नाहींत ! मात्र पंडितजींचें पूर्वीचें तयारीचें गाणें भास्करबुवांनीं ऐकलेलें असलेमुळें जलशांतील पंडितजींचें गाणें भास्करबुवांना आवडलें नाहीं तर आश्चर्य कसलें ? तथापि कोल्हापूरमधील लक्ष्मीप्रसाद थिएटरमध्यें होणाऱ्या पंडितजींच्या जलशानंतर त्याच ठिकाणीं मुद्दाम करविलेले कै. गा. भास्करबुवांचे जलसे लोकप्रिय न झाल्याचें लेखकानें पाहिलें आहे !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कै. जोगळेकर व पंडितजी

त्या वेळचे किर्लोस्कर संगीत मंडळीचे मालक कै.नारायणराव जोगळेकर यांचा व पंडितर्जींचा परिचयसुद्धां फार जुना होता. किर्लोस्कर मंडळींत कै. भास्करबुवा पूर्वीं होते, त्यामुळें किर्लोस्कर मंडळींत कै. भास्करबुवांचें जाणें येणें फार होतें.

किर्लोस्कर मंडळींतील लहान मुलांना गाणें वगैरे शिकण्यासाठीं म्हणून पंडितर्जींच्या विद्यालयांत पाठविण्याइतपत त्यांचा व कै. जोगळेकरांचा घनिष्ठ स्नेहसंबंध असल्यामुळें एक दिवस जोगळेकर पंडितर्जींना म्हणाले, "बुवा, तुमच्या व भास्करबुवांच्या गाण्याचा सामना करूं या!" त्यावर पंडितजी चटकन् उत्तरले, "जरूर सामना करा. दोन हजार रुपये बक्षीस ठेवा व दोन महिने मेहनतीला द्या. मात्र प्रथम दोघांनाहि हजार हजार रुपये खुराकासाठीं द्या व मग होऊं द्या सामना!!"

अर्थात् हा अटीतटीचा होऊं घातलेला सामना प्रत्यक्षांत होण्याचा योग कधीं आला नाहीं ही गोष्ट निराळी!

पण पंडितर्जींच्या वरील उद्गारांवरून त्यांचें संगीतावरील आदरयुक्त प्रेम व भास्करबुवांच्या बद्दलचा बंधुभाव ह्या गोष्टी स्पष्ट झाल्या, हा फायदा कांहीं लहानसहान नव्हे!

पंडितर्जींचें 'गांधर्व महाविद्यालय'
तर
कै. भास्करबुवांचा 'भारत गायन समाज!'

पंडितर्जींनीं मुंबईस विद्यालय काढल्यावर त्यांच्या ईर्षेनेंच पुण्यास किर्लोस्कर भारत गायन समाज काढण्यांत आला! त्याचे कै.गा.भास्करबुवा हे प्रिन्सिपॉल होते.कै.श्री. गोविंदराव टेंबे हे हार्मोनियम शिकवीत व समाजाची सर्व व्यवस्था पहात. किर्लोस्कर मंडळीनेंच समाजाची सर्व व्यवस्था पाहण्याचें ठरलें होतें; म्हणजे फायदा झाला तर भास्करबुवांनीं घ्यावा व तोटा येईल तो किर्लोस्कर मंडळीनें सोसावा, अशा तऱ्हेची ती व्यवस्था

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होती. पुढें श्री. जोगळेकर हे निवर्तल्यानंतर समाजांत फारच घडामोडी झाल्या, त्यामुळें व पूर्वीचा किर्लोस्कर मंडळीचा आश्रय बंद झाल्यानें कै. भास्करबुवांचे फारच हाल होऊं लागले!

अशा परिस्थितींत पुणें सोडून भास्करबुवा मुंबईस येऊन राहिले. याचे अगोदर तीन चार वेळां ते मुंबईस राहून गेले होते. या खेपेस मात्र 'आतां कसें चालतें' या विवंचनेंत ते होते!

पहिली संगीत परिषद

१९१८ सालीं मुंबईस विद्यालयातर्फे पहिली संगीत परिषद् भरविण्याचें पंडितजींनीं ठरविलें. गायक लोकांना बोलावण्याचें कार्य स्वतः पंडितजीच करीत होते. भास्करबुवांना भेटण्यासाठीं ते शास्त्री हॉलमध्यें गेले, व परिषदेबद्दलची सर्व हकीगत त्यांना सांगून परिषदेचें आमंत्रण दिलें. 'पाहतों, कळवीन' अशी भास्करबुवांची भाषा ऐकतांच पंडितजी त्यांना म्हणाले, "पूर्वीचें सर्व विसरून जा. पुढील कार्याकडे पहा. संगीताच्या प्रचाराकडे लक्ष द्या, व याच बैठकींत परिषदेला येण्याचें वचन द्या. तुमचेकडून तसें वचन घेतल्याखेरीज मी येथून हलणार नाहीं!"

भास्करबुवाहि फार सालस नि सरळमार्गी! "मी येणार नाहीं" असें शब्द तोंडांतून काढण्याचें धाडस त्यांच्याच्यानें कसें करवेल? अर्थात् परिषदेला येण्याचें वचन त्यांचेकडून घेऊनच पंडितजींनीं त्यांचा निरोप घेतला!

ठरल्या वेळीं परिषद सुरू झाली. पं. भास्करबुवांना त्यांचे घरून घेऊन येण्यासाठीं प्रस्तुत लेखकच गेला होता. गाडींत बसवून व पं. भास्कर-बुवांना परिषदेच्या मंडपांत घेऊन येतांच टाळ्यांचा कडकडाट झाला!!

कै. गा. वझेबुवा व गा. अनंत मनोहर यांचे कार्यक्रम झाल्यावर गा. भास्कर-बुवांचा कार्यक्रम होता. कार्यक्रमाला सुरुवात झाल्याबरोबर सभा चित्रा-सारखी तटस्थ झाली होती! गाण्याला सुरुवात अडाणा रागांतील 'मुंदरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मोरिका' या ख्यालानें झाली. साथीला कै. दत्ता रामजी होते. गाण्याला असा कांहीं रंग भरला कीं, सर्व सभा नुसती नागासारखी डुलत होती !

समोरच मरहूम रहिमतखांसाहेब, कै. गायनाचार्य बाळकृष्णबुवा, कै. गा. वझेबुवा, कै. गा. गुंडामहाराज, कै. गा. अण्णाबुवा, गा. अनंत मनोहर इत्यादि बडीबडी गायक मंडळी बसली होती !! असल्या बड्या गायकांसमोर एखाद्या नवशिक्या गायकाची गाळणच उडायची; पण गायनाचार्य भास्करबुवा हे त्यांच्यापैकींच एक अद्वितीय गानरत्न असल्यामुळें त्यांच्या गाण्याला अधिकच रंग भरला !!

गाणें संपलें, नि मंडपभर नुसता टाळ्यांचा वर्षाव सुरू होता ! घरीं परत जाण्यापूर्वीं भास्करबुवा पंडितजींना भेटून म्हणाले, " बुवा, श्रोतृसमाज चांगलाच तज्ज्ञ जमला होता ! मला कल्पना नव्हती कीं, लोकांना गाणें इतकें चांगलें समजेल !! बुवा, हा प्रताप तुमचा आहे ! तुम्हीच सभ्य लोकांत चांगल्या गाण्याचा खरा प्रचार केलात ! " यावर पंडितजी कांहीं बोलले नाहींत. नुसते हंसले ! तीन दिवस परिषदेला भास्करबुवा नियमानें येत असत. परिषद संपल्यावर एक अल्पशी देणगी भास्करबुवांना देण्यांत आली. देणगीचा स्वीकार न करतां भास्करबुवा म्हणाले, " बुवा, तुम्ही इतका खटाटोप करतां, आम्ही नुसते येऊन गायलों, तर देणगी कसली देतां ? ही देणगी मी परिषदेलाच देत आहें !! " असें बोलून भास्करबुवांनीं पंडितजींच्या हातांत हात मिळविला. असा दोघांचा मिलाफ झालेला पाहून सगळी मुंबई पंडितजींना धन्यवाद देऊं लागली !

अशा कित्येक महान गायनाचार्यांचा संबंध पंडितजींचे बरोबर असल्यामुळें विद्यालयांत त्यांचें येणें जाणें फार होत असे. कै. गा. पं. बाळकृष्णबुवांचे जलसे वर्षांतून ५-६ तरी होत असत. कै. गा. भास्करबुवांचे ४ जलसे विद्यालयाच्या 'श्रीराम भुवनांत' त्यांच्या चाहत्यांनीं केले. हॉलचें १ पैसा सुद्धां भाडें घेतलें नाहीं हें लेखकास माहीत आहे. असेंच कै. खांसाहेब रहिमतखां, कै. गा. रामकृष्णबुवा वझे यांचे जलसे स्वतंत्रपणें त्यांच्या चाहत्यांनीं केले. हेही जलसे विद्यालयातच झाले. पंडितजींचें असें मत असे कीं गायनाचार्यांचे जलसे करण्यासाठींच 'राम भुवन' आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अशा तऱ्हेनें विद्यालयाची इमारत म्हणजे संगीताचें केंद्र मानलें जाण्याचा मान पंडितजींच्या खटपटीमुळें मिळाला. अशा कित्येक गोष्टी पंडितजींच्या लिहितां येतील. या संगीत परिषदा १९२२ पर्यंत झाल्या खऱ्या, पण विद्यालयाची आर्थिक परिस्थिति फारच बिघडत चालली होती. तरी पण पंडितजींनीं आपली चिकाटी कांहीं सोडली नव्हती. अखेरपर्यंत विद्यालयाची बाजू मजबूत व्हावी म्हणून खटपट होती. पण ईश्वरी इच्छा कांहीं निराळीच असल्यानें परिस्थिति सुधारण्याचे ऐवजीं बिघडतच चालली. तरी पण हिमतीनें हिंदुस्थानभर दौरे सुरूच होते. २५-३० मंडळींना घेऊन प्रवास करणें ही कांहीं सोपी गोष्ट नव्हती. तथापि पंडितजींनीं प्रचाराचें कार्य अव्याहत सुरू ठेवलें होतें. १९२३ च्या गयेच्या कॉंग्रेसच्या वेळीं पंडितजींचे पैशांची चोरी झाली. तिकिटें काढलेलीं सुद्धां चोरीस गेलीं. तेव्हां गयेंत ३-४ दिवस मुक्काम करून रामायण प्रवचन करून पैसा मिळवून मुंबईस परत आले. किर्लोस्कर संगीत मंडळी त्या वेळीं गयेला हिंदी नाटकें करीत होती. पंडितजींनीं त्यांचाही उपयोग करून घेऊन अडचणींतून मार्ग काढला. पंडितजी इतके दैववान् खरे! वेळ काळ बदलल्यावर त्यालाही तोंड देऊन कार्य केलें, पण आपल्या तत्त्वापासून च्युत कधींहि झाले नाहींत! त्यांतच पंडितजींचा मोठेपणा दिसल्याशिवाय रहात नव्हता!

अखेरपर्यंत आपल्या कार्यावरचा दृढ विश्वास त्यांनीं कधीं सोडला नव्हता. रामनामामध्यें मनाला रंगवून सर्व कार्य ते अविरत संगीतोद्धारासाठीं करीत राहिले. अखेर घटकेपर्यंत संगीताचें कार्य करीत राहणें हें त्यांनीं ध्येयच बनवून टाकलें होतें.

शिष्यांना लेखक बनविलें

आम्हां विद्यार्थ्यांना संगीतावर पुस्तकें लिहिण्याबद्दल उत्साह देऊन आमच्याकडून तें कार्य करून घेतलें. मला स्वतःला पंडितजींनीं 'लेखक' बनविलें. १९२८ सालीं 'विधिलिखित' नाटकांतील निवडक पदांचें पुस्तक माझ्याकडून लिहवून घेतलें. सर्व नाटकांतील पदांचें लेखन करून छापलीं असतां शेंकडों पदें जनतेला देतां येतील अशीं पदें स्वरलिपीबद्ध

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देऊन संगीताचा जनतेला षोक पद्धतशीर लावतां येईल कीं नाहीं ? असें पंडितजी म्हणत असत. 'नाट्य-संगीत प्रकाश' हें पुस्तक मीं लिहून तयार केल्यावर पंडितजींच्याच प्रेसमध्यें छापून मला देवविलें. अशा तऱ्हेनें कै. शंकरराव पाठक (माझे सहकारी व गुरुबंधु) यांना व्हायोलिनवर पुस्तक लिहावयास लावलें. कै. श्री. रामचंद्र गोपाळ पुरोहित यांनीं अष्टपदींचें पुस्तक पंडितजींच्याच प्रेरणेनें लिहिलें. पंडितजींचे पश्चात् पं. शंकरराव व्यास, पं. नारायणराव व्यास, कै. पं. नारायणराव खरे, पं. बाबूराव गोखले यांनीं प्रकाशित केलेल्या संगीतावरील महत्त्वाच्या ग्रंथांप्रमाणेंच पंडितजींचे चिरंजीव कै. दत्तात्रय वि. पलुसकर यांनींसुद्धां पंडितजींचींच 'बाल-प्रकाश' पुस्तकें नवीन पद्धतीनें छापून काढलीं. अशा उत्साहानें पंडितजींचें पुस्तकप्रकाशनाचें कार्य त्यांच्या शिष्य मंडळींनीं केवळ त्यांच्या उत्साहानें केलें. पंडितजींच्या पश्चात् त्यांच्या लेखनपद्धतीचा प्रचार आम्हीं शिष्य मंडळींनीं अव्याहत कायम ठेवला आहे. पंडितजींच्या शिष्यांपैकीं, पं. ओम्‌कारनाथ ठाकूर यांनीं आपली नवीनच पद्धती काढून नवीन पुस्तकें लिहिलीं आहेत.

कै. पं. नारायणराव खरे संगीत शास्त्राबद्दलही बराच विचार करून पुस्तकें लिहिणार होते. पण त्यांचे आकस्मिक निधनानें हें कार्य राहून गेलें. पं. ओम्‌कारनाथांनीं संगीत शास्त्रावर पुस्तकें लिहिण्यास सुरुवात केली आहे. हें सुद्धां पंडितजींचें कार्यंच त्यांच्या प्रेरणेनेंच केलें असें म्हणणें चूक होणार नाहीं. अशा पुष्कळ गोष्टी पंडितजींच्या प्रेरणेनें चालल्या आहेत असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. पंडितजींच्या पश्चात् त्यांचें गांधर्व महाविद्यालय चालविण्याचें कार्य म्हणजे संगीत कलेचें विद्यादान करण्याचें कार्य त्यांच्या शिष्य मंडळींनीं व शिष्यांच्या शिष्य मंडळींनीं अव्याहत २५ वर्षें चालविलें आहे. गांधर्व महाविद्यालय मंडळ, भारतीय संगीत प्रसारक मंडळ पुणें, विष्णु दिगंबर संगीत विद्यालय पुणें, महाराष्ट्र संगीत विद्यालय मुंबई, श्री गोपाल गायन समाज पुणें इत्यादि संस्थांच्या परीक्षेला चार ते पांच हजारांपर्यंत विद्यार्थी दरवर्षी बसतात. हें सर्व कार्य पंडितजींच्याच प्रेरणेनें चाललें आहे. अशा सर्व गोष्टींच्या विचारानें पंडितजींचे शिष्य पंडितजींच्या

Dr. Urmila Sharma Collection, Vararlasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पद्धतीचा प्रचार करण्यासाठीं झटत आहेत. यावरून पंडितजी संगीत सृष्टींत संगीताचे युगप्रवर्तक होते म्हणूनच त्यांचे पश्चात् केवळ त्यांच्या प्रेरणेनें हें कार्य जोमानें करण्याची धमक ठेवीत आहेत. यावरून पंडितजींचें कार्य संगीत क्षेत्रांत केवढें आवाढव्य आहे व तें पार पाडण्यास परमेश्वर व पंडितजींचा आशीर्वाद कसा उपयोगी पडत आहे, हें त्यांचे कार्यावरून सिद्ध होत आहे. पंडितजींच्या एकेक पैलूला एकेकांनीं वाहून घेऊन कार्य केलें, तर तें जन्मभर पुरेल, इतकें अफाट कार्य पंडितजींनीं अगोदरच करून ठेवलें आहे. तेंच करीत राहणें हेंच त्यांच्या शिष्यांचें कर्तव्य होऊन बसलें आहे.

शिष्यांना वक्ते बनविलें

पंडितजींनीं आपल्या शिष्यांना संगीताचीं पुस्तकें लिहिणेस प्रवृत्त केलें; तसेंच त्यांना वक्तेही बनविण्यासाठीं त्यांची धडपड होती. सुशिक्षित विद्यार्थी तेव्हांपासून विद्यालयांत दाखल करून घेऊं लागले. माझ्यासारखा अल्पशिक्षित त्यांचा विद्यार्थी पण मला जेव्हां नाटक मंडळींत जाऊन बोलण्याची संवय झाली, तेव्हां वसंत व्याख्यानमालेंत (पुण्याच्या) १९२९ सालीं ' संगीताचें मराठी-करण ' या विषयावर प्रथम लिहून काढलेलें व्याख्यान वाचलें. (हें माझें व्याख्यान श्री. वसंत शांताराम देसाई, सब जज्ज पुणें यांनीं लिहून दिलें होतें.) या व्याख्यानानंतर पंडितजींनीं उत्साहपर पत्र लिहून आशीर्वाद दिला. (तें पत्र प्रस्तुत लेखकाजवळ आहे.) 'संगीताचें मराठीकरण' या विषयावर बरेच लेखही मीं पुढें लिहिले. त्याचप्रमाणें पंडितजींच्यावर कुत्सित टीका करणाऱ्या लेखकांनांहि मीं खरमरीत उत्तरें दिलीं. तींही पंडितजींनीं वाचलीं तेव्हां त्याबद्दलही ते प्रोत्साहनपर आशीर्वाद देत असत. अशी पंडितजींची सदिच्छा संगीताच्या बाबतींत कार्य करणाऱ्यांचेसाठीं असे. आज त्यांचे बरेचसे शिष्य वक्ते आहेत, लेखकहि आहेत. सर्व तऱ्हेनें खरें कार्य करणारे, तळमळ असणारे विद्यार्थी तयार करण्याची त्यांची प्रवृत्ति असे. उत्साह देऊन, प्रत्यक्ष धनानें सहाय्य करून संगीताचे सेवक तयार करणें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हें त्यांचें ब्रीद होतें. पोटभरू लेखक त्यांना पसंत पडत नसत. लिहिण्यांत किंवा प्रत्यक्ष कृती करून दाखविण्याची तळमळ विद्यार्थ्यांमधून उत्पन्न व्हावी अशी त्यांची जबरदस्त इच्छा होती.

स्वर-लेखन पद्धतीची प्रचीती

पंडितजी व माजी प्रसिद्ध नट कै. केशवराव भोसले.

३५-३६ वर्षांपूर्वीचे प्रसिद्ध नट कै. केशवराव भोसले यांचा व पंडितजींचा दाट परिचय होता. गाण्याचें स्वर-लेखन परिपूर्ण होऊं शकणार नाहीं या मताचे कै. केशवराव होते. तें त्यांचें मत पंडितजींनीं बदलून टाकलें होतें. १९१२–१३ सालीं राक्षसी महत्त्वाकांक्षा नाटकांतील एक पद 'नाहीं लांछन वदका' कै. केशवरावांनीं म्हटलें व त्याचें स्वर-लेखन प्रस्तुत लेखकानेंच केलें होतें. न ऐकलेल्या विद्यार्थ्यानें नुसता लेखनाचा कागद पाहून जसेंच्या तसें पद वाचून दाखविल्यावर कै. केशवराव खूष होऊन त्यांनीं विद्यालयाचे फंडास ' सौभद्र ' नाटक दिलें. असाच एक प्रसंग इंदोरलाही झाला. १९२० अखेर पंडितजींना इंदोरच्या नरेशाकडून आमंत्रण आलें. कै. पं. भातखंडे हे संगीताचें कॉलेज इंदोरला महाराजांच्या मदतीनें सुरू करणार होते. त्या वेळीं नोटेशन पद्धतीच्या वादावरच व महाविद्यालयांत पंडितजींचें सहकार्य घेतलें पाहिजे अशी अट इंदोर स्टेटकडून घातली गेल्यानें तें कॉलेज त्या वेळीं तेथें निघूं शकलें नाहीं. इंदोर नरेशांचे टयूटर कै. केतकर हे सुशिक्षित व कै. नानासाहेब पानसे यांचे शिष्य होते. कै. नानासाहेबांनीं बसविलेलीं पदें कै. केतकर मास्तर म्हणत असत. त्यांतलेंच एक पद 'मन माघोको ' याचें स्वर-लेखन करण्यास पंडितजींना व कै. पं. भातखंडे यांना सांगितलें होतें. पदांत आडीचे प्रकार होते. ते कै. पं. भातखंडे त्यांच्या स्वरलेखन पद्धतींत लिहूं शकले नाहींत, तें पंडितजींच्या स्वर-लेखन पद्धतींत पूर्णपणें लिहिलें गेलें. व कमिटीनें असा निकाल दिला कीं प्राथमिक शिक्षणास कै. पं. भातखंडे पद्धती व उच्च शिक्षणास पंडितजींची पद्धती ठेवावी. कै. पं. भातखंडे यांना तें मान्य झालें नाहीं. इंदोरलाही स्वर-लेखन करण्याची संधी प्रस्तुत लेखकासच मिळाली होती. हें लेखकाचें भाग्यच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणावयाचें. अशा सर्व खटपटी करीत असतांना आपला स्वतःचा अभ्यास त्यांनीं कधींही सोडलेला नव्हता. बरोबर असलेल्या विद्यार्थ्यांचें शिक्षणही चालत असे. त्यांच्या कार्यांत त्यांना कोणती आपत्ती वाटली असेल तर ती, 'विद्यालयाची इमारत गेली' ही होय. अखेरपर्यंत कार्य करण्याचा जोम पूर्ण होता; पण त्यांचें मन निराशेनें व्यापलें होतें.

गां. म. वि. चा रजत जयंत्युत्सव व भ्रमण

अशा पूर्ण निराशेंतही गां. म. विद्यालय काढून १९२६ सालीं २५ वर्षें पूर्ण झालीं, त्याचा रजत-उत्सव कराची येथें केला. २-३ दिवस जलसे केले, भाषणें झालीं व अशा उत्साहानें हा उत्सव साजरा केला गेला. कराचीनंतर हैद्राबाद, सिंध, शिकारपूर, सक्कर वगैरे ठिकाणीं जाऊन गां. म. विद्यालय संगीत परिषदा केल्या गेल्या. संगीताचा प्रचार सर्व प्रांतांत त्यांच्या फिरण्यानेंच झाला. अखेर एक भाग पहाडी मुलूख राहिला होता तिकडेही प्रवास केला. कांगडा, कुल्लू, मंडी, रिवालसर इत्यादि हिमाचल प्रदेशांतही भ्रमण करून संगीताचा प्रचार केला. मंडी स्टेटमध्यें दोन महिने महाराज व महाराणीच्या आग्रहास्तव राहिले; पण गायन व रामायणानें घरोघरीं रामनामाचा व संगीताचा प्रचार केला. इकडे सिलोन, मंडाला, बर्मा इकडेही भ्रमण केलें. तिकडे हिंदी समजत नाहीं असें दिसतांच एक तासभर इंग्रजींतही भाषण करून हिंदी संगीताच्या उच्चतेचें ज्ञान दिलें. मद्रास, रामेश्वर, धनुषकोटी इत्यादि ठिकाणीं गेले. म्हणजे लहान मोठें शहर कुठेंही जाण्याचें सोडलें नाहीं. अखेर एक इच्छा होती कीं, आतां एकदां नेपाळकडे जाणेची वेळ आली पाहिजे. असे विचार चालू होते, तोंच नेपाळ नरेशांचेकडून आमंत्रण येऊन पोंचलें.

नेपाळकडे भ्रमण

अशा सर्व भ्रमणांचें शिखर म्हणजे 'नेपाळच' झालें. सर्व प्रवास पायीं केला. त्या वेळीं विमानाची सोय नव्हती. नाहींतर पंडितजी विमानानें गेले असते. एकंदर दोन वेळांच पंडितजी नेपाळला गेले. अखेर अखेर प्रकृतीचें मान ठीक नव्हतें. आजारी होते, तरी औषध घेत नसत. आतां

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

फक्त "रामनाम हेंच औषध घेईन," असें अखेर निश्चयानें म्हणत होते. त्यांतच नेपाळचा पार्यी प्रवास. तरी पण हिमतीवर तोही प्रवास केला. नेपाळला प्रत्येक वेळीं महिना महिना मुक्काम करावा लागला. नेपाळ नरेशांचेकडे रामायण, कीर्तन व गाणें असे तीन्ही कार्यक्रम होत असत. बरोबर पं. वामनराव पाध्ये, पं. धुंडिराजजी पलुसकर, श्री. भाऊराव जालीहालकर इत्यादि मंडळी होती. तेथें गेल्यावर वरील मंडळी आजारी पडली. त्या आजारांतच महाराजांचें कार्यक्रमाचें आमंत्रण आलें. त्याच वेळीं त्यांचे आणखी दोन शिष्यही नेपाळांत पोंचले होते. त्यांचेंही महाराजांचेकडे गाणें होणार होतें. बरोबरची मंडळी आजारी पडल्यावर त्या दोन्ही शिष्यांना साथीला बसण्याबद्दल विचारलें गेलें. पण साथीला बसणें हें त्यांना तेथें कमीपणाचें वाटूं लागलें. पंडितजींनीं पुष्कळ समजाविलें पण जमलें नाहीं. आजारी पडलेली मंडळी साधारण बरी होऊन साथीला बसली व कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. त्या वेळीं महाराजांचेकडून आठ हजार रुपये व महावस्त्रें देण्यांत आलीं. अशा सन्मानानें पंडितजी नेपाळहून निघाले. एका महिन्यांत नेपाळ संगीतमय व रामनामाच्या प्रभावामुळें भारून गेलें होतें. हजारों लोकांनीं सन्मान केला, नेपाळ-नरेशांनीं ही सन्मानपूर्वक पाठवणी केली. असा नेपाळचा दौरा संपवून संपन्न स्थितींत पंडितजी नाशिकला आले. प्रकृति अस्वस्थ असल्यानें थोडी विश्रांती घेऊन पुन्हां प्रचाराच्या उद्योगाला लागले.

विद्यापीठांतून संगीताचा प्रवेश करण्याची खटपट

इतके दौरे पंडितजी करीत असतांना कलकत्ता, बनारस, पटना, मुंबई, लाहोर इत्यादि प्रांतीय विद्यापीठांतून संगीताचा अभ्यास ठेवून डिग्री दिली जावी अशी त्यांची खटपट होती. कलकत्ता, बनारस, पटना इत्यादि ठिकाणीं संगीत परिषदा भरवून विद्यापीठांत संगीताचा अभ्यासक्रम ठेवण्याबद्दलचे ठराव परिषदेंतून करण्यांत आले. हे ठराव व त्यांचा प्रचार पंडितजींनीं १९२५ ते १९३० पर्यंत व्याख्यानें व ठराव रूपानें केल्यानें आज जवळजवळ भारतांतील प्रत्येक विद्यापीठांत संगीताचा समावेश झालेला दिसून येतो. याला 'पंडितजींचा प्रचार' हेंच खरें कारण आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुंबई प्रांत पंडितजींच्या काळापासून पुढारलेला होता. पंडितजींच्या संगीताच्या प्रचारामुळें शेंकडो विद्यार्थी मुंबईत तयार करून परप्रांतांत पाठविले. पण अजूनपर्यंत मुंबई प्रांतांतल्या विद्यापीठांतून संगीताचे अभ्यासक्रम अगदीं साधारपणें अंमलांत आले आहेत. प्रांत फार पुढारलेला, पण संगीताच्या बाबतींत विद्यापीठें व मुंबई सरकार मागासलेलें आहे. पंडितजींच्या काळांत व आतां व्हावा तसा मुळींच फरक झालेला नाहीं; असें खेदानें म्हणावें लागतें. प्रत्यक्ष भारत सरकार आतां कुठें थोडें लक्ष घालूं लागल्यानें इतर प्रांतीय सरकार उगांच हालचाल करीत आहेत इतकेंच. पंडितजींच्या प्रचारानें त्या वेळचें परकीय सरकार असल्यानें कांहींच करीत नव्हतें. हल्लींच्या सरकारनें संगीताला अभ्यासांत स्थान दिलें पण गायक निर्माण करण्यासाठीं व ते सुशिक्षित असून संगीतांत विद्वान् होण्यासाठीं हल्लींपेक्षां जास्त मदत प्रांतीय सरकार देतील तर पंडितजींच्या पूर्वींच्या प्रचाराला फळ आलेलें आज दिसेल असें वाटतें.

संगीताचे कार्य हें जरी सर्वच संगीत अभ्यासकांचेसाठीं असलें तरी त्यासाठीं सुसंघटित होऊन कार्य करण्याची तयारी मात्र त्या काळीं फारच थोड्या गवयांची होती व सध्यांहि जवळजवळ तीच स्थिति आहे असें दृष्टोत्पत्तीस येतें. एकमेकांबद्दल द्वेष व अविश्वास इतका सांपडतो कीं, कांहीं व्यापक ध्येयासाठीं सर्व मतभेद व वैयक्तिक मानापमान बाजूला सारून एकत्र आलें पाहिजे असा दृष्टिकोन संगीताच्या साधकांत दिसत नाहीं. संगीताच्या प्रचारकार्यांतील ही फार मोठी अडचण होय हें लक्षांत घेऊन एकाच्या आज्ञेनुसार कार्य करणारीं एकदिलाचीं अशीं ध्येयनिष्ठ माणसें या उपदेशक वर्गातून निर्माण करण्याची आकांक्षा पंडितजींनीं बाळगली व पुढील आयुष्यांत याच कार्यास स्वतःला वाहून घेतलें. या कार्याची व्याप्ति पुढें पुढें इतकी वाढली कीं, त्या सर्व पसाऱ्याचा व्याप आवरतां न आल्यानें मुंबईस स्थापन झालेल्या विद्यालयाच्या शाखेची इमारत विकण्याचा दुर्धर प्रसंग पंडितजींचेवर ओढवला. त्या वेळीं लोक त्यांचें सांत्वन करण्यासाठीं आले असतां पंडितजींनीं जें अत्यंत स्वाभिमानपूर्वक उत्तर दिलें त्यामधून त्यांचा आपल्या संकल्पित कार्यावरील अढळ

प.च. ७

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विश्वास लक्षांत येतो. 'माझें हें एक विद्यालय नाहींसें झालें हें खरें, पण हीं माझीं शेंकडो जिवंत विद्यालयें आहेत ना!" असे उद्गार त्यांनीं आपल्या शिष्यवर्गास अनुलक्षून काढले होते. ते विश्वासपूर्ण उद्गार किती यथार्थ होते हें पुढील काळांतील त्यांच्या शिष्यवर्गाच्या कार्यानें सिद्ध झालें आहे. उपदेशक वर्गाच्या निर्मितीसाठीं त्यांनीं केलेला सर्वस्वाचा त्याग कांहीं लोकांना एकादे वेळीं अव्यवहार्य वाटण्याचा संभव आहे. पण पंडितजींचें ध्येयच मुळीं स्वार्थ साधण्याचें नसल्यानें त्यांचेसमोर व्यावहारिक संपन्नतेचा प्रश्न कधींच आला नाहीं. पंडितजींसारख्या अत्यंत महत्त्वाकांक्षी व ध्येयनिष्ठ माणसाची दृष्टि व्यवहारापेक्षां कार्यावर अधिक असणें अगदीं स्वाभाविक नाहीं का ?

पंडितजींचे अखेरचे दिवस व देहावसान

पंडितजींचें भ्रमण सारखें सुरूच होतें. या भ्रमणांतच पुन्हां पंडितजी नेपाळला गेले. पुन्हां महिनाभर पूर्वीसारखेंच रामायण, गाणें वगैरे करून प्रचार केला. पण प्रकृती जास्त बिघडतच चालली. प्रकृती अशी बिघडलेल्या स्थितींतच नेपाळचा दौरा आटोपून कलकत्ता बनारसला आले. काशीमध्यें पंडितजींचे एक मित्र श्रीमंत दादासाहेब तिळवणकर हे त्यांचे भक्तांपैकीं आहेत. त्यांच्या श्रीराम मंदिरांतच पंडितजींचा मुक्काम असे. ताप सारखा येतच होता; पण त्यांच्या रोजच्या नियमांत कांहींच फरक नव्हता. तेवढ्या आजारपणांतही गाणें, रामायण सुरूच होतें. त्याच मंदिरांत एक कोटी रामनामाचा जप आपण व लोकांच्याकडून करून घेतला. हें सर्व कृत्य प्रकृती फार बिघडली असतांना सुरूच होतें; पण प्रकृती दगा देण्याच्या बेतांत होती, तेव्हां नाशिकला जाण्याचें ठरवून नाशिकला आले. नाशिकला प्रकृति फारच खालावली होती. सर्व शिष्यमंडळी भेटण्यास येत होती. भेट घेऊन जावयाची, त्यामुळें पंडितजी आणखी बेचैन झाले होते. रामनाम सारखें सुरू होतें. 'पंडितजींच्या मनांतून परमेश्वराची सेवा करावी असें होतें; पण आजारपणामुळें तें जमत नव्हतें. याचें त्यांना वाईट वाटत असे. अशा निराशेच्या वातावरणांत पंडितजींना नाशिकला राहणें आर्थिक परिस्थितीमुळें पुढें पुढें कठीण होत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चाललें. परंतु पंडितजींचा श्रीरामावर विश्वास होता; "त्याला माझी काळजी आहे, तो जसा ठेवील तसें राहणें भाग आहे." असे पंडितजींचे विचार चालले असतांना कै. श्रीमंत बाळासाहेब मिरजकरांना ही सर्व हकीगत मीं सांगितली. पंडितजींच्याकडूनही फार आजारी असल्याचें पत्र आल्यानें श्रीमंतांनीं आपलीं माणसें पाठवून त्यांना मिरजेस बोलावून घेतलें. १९३१ च्या जूनअखेरीस पंडितजी मिरजेस आले.

मिरजेस आल्यावर कै. श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांनीं पंडितजींची सर्व व्यवस्था हिराबागेंत श्रीमंतांच्या जवळच केली. जुलई महिन्यांत पंडितजींना श्रीमंतांच्या डॉक्टरांचें औषध सुरू झालें. औषध पंडितजी घेतच नव्हते. पण श्री. मिरजकरांच्या आग्रहापुढें कांहीं चाललें नाहीं. औषध घेऊं लागले. प्रकृतीचें मान इतकें बिघडलें होतें कीं गुण येणें हेंसुद्धां कठिण होतें. दाढीमिशीहि पंडितजींची श्रीमंतांनीं काढून टाकविली होती. त्यांचें पंडितजींच्यावर अलोट प्रेम होतें. तें कसें होतें त्याचें वर्णन करतां येणार नाहीं. श्रीमंतांना त्यांच्या आजारांतच सिमला येथें जावें लागलें. डॉक्टरांना बोलावून आणून पंडितजींच्या प्रकृतीवर कडक नजर ठेवण्यास त्यांनीं सांगितलें. "हिराबागेंत मी स्वतःच आहें असें समजून पंडितजींना पाहण्यास येत चला," हा निरोप प्रत्यक्ष लेखकाचे समक्ष सांगितला होता. तोच येथें नमूद केला आहे. सिमल्याहून आल्यावर श्रीमंतांना पंडितजींच्या प्रकृतींत थोडा फरक वाटूं लागला. ५-६ महिने सुधारण्यास लागतील असा अंदाज होता. पण पंडितजींचीं रोजचीं कामें विद्यार्थ्यांना शिकविणें, रामायणपठण रोज पढून पंडितजी ऐकत होते. पण काळ आलेला कुणालाच कळला नाहीं. शुक्रवार दि. २१ ऑगस्ट १९३१ ला सकाळीं १०–११ वाजेपर्यंत नित्यक्रम सुरू होता; पण ११ वाजल्यानंतर अचानक रोगानें उलट खाल्ली व ११ चे पुढें घोर सुरू झाला. रामनाम जोरांत सुरू होतें. पण पंडितजींचेवर परिणाम दुसराच होत होता. दुपारीं दीड वाजतां पंडितजींचें देहावसान झालें. श्रीमंत फार दुःखी झाले होते. "गाणें शिकण्यासाठीं माझेजवळच आला व जातांनाही माझेजवळच गेला," असे दुःखोद्गार श्रीमंतांनीं काढले. पंडितजींची पुढील सर्व व्यवस्था

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीमंतांनींच केली. अशा तऱ्हेनें संगीतासाठीं तळमळणारा पंडितजींचा आत्मा मिरजेंत परमेश्वर-रूपांत विलीन झाला. आज त्यांना स्वर्गवास होऊन २५ वर्षे झालीं आहेत. तरी त्यांचें संगीताचें विधायक कार्य अव्याहतपणें सुरू आहे. यावरूनच पंडितजी अमर आहेत हें सिद्ध होतें. त्यांचें कार्य एकजुटीनें करीत राहणें हें त्यांच्या शिष्यांचें कर्तव्य आहे. त्यांचें संगीताचे प्रचाराचें ध्येय समोर ठेवून आम्ही शिष्य मंडळी तें कर्तव्य करूंच करूं !! त्यांत डोळ्यांसमोर ध्येय आहे ! ब्रीद आहे व विश्वासही आहे. अशा तऱ्हेनें पंडितजींना जाऊन २५ वर्षे पूर्ण होण्याचे आंतच त्यांचे चिरंजीव दत्तात्रय विष्णु पलुसकर यांचेंही ३४ वर्षे वय होऊन २६ ऑक्टोवर १९५५ ला दसऱ्याचे दिवशीं देहावसान व्हावें हीसुद्धां परमेश्वराची विघिघटनाच म्हणावयाची. त्यांचे चिरंजीव पंडितजींचें नांव सर्व हिंदुस्थानभर गाजवीत चालले होते. पंडितजींच्या पूर्वीच्या लौकिकांत भरच पडत होती. पण ईश्वराचे विचार कांहीं निराळेच असावेत. पंडित-जींच्या कार्याची धुरा त्यांच्या शिष्यांच्या प्राशिष्यांच्यावर पुन्हां येऊन पडली आहे. आम्हा शिष्यांच्या जीवांत जीव असेतों पंडितजींच्या कार्याच्या लौकिकाचा झेंडा पुढें टिकविणें हें आमचें कर्तव्य आहे. माझ्यासारखा एखादा शिष्यही त्यांच्या ध्येयापासून च्युत होऊन काम करीत नसेल तर पंडितजींचा आत्मा त्याला जागें करून कार्य करून घेईल असा माझा दृढ विश्वास आहे. पंडितजींचें कार्य, पंडितजींची धडाडी, पंडितजींचें ध्येय, हें जर आम्ही किंवा नवीन संगीताच्या अभ्यासकांनीं डोळ्यांसमोर ठेवलें तर अपयश तर येणार नाहींच, उलट यशच येईल ! तरी संगीत अभ्यास-कांनीं हें चरित्र कादंबरी म्हणून न वाचतां त्यांत घेण्यासारखें पंडितजींनीं काय कार्य केलें तें करण्याचा विडा जरी नवीन पिढीनें उचलला तरी हें संक्षिप्त चरित्र लिहिण्याचें सार्थक झालें असें लेखकास वाटेल.

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परिशिष्ट

कै. दत्तात्रय विष्णु पलुसकर
यांच्या
संगीत शिक्षणासंबंधींचा खुलासा

२१ ऑगस्ट १९३१ ला पंडितजी मिरज मुक्कामीं स्वर्गवासी झाल्यावर त्यांचे १० वे दिवसासाठीं प्रस्तुत लेखक मिरजेस गेला होता. कै. श्री. बाळासाहेब पटवर्धन मिरजकर यांनीं माझेकडून पंडितजींच्या इच्छापूर्तीसाठीं अनेक जबाबदाऱ्या माझ्यावर टाकून त्या बदवण्यासाठीं स्वतः दक्ष होते. पंडितजींचें विद्यालय चालविण्याबद्दल स्वतः पंडितजींनींच लेखकाकडून वचन घेतलें होतें. त्याचप्रमाणें चि. दत्तात्रय ऊर्फ बापूच्या संगीत शिक्षणाची जबाबदारी पंडितजींनीं व कै. श्री. मिरजकरांनीं माझेवर टाकली होती. त्या वेळीं मी गंधर्व नाटक मंडळींत होतों. परंतु पंडितजींचे कार्यांपैकीं कोणतें आपणांस करतां येईल याचा विचार करून प्रथम विद्यालय सुरू करण्याचें मनानें ठरविलें व त्यासाठीं गं. ना. मंडळी सोडण्याचा निश्चयही केला. त्याप्रमाणें श्री. बालगंधर्वांना सांगून १९३२ च्या मार्चच्या १० तारखेला मीं कंपनी सोडली. त्यानंतर ८ मे १९३२ ला पुण्यास गांधर्व महाविद्यालयाची स्थापना दे. भ. कै. न. चिं. केळकर यांचे हस्तें झाली. विद्यालयाचें कार्य चांगलें प्रगतिपर चाललें होतें. त्याचा सर्व पद्धतशीर अभ्यासक्रम आंखून त्याप्रमाणें कार्य अविरत सुरू झालें. १९३१ ते १९३४–३९ पर्यंत दर वर्षी मी नाशिकला जाऊन ती. आईसाहेबांना भेटत होतों. पण चि. बापूच्या संगीत शिक्षणाचें कांहीं जमत नव्हतें. त्याच्या राहण्याची व्यवस्था माझेकडून कशी होईल असा विचार येऊन मन घाबरून जात असे. पण चि. बापूची चांगली वेळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लवकरच पं. नारायणराव व्यासांचे मुळेंच आली व चि. बापू संगीत शिक्षणासाठीं नाशिक सोडून १९३५ सालीं मुंबईस आला.

कै. गु. पं. विष्णु दिगंबरांचे हे १२ वे चिरंजीव. यांना आठ बहिणी व तीन भाऊ होते. ते कुणीच जगले नाहींत. हे बारावे चिरंजीवच ३४ व्या वर्षापर्यंत जगले. यांच्या सर्व बहिणींना व इतर तीन्ही बंधूंना मीं अंगाखांद्यावर खेळवलेलें असल्यानें त्याच नात्यानें—चि. बापू हा गुरुजींचा एकुलता एक मुलगा म्हणून आम्ही सर्व गुरुबंधू त्याचें कौतुक करण्यास नेहमीं तत्पर होतों. १९२८ सालीं याचा व्रतबंध झाला, त्या वेळीं आम्ही सर्व गुरुबंधू नाशिकला जमलों होतों. एक दिवस रात्रभर गाणें ऐकविण्याचा कार्यक्रम सर्व गुरुबंधूंनीं ठरविला होता. त्या वेळीं पं. गुरुदेव आम्हां गुरुबंधूंना म्हणत, "व्रतबंधाच्या संस्कारापर्यंत तरी मुलगा जगला आहे, पुढचे संस्कार करण्यास मी राहीन किंवा नाहीं तें ईश्वराचे इच्छेवर आहे." लहानपणापासून चि. दत्तात्रय अर्थात् बापूची प्रकृती अशक्तच होती. इतक्या अलौकिक गुरूंचा एकुलता एक मुलगा म्हणून· लहानपणापासून लाडांतच वाढलेला होता व आम्ही सर्व गुरुबंधू त्याचे लाडच करीत होतों. १९३१ सालीं गुरुजींना स्वर्गवास होईल ही कुणाला कल्पनाही नव्हती. या आजारांतून ते उठतील असेंच सर्वांना वाटत होतें. पण ईश्वरी नेम दुसराच होता. गुरुदेवांनीं इहलोक सोडल्यावर त्यांच्या संसाराची वाताहात न व्हावी हीच आम्हा गुरुबंधूंची व त्यांच्या चाहत्यांची प्रबल इच्छा होती. गुरुजींच्या स्वर्गवासानंतर कै. श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन, मिरज संस्थानाधिपती, यांनीं वर्षासन म्हणून १२० रु. सुरू केले होते. श्रीमंत बाळासाहेबांच्या १९३९ च्या स्वर्गवासानंतरही त्यांचे चिरंजीव श्रीमंत तात्यासाहेब पटवर्धन यांनीं १९४३–१९४४ पर्यंत ही देणगी कायम ठेवली होती. चि. बापूच्या पंचविसाव्या वर्षापर्यंत ही देणगी चालू ठेवण्याचें मला आश्वासन दिलें होतें. कै. श्रीमंत बाळासाहेबांनीं देणगी देण्यास प्रारंभ केला तेव्हां चि. बापूचा वडील गुरुबंधू व श्रीमंतांच्याच आश्रयानें गु. स्व. पं. विष्णु दिगंबर यांचेकडे गाणें शिकलेला या दुहेरी नात्यानें देणगीचे पावतीवर माझी प्रथम सही घेतली होती व मीं मोठ्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभिमानानें सही दिली होती. १९३१ ते १९३५ च्या एप्रिलपर्यंत चि. बापू व श्री. गुरुमाता रमाबाई अर्थात् आईसाहेब या नाशिकला श्रीरामनाम आधार आश्रमामध्यें रहात होत्या. तेथून पुढें १९३५च्या मे महिन्यांत चि. बापू व ती. आईसाहेब यांना पं. नारायणराव व्यास हे मुंबईस घेऊन आले व पुढील शालेय व संगीताचें शिक्षण देण्याची व्यवस्था करण्याचा विचार करून त्यांनीं आपल्या घरींच त्या दोघांना ठेवून घेतलें होतें. पण पं. व्यासांचा बेत अचानक फिरून " चि. बापू व ती. आईसाहेब यांना पुण्यास पाठविण्याचें ठरविलें आहे " असें त्यांचें मला पत्र आलें व लगेच दुसरे दिवशीं अमुक गाडीनें येत आहेत म्हणून तारच आली. १९३५ सालीं पं. व्यासांचे दौऱ्यावर दौरे चाललेले होते. त्यामुळें चि. बापूची व ती. आईसाहेबांची देखरेख होणार नाहीं असेंही एक कारण असावें. पत्रांत त्यांनीं " देवदेवार्चन, मंदिरांमध्यें जाणें वगैरेस मुंबईस दादर येथें जमणार नाहीं म्हणून पुण्यास पाठवीत आहें " असा खुलासा केला होता.

अशा तऱ्हेनें अचानकपणें पुण्यास ती. आईसाहेबांचें चि. बापूसहित येणें झालें. आल्यावर त्यांची सर्व व्यवस्था होईपर्यंत राहण्यास जागा व शिक्षणाची सोय होईतों ८–१० दिवस माझ्याकडेंच राहून नंतर जमखंडीकरांच्या वाड्यासमोर दीक्षितांच्या वाड्यांत जागा मिळाली. तेथें त्यांची राहण्याची व्यवस्था केली. तेव्हांपासून आज घटकेपर्यंत त्याच वाड्यांत मुक्काम आहे. मेहुणपुऱ्याच्या बोळांत मॉडर्न हायस्कूल प्रथम होतें. तेथेंच चि. बापूचें इंग्रजी पहिल्या इयत्तेंत नांव घातलें. नाशिकला अनाथ विद्यार्थी गृहाच्या शाळेंत गुरुदेवांच्या श्रीरामनाम आधार आश्रमापासून पंचवटींत अगदीं जवळ अ. वि. गृह होतें म्हणून तेथेंच शिकत होता; पण त्याचा उपयोग पुण्यास होणार नाहीं म्हणून पहिल्या इयत्तेपासून वयाच्या १५ व्या वर्षी पुण्यास शिक्षणाचा प्रारंभ झाला.

संगीताचें शिक्षण

इंग्रजी शिक्षणाबरोबरच संगीताचें शिक्षण माझेजवळ पुण्यास सुरू झालें. पुण्यास आल्या वेळीं चि. बापूरावांस कांहींच गातां येत नव्हतें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नुसतीं पदें व कांहीं चिजा अगदीं थोड्या म्हणजे ३०–४० चिजा प्रो. चिंतामणरावांनीं (त्यांचे चुलत बंधू) शिकविल्या असाव्या. राग असा मुळींच गातां येत नव्हता. १–२ गुरुदेवांनीं लिहिलेले राग-प्रवेश पाठ होते. यापेक्षां त्यांना जास्त गाणें मुळींच येत नव्हतें. अशा तऱ्हेनें थोडें थोडें संगीताचें शिक्षण मीं सुरू केलें. मुलगा जात्या फारच अशक्त ! गुरुजींचा एकुलता एक मुलगा, त्यांच्या कलानें घेऊन संगीताचें शिक्षण सुरू होतें.

जालंदरच्या हरवल्लभ जलशासाठीं प्रयाण

जालंदरला हरवल्लभ संगीत महासभा या नांवानें तेथें प्रत्येक डिसेंबरच्या २६ ते २९ तारखेला जलसे होतात. या संगीत संमेलनांचा प्रचार बरेच वर्षांचा आहे (जवळजवळ ७५ वर्षे). त्या हरवल्लभ संगीत संमेलनाचा प्रचार १८९६ सालापासून कै. गु. विष्णु दिगंबरजींनीं केला. म्हणून त्या जलशांत या चालू वर्षापर्यंत गुरुदेवांचें नांव कायमचें तेथें निघतें. अशा ठिकाणीं पंडितजींच्या एकुलत्या एका मुलाला—चि. बापूस—घेऊन जावें म्हणून विचार करून ती. आईसाहेबांची परवानगी घेऊन चि. बापूरावास मी जालंदरला घेऊन गेलों होतों. प्रथम लाहोरलां गांधर्व महाविद्यालयाचें आद्यस्थान चि. बापूरावास दाखविलें. तेथील सर्व गुरुबंधूंची—श्री. गोविंदराव आपटे व श्री. जनार्दनपंत पेठे यांची भेट करविली. नंतर अमृतसरला घेऊन गेलों. गुरुदेवांच्या जुन्या मित्रांची व चि. बापूरावांची भेट झाल्यानें सर्वांनाच फारच आनंद झाला होता. जालंदरच्या जलशांत बापूराव मुळींच गाऊं शकत नव्हते. याचें कारण ३-४ मिनिटें सुद्धां एक राग गातां येत नव्हता, ही खरी परिस्थिति होती. मीं माझ्या खर्चानें चि. बापूरावांस जालंदर म्हणजे पंजाबांत, मद्रास, कलकत्ता, अलाहाबाद इत्यादि मोठमोठ्या गांवांतून माझ्या खर्चानें फिरवलें आहे. जालंदरला गुरुदेवांचे परममित्र कै. ईश्वरदासजी होते. त्यांचेकडून कमिटीला सांगून बापूरावांचें १० मिनिटें त्या महासभेंत गाणें मींच करविलें. १० मिनिटांत ३-४ पदें म्हटलीं. त्या वेळीं तबल्याचे साथीस गुरुदेवांच्या बरोबर बसणारे पै. मलंगखा बसले

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होते. १० मिनिटांत ५-७ वेळां बापूराव तालांत चुकला, तरी पण मलंगखांननीं कोणास कळूं न देतां 'वाहवा, वाहवा' म्हणून त्याचा सन्मानच करविला. कारण तालांतला पक्केपणा किंवा गाणें उत्तम येणें याला कांहीं वर्षे जावीं लागतात. तशी तयारी बापूरावची मुळींच नव्हती. तरी पण गुरुदेवांचा मुलगा आज जलशांत आला म्हणून हजारों लोकांना आनंद झाला होता. त्या १० मिनिटांसाठीं सुद्धां गुरुदेवांचा मुलगा म्हणून विजयमाळा जलशांत घातली. १ फेटा कै. ईश्वरदासांनीं दिला. अशा तऱ्हेनें गुरुदेवांची पताका त्यांच्या चिरंजीवांच्या हातून तेथें रोवून परत पुण्यास मी घेऊन आलों. अशी अगदीं खरी परिस्थिति असूनहि जालंदर स्वारीचा असत्य मजकूर देण्यांत संगीत कलाविहारच्या संपादकांचा उद्देश कोणता असावा हें सूज्ञ वाचकच जाणूं शकतील !

पुण्यास आल्यावर मात्र १९३६ पासून जालंदरमुळें ईर्षा उत्पन्न होऊन मीं गायक झालें पाहिजे, ही भावना मनांत धरून बापूरावांचा गाण्याचा अभ्यास जोरांत सुरू झाला. रोज २·३ तास अभ्यास सुरू झाला. रात्रीं देखील अभ्यासास बसविणेस प्रारंभ झाला. पहांटे उठविणें, स्वरसाधनास बसविणें इत्यादि गोष्टी प्रकृति व शाळेचा अभ्यास संभाळून चालू केल्या. त्याचा योग्य तो उपयोग झालाच व बापूरावांनाहि आपण अभ्यास केला पाहिजे असें वाटूं लागल्यानें १९३६ मध्येंच त्याचें फळ पुण्यांतच दिसून आलें.

पळणीटकर रोलिंग कप

१९३६ मध्यें बापूरावांचें संगीत शिक्षण व अभ्यास चांगला सुरू असतांनाच पुण्यांतील गोपाल गायन समाजातर्फे गोकुळ अष्टमीच्या उत्सवाचे वेळीं पळणीटकर फिरत्या कपासाठीं संगीताचे सामने ठेवण्याचें ठरवून मला माझ्या त्या वेळेच्या गांधर्व महाविद्यालयांतून संगीताच्या सामन्यांत विद्यार्थी पाठवावेत असें श्री. गोविंदराव देशाई, चालक गोपाळ गायन समाज यांनीं सांगितलें. १९३२ सालींच पुण्यास विद्यालय काढलें तेव्हां आपल्या विद्यार्थ्यांना या सामन्यांत बसविलें असतां माझ्या विद्यालयाच्या लौकिकास उपयोगी पडेल असें जाणून सामन्याकरितां ४ विद्यार्थी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पाठविले. त्यांत बापूरावही होते. भारत गायन समाजाचे दोन व कोल्हापूरचे वकील असलेले पण गाण्याचाही अभ्यास चांगले केलेले तेही सामन्यांत होते. परीक्षक कै. तांबेशास्त्री, मी स्वतः व श्री. देसाई चालक असे होतों. माझेच शिष्य जास्त होते म्हणून निकाल देण्यांत, 'मी भाग घेऊं शकत नाहीं. तुम्हीं दोघांनीं निकाल द्यावा; त्यांत मला न पटेल तर मी माझें मत सांगेन' असें सांगितलें. दोघांनीं पहिला नंबर पलुसकरांचा आहे असें जाहीर केलें. असें जाहीर होतांच कोल्हापूरच्या गायकानें पहिल्या नंबरला आव्हान दिलें. मी गुरु असल्यानें तें आव्हान तावडतोब स्वीकारलें. त्यानंतर श्री. देसाई चालक यांनीं पेला देण्याचें नाकारलें. कारण पेल्यावर आव्हान मी कसा देणार म्हणून हरकतीदाखल पेला देतां येणार नाहीं असें सांगितलें. या प्रकरणांत कै. माटे वकील व कै. रामभाऊ राजवाडे यांना समेटासाठीं वकील नेमलें. तरी त्यांचा निवाडा ऐकण्यास देसाई तयार नव्हते. अखेर कै. दे. भ. तात्यासाहेब केळकरांच्या मध्यस्थीनें खटला न होतां तो पेला १॥–२ महिन्यांनीं सन्मानानें समाजांतून मिरवत आणून विद्यालयांत ठेवला. मध्यस्थीच्या सभेच्या वेळीं आमच्यावर हात टाकण्यापर्यंत तयारी होती. त्यानंतर त्या कपासाठीं खरी चढाओढ अशी झालीच नाहीं.

ह्या पहिला नंबर येण्यानें बापूरावांची केसरीद्वारा प्रसिद्धी चांगली झाली होती. यानंतर त्यांचे शिक्षणांतच सर्व लक्ष केंद्रीत केल्यानें १९३८ पर्यंत बापूरावांच्या कीर्तीत भर पडण्यासारखें असें कांहीं झालें नाहीं. १९३६ च्या दसऱ्याचे वेळीं प्रथम मद्रास, नंतर म्हैसूर व बेंगलोर येथें बापूरावांना मी बरोबर घेऊन गेलों होतों. मद्रासमध्यें माझ्या गुरुदेवांचे पंजाबी, सिंधी, मद्रासी शिष्य होते. त्यांनीं बापूरावांची गुरूंचे चिरंजीव म्हणून पूजा केली. पैसा-कपडा दिला. हें मीं स्वतः पाहिलें आहे. १९३५ सालीं पंडितजींचीं 'संगीत बाल प्रकाश' हीं तीन्ही पुस्तकें नवीन पद्धतीप्रमाणें म्हणजे माझ्या 'बाल संगीत' पुस्तकाच्या पद्धतीवर काढण्यासाठीं प्रो. धुंडिराजजी पलुसकरांनीं माझे स्वाधीन केलीं. शास्त्रीय माहिती कै. ना. मो. खरे यांनीं लिहून दिली. जुन्या कविता पंडितजींनीं शोधलेल्या व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बसविलेल्या त्यांत थोडा फार शुद्धपणाच्या दृष्टीनें फरक करून छापून काढल्या. त्यानंतर २ रा व ३ रा भाग असाच माझे देखरेखीखाली पं. विनयचंद्रजी, दिल्ली (हे त्या वेळीं पुण्यास माझेकडे शिकत होते) त्यांच्या मदतीनें बापुरावांना पुस्तकासाठीं कसें लिहावें लागतें याचें प्रत्यक्ष ज्ञान करून तीं तीन्ही पुस्तकें माझ्या खर्चानें छापून, बापूरावांच्या नांवावर त्यांचा स्वतंत्र हिशेब ठेवून, त्यांचे सहीनें त्यांचे पैसे त्यांना देत होतों. छपाईचे पैसे माझे सर्व दिले गेले. पण तीं तीन पुस्तकें छापण्यामागें, त्याची सर्व कमाई बापूरावांना मिळावी अशी माझी खटपट होती; नाहींतर पंडितजींच्या पुस्तकांचे पैसे श्रीरामनाम आधार आश्रमांत (नाशिक) जमा होत होते. बापूरावांच्यासाठीं चांगल्या गोष्टी मीं काय केल्या त्याचा थोडक्यांत त्यांच्या चरित्ररूपानें आढावाच मीं लिहीत आहें.

मुंबई रेडिओवर पंडित विष्णु दिगंबर पुण्यतिथी

१९३८ सालच्या जून महिन्यांत मुंबई रेडिओवर गाण्यास गेलों असतां त्या वेळचे मुंबई रेडिओ स्टेशन डायरेक्टर मि. बुखारी (त्यांचा माझा १९१७ पासून परिचय होता) यांचेशीं बोलतां बोलतां पंडितजींची पुण्यतिथी रेडिओवर त्यांनीं ठरविली. प्रथम वर्षीं १९३८ सालीं सव्वाशें रुपये देऊन आम्ही गुरुबंधूंनीं सकाळपासून रात्रीपर्यंत गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे ती पुण्यतिथी साजरी केली. त्यांतच बापूरावांचें प्रथम रेडिओवर गाणें सुरू झालें. मि. बुखारींनीं बापूरावांना ३० रु. वर दरमहिना प्रोग्रॅम देण्यास माझेमुळेंच सुरुवात केली. पुढें १९४३ पर्यंत तर अव्याहत प्रोग्रॅम सुरूच होते. पुढें तर त्यांचे सर्व रेडिओ स्टेशनवर प्रोग्रॅम्स झालेले सर्वांनीं ऐकलेले आहेत. १९३८ अखेर 'संगीत-प्रवीण' या परीक्षेला बसवून गां. म. वि. मंडळातर्फे लाहोर येथें मंडळाचा मीच त्या वेळीं अध्यक्ष असतांना पदवीदान-समारंभ होऊन बापूराव 'संगीत प्रवीण' झाले. त्यांचेबरोबर माझेच ३ शिष्य संगीत-प्रवीण झालेले आहेत. बापूरावांचे बरोबर श्री. गोखले, श्री. खराडकर इत्यादि मंडळी शिक्षण घेत होती. आज ही सर्व मंडळी संगीत शिक्षणाचें कार्य करीत आहेत. बापूरावांच्या निमित्तानें आणखी १०-१२

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शिष्यांच्यावर त्या वेळीं मेहनत चालू होती. १९३९ पासून बापूरावांना शिक्षक मींच केलें. माझे वर्गावर देखरेखीसाठीं त्यांना बसवूं लागलों. असें करीत करीत त्यांना शिक्षक तयार केलें.

१९३९ सालामध्यें पुन्हां जालंदर व कलकत्त्यास बापूरावांना घेऊन गेलों. 'ऑल बेंगाल म्यूझिक कॉन्फरन्सचे' उत्पादक श्रीमान् बाबू भूपेन्द्रनाथ घोष यांनीं बापूरावांचें गाणें स्वतंत्रपणें ठेवून पंडितजींचा मुलगा म्हणून चांगलेंच कौतुक केलें. व वर्षाला बाबूजींनीं १२५ रु. बापूरावकरितां देण्याचें कबूल केलें. तें पुढें २-३ वर्षें देत होते. पुढें ते स्वर्गवासी झाल्यानें ती देणगी बंद झाली. १९४० मध्यें श्रीमान् जुगलकिशोर बिर्ला व त्यांचे वडील बंधू घनश्यामदास बिर्ला यांना भेटणेस घेऊन गेलों. ते प्रथम म्हणाले; " पंडितजींना मुलगाच नाहीं ! " परंतु " तसें नसून पंडितजींच्या मुलास भेटविण्यास घेऊन आलों आहें, " असें सांगतांच, "आंत घेऊन या" म्हणून त्यांनीं सांगितलें. त्याप्रमाणें बापूरावांना घेऊन जातांच प्रत्यक्ष त्यांना पाहून आनंद झाला व माझ्या मित्राचा मुलगा मला प्रत्यक्ष भेटणेस घेऊन मी गेलों म्हणून मला धन्यवाद दिले. बापूरावांना खाऊसाठीं म्हणून १२५ रु. रोख दिले. त्या वेळीं एक भजन ऐकविलें. त्यांना फारच आनंद झाला. अशा तऱ्हेनें त्यांना कोनाकोपऱ्यांत घेऊन मी हिंडलों. व पंडितजींचा मुलगा म्हणून सर्वांना आनंद होत असे. त्याचबरोबर ते चांगले गाऊं लागले होते म्हणून सर्वत्र कौतुकही करीत होते. अशा सर्व बाजूंनीं पंडितजींचा मुलगा म्हणून व मी अजून तयार करीत आहें हें पाहून पुष्कळ लोक मदत करण्यास तयार होत होते. पण मी ती मदत नाकारीत होतों. आम्हा पंडितजींचे शिष्यांपैकीं बहुतेक सर्व मदत करीत. पं. ओम्कारनाथ ठाकूर दर महिना १० रुपये २-३ वर्षें देत होते. बाहेरून मदत घेऊन त्या दोघांचा (बापूराव व ती. आईसाहेब) खर्च चालाविणें हा आम्हा गुरुबंधूंना कमीपणा होता म्हणून नाकारीत होतों.

बापूराव आपल्या पायांवर उभे राहून कमाई करून खर्च चालवूं लागले होते; आणि मला तरी तेंच पाहिजे होतें. स्वाभिमानानें बापू-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रावांनीं रहावें अशी माझी बलवत्तर इच्छा ! त्याप्रमाणें १५ व्या वर्षा-पासून वयाचीं २१ वर्षें पूर्ण झाल्यावर सज्ञान या सदरांत १९३९ पासून सर्व पैशाची व्यवस्था त्यांचेकडे दिली गेली. १९३५ ते १९३९ पर्यंतचे त्यांच्या बाबतींतली हिशेबाची वही माझेजवळ आहे. मी फिरतीत असतां त्यांना जी देणगी देतील ती त्यांचे नावें जमा होत होती. रेडिओ प्रोग्रॅमाशिवाय कोणताहि प्रवासखर्च त्यांचे अंगावर मीं पडूं दिला नाहीं. सर्व खर्च मीच करीत होतों. बापूरावांना व्यवहार कसा करावा, जगांत वागावें कसें, तसेंच संगीत सृष्टींतील व्यवहारांतहि त्यांना सूज्ञ मीं केलें होतें. अशा व्यावहारिकपणाच्या सर्व गोष्टी त्यांना समजा-वून देऊन त्याप्रमाणें त्या गोष्टी ते करतात किंवा नाहीं यावरहि माझें लक्ष होतें. संगीताचा अभ्यासहि पुढें चांगला वाढविला होता. ४-५ तास रोजचा अभ्यास मी करून घेत होतों. सकाळचा अभ्यास संपल्यावर माझें घरखर्चांत त्यांना दूध पाजवून मग घरीं सोडीत होतों. प्रथम गंधार कोमल स्वरांत ते गात होते (काळी दोन पट्टी). पुढें मध्यम, पंचम स्वरांतही गाण्याची मेहनत करवून घेतली. १९४२ च्या पंडितजींच्या पुण्यतिथींत बापूरावांनीं गातांना पंडितजींच्या सईसई ताना घेतल्या होत्या. त्या ऐकून आज पंडितजींच्या गाण्याची आठवण झाली असें श्रोते बोलत असत. पुढें पुढें पंडितजी भजन कसें म्हणत होते, स्पष्ट शब्दोच्चाराबरोबरच स्वरांच्या संगतीनें शब्दांचा अर्थ प्रगट करण्याची जी पंडितजींची कला तीच त्यांना समजावून देत होतों; पण तिकडे त्यांचें दुर्लक्ष असे. याला कारण जवानी. तरुणपणांत. तानेच्या किंवा लयीच्या भराऱ्या मारण्याकडेच लक्ष होतें व तें साहजिकच होतें. पुढें बापूरावांचें मन कलुषित करणारे लोक अर्थात् माझेच कांहीं गुरुबंधू याला कारण झाले. हें येथें खेदानें नमूद करणें भाग आहे. पूर्वी बापूराव माझे-बरोबर तंबोऱ्यावर ५-७ वर्षे साथीला बसत असत. पुढें साथीला बसतांना कुरकुरूं लागलेले मीं पाहिलें. १९४३ सालापासून तंबोरा साथीवर ते बसले नाहींत व मींहि बसविलें नाहीं. १९४३ सालीं डिसेंबरांत त्यांनीं पुण्याचे गांधर्व महाविद्यालयाची लाइफ मेंबरशिपहि सोडली व स्वतंत्र

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झाले. गांधर्व महाविद्यालय हें माझें नाहीं. त्यांच्या वडिलांची संस्था. ती चालविण्यास पंडितजींचे चिरंजीव तयार झाले होते व मी केवळ नाममात्र जोडीदार राहून त्यांना मदत करून इरतऱ्हेनें संस्थेचे प्रमुखाध्यापक बापूरावांना पुढें बनविण्याचा माझा विचार होता. तो योग आला नाहीं. इतकेंच मी या बाबतींत लिहीत आहें. जास्त लिहूं शकत नाहीं.

कलावंत कीं शिक्षक

'कलावंतानें शिक्षकाचा धंदा करावा का?' असा एक आक्षेप कांहीं लेखकांनीं घेतला व अखेर कलावंत वृत्तीचाच विजय होऊन बापूरावांनीं शिक्षक पेशा सोडला, असें एक विधान संगीत कलाविहारच्या संपादकांनीं केलें आहे. स्व. पं. गा. बाळकृष्णबुवांनीं स्व. पं. विष्णु दिगंबरजींना शिक्षण दिलें, किंवा पंडितजींनीं शेंकडों विद्यार्थ्यांना संगीत शिक्षण दिलें. मग ते काय कलावंत नव्हते का? शिक्षण देऊनच कलाकार उत्पन्न करण्याचा जवळ जवळ कारखानाच पंडितजींनीं उघडला होता. त्यामुळें त्यांचें गाणें कमी मुळींच झालें नव्हतें. उलट "डोळसपणा शिक्षण देण्यानेंच आला." असें पंडितजी म्हणत असत. नुसते कलावंत होण्यासाठीं गांधर्व महाविद्यालय काढलेंच नव्हतें, तर माझे विद्यार्थी शीलवान, गायक, शिक्षक, व्याख्याते, लेखक व्हावेत असेंच त्यांचें पक्कें मत होतें. 'कलावंत' हा शब्दच त्यांना कमीपणाचा वाटत असे. मग कलावंत वृत्ति त्यांच्या मुलांत आली व त्याचाच विजय झाला, हें संपादकांनीं केलेलें विधान पंडितजींना व त्यांच्या मुलाला कमीपणाच आणणारें आहे असें माझें मत आहे.

कै. गा. बाळकृष्णबुवांच्या गायकीचा संस्कार

१९५३ च्या संगीत कलाविहारमध्यें संपादकांनीं गा. बाळकृष्णबुवांच्या गायकीचा संस्कार बापुरावांचेवर पं. मिराशीबुवांचेकडून झाला असें एक विधान केलें आहे. याचा अर्थ हाच कीं, पं. मिराशीबुवांचे खेरीज बाळकृष्णबुवांच्या गायकीचा संस्कार इतर कुणी करूं शकत नव्हते. पंडितजींना जे बाळकृष्णबुवांचे गायकीचे संस्कार झाले होते तेच आम्हा शिष्यांच्यावर शिक्षण देतांना त्यांनीं केले होते. तेच धडे पूर्णपणानें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बापूरावांच्या गळीं उतरविण्याची खटपट मीं केली होती. बापूराव गातांना प्रस्तुत लेखकाच्या गाण्याचीच आठवण पदोपदीं होते असें हजारो श्रोते लेखकाजवळ बोलत होते. पं. मिराशीबुवांच्या गायकीचा परिणाम त्यांचे गाण्यावर मुळींच झाला नव्हता, ही परमेश्वराची व पंडितजींची कृपाच म्हणावयाची.

संगीत कलाविहारमधील असत्य विधानें

(१) पुण्यास माझेजवळ शिकण्यास राहण्याचे अगोदर ४०—५० राग व ३००-३५० चिजा बापूरावांना येत होत्या,

(२) ' जालंदरवर बापूरावांची स्वारी ' या दोन्ही विधानांचा खुलासा वर केलाच आहे.

(३) पुण्यास आल्यावर दोन महिन्यांत गांधर्व महाविद्यालयांत शिक्षक झाले. गां. म. वि. मंडळाचे परीक्षक पुण्यास परीक्षा घेण्यास येत असत तेव्हां ते म्हणत, 'पुण्याचा विद्यार्थी लेचापेचा असावयाचा नाहीं.' परीक्षकांची तेथें परीक्षा होत असे. १९३५ ते १९४२ पर्यंतचें माझे देखरेखींतलें इतकें पद्धतशीर व उच्च दर्जाचें शिक्षण होतें कीं, साधारण शिक्षक तेथें चालतच नसे. १—२ महिन्यांत झालेले, शिक्षक पुण्याचे विद्यार्थी मुळींच पसंत करीत नसत.

संपादकही गाणें गातात व शिक्षणही देतात. गाणें शिकविणें म्हणजे एक थट्टेचा विषय आहे असा संपादकांना अनुभव असावा म्हणून असलें अविचारी विधान केलें असावें.

(४) बापूरावांचें संगीताचें शिक्षण ८ वर्षें पूर्णपणें माझ्याजवळ झालें हें जुन्या व नव्या गुरुबंधूंनाही माहीत असतांना याबद्दल कुणीच खुलासा केला नाहीं म्हणुन मला हा खुलासा करणें भाग पडलें.

(५) 'संगीत कलाविहार' मासिक गांधर्व महाविद्यालय मंडळाचें प्रकाशन आहे. पंडितजींच्या कार्याचा प्रचार करणारें हें एक मुखपत्र आहे असें मंडळाचा एक सभासद या नात्यानें मला वाटतें. आपापसांतील दुही किंवा मतभेद वाचकांच्यासमोर असत्य विधानांनीं करणें हें संपादकांना

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मान्य असेल कदाचित्. बापूरावांच्या शिक्षणाचे वेळीं बहुतेक गुरुबंधू मदत करीत होते. त्या वेळीं संपादकांनीं काय व किती मदत केली याचा ते विचार करतील तर बरें होईल.

पोटभरू संपादक म्हणून कै. बापूरावांचा पुळका येऊन सत्य परिस्थितींची जाणीव संपादकांना पूर्णपणें असतांना असलीं असत्य विधानें त्यांनीं कां केलीं हें त्यांचें त्यांनाच माहीत. कै. बापूरावांना संगीताचें शिक्षण मी देत असतांना तन-मन-धनानें मीं शिक्षण दिलें तें गुरुदेवांच्या आज्ञेवरून. मातृऋण, पितृऋण व गुरुऋण हें कधींच फिटूं शकत नाहीं. तरी पण तें अल्पशा प्रमाणांत फेडण्याचें भाग्य मला मिळालें तें सुद्धां गुरूंचे व माझे अन्नदाते कै. श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन मिरजकर यांच्या आज्ञेनेंच मिळालें. हें सत्य स्वरूप संपादकांनीं असत्य ठरविण्याची खटपट केली तरी तें असत्य ठरूं शकत नाहीं. याची जाणीव अखेर अखेर कै. बापूरावांना झाली होती. पण संपादकांना त्याची जाणीवही नव्हती. कै. बापूरावांच्या मृत्यूनंतर रेडिओंत बोलतांना बापुरावांचें संगीताचें शिक्षण पं. पटवर्धनबुवांचे जवळ झालें होतें हें त्यांना कबूल करणें भाग पडलें. संपादकांच्या असत्य विधानावर जर मीं खुलासा केला नाहीं तर मी सत्य असून खोटा व असत्य विधानें करणारे संपादक तेवढे खरे ठरतील म्हणूनच मीं हा सविस्तर खुलासा नाइलाजास्तव केला आहे. कै. बापूरावांच्या बरोबर माझ्याजवळ शिक्षण घेणारे माझे विद्यार्थी आज हयात आहेत, तेसुद्धां यावद्दल ग्वाही देतील.

संपादकांच्या कवडी किंमतीच्या असत्य विधानांना मीं अनुल्लेखानें थंड केलें होतें. पण १९५३ मधील बापूरावांची मुलाखत त्यांच्या मृत्यूनंतर १९५५ च्या डिसेंबरमध्यें पुन्हा छापल्यानें संपादकांचा समाचार खुलासारूपानें घेणें नाइलाजास्तव भाग पडलें असें खेदानें म्हणावें लागतें. नाहीं तर या खुलाशाच्या भानगडींतच पडलों नसतों.

प्रकाशक : पं. विनायकबुवा ना. पटवर्धन अध्यक्ष, विष्णु दिगंबर स्मारक समिति, ४९५ शनवार ३ रा मजला ब्लॉक नं. ११ अ, पुणें २
मुद्रक : स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्एल्. बी. समर्थ भारत छापखाना; ४१ बुधवार पेठ, पुणें २.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi